
म. ग्रं. सं. ठाणें
य
क्र. १७५८

# लोकशाहीचे धोके



[श्री. हर्बर्ट अॅगर यांच्या 'पेरिल्स ऑफ डेमॉक्रसी' या पुस्तकाचा अनुवाद]

अनुवादक

**पन्नालाल सुराणा**

REFBK-0015949

नो.क्र. ४६९३

१०५१८

नो.दि. ३०.१०.९८

प्राज्ञमाला क्रमांक – ८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४१६९३ वि: निबंध
क्रमांक ११५८ दि. ३०/१०/६८

# लोकशाहीचे धोके

लेखक
**हर्बर्ट अॅगर**

अनुवादक
**पन्नालाल सुराणा**

१५८८

[श्री. हर्बर्ट अॅगर यांच्या 'पेरिल्स ऑफ डेमॉक्रसी' या पुस्तकाचा अनुवाद]

REFBK-0015949

**मूल्य दोन रुपये**

प्राज्ञपाठशालामंडळ, वाई
१९६७

प्रकाशक : म. शं. साठे, चिटणीस प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई जि. सातारा

[ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत ]

मुद्रक : म. शं. साठे, मॅनेजर दी प्राज्ञ प्रेस वाई जि. सातारा

# अनुक्रमणिका


लेखक परिचय

प्रास्ताविक

प्रस्तावना . . . . . . १–११

स्वातंत्र्य . . . . . . १–३३

प्रातिनिधिक लोकशाही . . . . ३४–७१

नवी राष्ट्रे . . . . . ७२–८७

# लेखक परिचय

हर्बर्ट ॲगर यांचे जीवन त्यांची मायभूमि अमेरिका व इंग्लंड या दोन देशात विभागले आहे, व दोन्ही ठिकाणी त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावली आहे. दोन्ही महायुद्धाच्या वेळी त्यांनी युनायटेड स्टेट्स्च्या आरमारात काम केले आहे. प्रीन्स्टन विद्यापीठाची डॉक्टर ऑफ फिलॉसफी ही पदवी त्यांनी मिळविली असून काही काळ एका अमेरिकन दैनिकाचे ते संपादक होते. अमेरिकेच्या इतिहासावर व राजकारणावर त्यांनी काही पुस्तके लिहिली आहेत.

इंग्लंडमध्येही त्यांनी बरीच वर्षे घालविली. दोन युद्धांच्या दरम्यानच्या काळात अमेरिकन वृत्तपत्रांचे ते इंग्लंडमधील वार्ताहर होते, आणि १९४२ ते १९४६ पर्यंत लंडनमधील अमेरिकन राजदूताचे खास सहायक म्हणून त्यांनी काम केले. लंडनमधील एका प्रकाशनसंस्थेचे दहा वर्षे ते एक डायरेक्टर असून रॉयल शेक्सपीअर थिएटर व टी. टी. डब्ल्यू. ही वेल्स आणि पश्चिम इंग्लंडसाठी असलेली स्वतंत्र दूरचित्रवाणी कंपनी यांच्या नियामक मंडळांचेही सभासद आहेत.

# प्रस्तावना

लोकशाही हे साध्य नव्हे, ते एक साधन आहे. मानवी व्यक्ती व समाज यांच्या सांस्कृतिक विकासासाठी व्यक्तीला ज्या अनेकविध स्वातंत्र्याचा उपभोग शक्य तितक्या अनिर्बंधपणे घेता आला पाहिजे, त्या स्वातंत्र्याचे संरक्षण-संवर्धन करू शकणारी सध्याच्या परिस्थितीतील त्यातल्या त्यात चांगली पद्धती म्हणजे लोकशाही होय.

पण स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात कधी कधी लोकशाहीलाही अपयश येऊ शकते. कारण लोकशाही राज्य बहुमताच्या जोरावर निवडून आलेल्या प्रतिनिधींकरवी चालत असते. आणि बहुजनांच्या हिताच्या नावाखाली व्यक्तीवर किंवा व्यक्तिसमूहावरच नव्हे तर सर्वांवर वाटेल ते अन्याय करण्यास बहुमताचे मन वळविता येते. हा लोकशाहीतला मोठा धोका होय.

म्हणून लोकशाही पद्धती एकदा उभारली म्हणजे काम झाले, आता काळजी करण्याचे कारण नाही, हा समज आत्मवंचना करणारा आहे. लोकशाही पद्धती सतत डोळसपणे, जागरूकपणे चालवावी लागते. स्वातंत्र्याचे संरक्षण होऊ शकेल अशा रीतीने सरकारचा कारभार चालावा म्हणून सुयोग्य संस्थांचे साह्य घेणे आवश्यक असते. प्रातिनिधिक विधिमंडळ, जबाबदार कार्यकारी मंडळ या त्या संस्था होत. पण त्या संस्थांवर सर्वस्वी विसंबूनही राहता येत नाही. त्यांच्यावरसुद्धा देखरेख ठेवावीच लागते. देखरेख ठेवणे नागरिकाला सुलभ जावे यासाठी संस्थांचे साह्य होऊ शकते, पण जागरूक पहारा करण्याचे काम शेवटी नागरिकालाच करावे लागते. नाही तर शतकाशतकांच्या लोकशाही परंपरा असलेल्या देशातसुद्धा स्वातंत्र्याचा अपहार करणाऱ्या प्रवृत्ती बळावू शकतात. श्री. हर्बर्ट ॲगर यांच्या विवेचनाचे हे मूळ सूत्र होय.

अत्यंत नम्र भूमिका घेऊन श्री. ॲगर यांनी मूलगामी महत्त्व असलेल्या या व्यावहारिक प्रश्नाची चर्चा केली आहे. प्राचीन ग्रीक लोकशाह्यांतल्या उणीवांबरोबरच इंग्लंड–अमेरिकेतील आधुनिक लोकशाही राजवटीतल्या दोषांची त्यांनी प्रांजलपणे चिकित्सा केली आहे. लोकशाही हा श्रेष्ठ ध्येयवाद होय अशी त्यांची जीवननिष्ठा असल्याने जगभरच्या राष्ट्रांनी खरी लोकशाही पद्धती रूढ करावी, राबवावी असे त्यांचे प्रतिपादन असणे स्वाभाविक आहे. पण पाश्चात्यांच्या लोकशाही राज्यपद्धती या लोकशाहीचा एकमेव आदर्श होत; तशी पद्धती, तशा संस्था नसतील तेथे लोकशाही असणेच शक्य नाही असला हेकटपणा श्री. ॲगर यांच्या ठायी नाही. नव्या राष्ट्रांना

आपापल्या परिस्थितीनुसार सोयिस्कर संस्था रूढ कराव्या लागतील, प्रयोग करीत असताना चुका होण्याचीही शक्यता आहे, हे लक्षात ठेवून त्यांच्या प्रयत्नाकडे पाहिले जावे असे त्यांनी आवर्जून म्हटले आहे.

त्याचबरोबर राज्यकर्त्यांवर टीका करता येणे, संघटनास्वातंत्र्य वापरता येणे, 'विरोधी' पक्ष वा गट प्रत्यक्षात अस्तित्वात असणे, (त्यांच्या अस्तित्वाला राज्यकर्त्यांची 'हरकत' नाही एवढे पुरेसे नाही), शांततेच्या सनदशीर मार्गांनी राज्यकर्त्यांना सत्ताच्युत करून दुसऱ्या लोकांच्या हाती अधिकार देता येईल अशी तरतूद घटनेत असणे व प्रत्यक्षात व्यवहारातही तशी परिस्थिती असणे–या गोष्टी कुठल्याही प्रकारच्या लोकशाही राज्यपद्धतीत असल्याच पाहिजेत. जेथे त्या नाहीत तेथे लोकशाही नाही, हा निकष स्वीकारला पाहिजे याविषयी श्री. अँगर यांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे.

आणखी एका ज्वलंत मुद्याची त्यांनी ( सांगोपांग नसली तरी ) साक्षेपाने चर्चा केली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर बहुतेक पाश्चात्य विचारवंतांचे असे मत बनले आहे की कम्युनिझम हा लोकशाहीचा सर्वांत मोठा शत्रु होय. म्हणून त्यांनी जगभर कम्युनिझम विरोधी चळवळ चालविली आहे. या प्रश्नाचा विचार करताना श्री. अँगर यांनी असे सुचविले आहे की मार्क्सची विचारसरणी व रशिया–चीनमधील प्रत्यक्ष घडामोडी यांची गल्लत करू नये. रशिया–चीनमध्ये कम्युनिझम किंवा मार्क्सच्या नावाने जरी समाजपरिवर्तनाचे प्रयोग सुरू झाले असले तरी मार्क्सच्या विचारसरणीतला काही भाग तेथील सत्ताधाऱ्यांनी जाणून बुजूनच बाजूला टाकला आणि सत्तेचा लोभ वगैरेसारखे घटक तिथे प्रभावी बनले. सत्ताधाऱ्यांची लहर आणि तिच्या अंमलबजावणीसाठी गुप्त पोलीसांचे साह्य या पद्धतीने चालणारा राज्यकारभार स्वातंत्र्यांची गळचेपी करणारा असल्याने लोकशाहीला तो सर्वस्वी प्रतिकूल होय, यात वाद नाही. त्या त्या देशातील लोकशाहीवाद्यांना त्या सत्तेविरुद्ध झगडावे लागते हे उघड आहे. इतर देशातदेखील कम्युनिझमच्या नावाने असो किंवा लोकशाहीच्या नावाने असो अशा प्रवृत्ती वाढण्याची शक्यता आहे, आणि म्हणूनच त्यांचा प्रतिकार जागरूकपणे केला पाहिजे.

पण केवळ तेवढयाने मार्क्सच्या विचारसरणीबद्दल लोकशाहीने कोणती भूमिका घ्यावी हे स्पष्ट होत नाही. अन्याय, शोषण यापासून दलित लोकांची मुक्तता करून त्यांना 'स्वातंत्र्याच्या राज्यात' प्रवेश मिळवून द्यावा ही मार्क्सची प्रेरणा होती. आपल्या सिद्धान्ताच्या मांडणीत त्याच्या गैरसमजुतीमुळे काही चुका झाल्या, तर त्याचे काही निष्कर्ष परिस्थितीने खोटे ठरविले आहेत. राजकीय भविष्यकथनाचा त्याचा प्रयत्न चुकीचा होता. असा प्रयत्न करणेच मुळी चुकीचे आहे. व्यक्तीच्या बाबतीत

राशिभविष्य किंवा हस्तसामुद्रिक जितके हास्यास्पद, तितकेच मानव समाजाच्या राजकीय वर्तनाचे भविष्य ' शास्त्रशुद्ध ' पद्धतीने वर्तविणे वेडगळपणाचे होय.

मार्क्सची विचारसरणी व त्याने सुचविलेला कार्यक्रम आज मार्गदर्शक ठरू शकत नाही. पण त्याने निर्माण केलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. आर्थिक शोषणापासून सुटका झाल्याशिवाय माणसे स्वातंत्र्याचा अनुभव कसा काय घेऊ शकतील ? मार्क्स-नंतर सुमारे शंभर वर्षांनी प्रेसिडेंट रूझवेल्टनेही हाच प्रश्न निर्णायक आहे असे सूचित केले. भुकेपासून स्वातंत्र्य हे त्याच्या दृष्टीने चार मूलभूत स्वातंत्र्यापैकी एक होय, आणि जोपर्यंत ते उपलब्ध होत नाही तोपर्यंत इतर स्वातंत्र्याचा उपभोग घेणे कठीण आहे.

आशिया–आफ्रिकेतील नव्या राष्ट्रात भुकेचा प्रश्न अक्राळविक्राळ स्वरूपात उभा आहे. त्यावर मात करण्यासाठी कम्युनिझमचे आकर्षण तिथल्या नेत्यांना वाटणे स्वाभाविक आहे. तेवढयावरून लोकशाहीच्या उपासकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. कम्युनिझम व लोकशाही यांचा समन्वय होण्याची किंवा वेगळा प्रकार उत्क्रांत होण्याची शक्यता आहे.

श्री. ॲगर यांनी मांडलेला हा मुद्दा नव्या राष्ट्रातील लोकशाहीनिष्ठांनी नीट लक्षात घेतला पाहिजे. कम्युनिझमविरोधाची केवळ जपमाळ ओढत बसल्याने या देशातील लोकशाहीला बळ मिळणार नाही. लोकशाही बद्धमूल करण्यासाठी तिच्या मार्गातील अडथळे दूर करणे, समाजव्यवस्थेत त्या दृष्टीने इष्ट ती परिवर्तने घडवून आणणे हे काम केले पाहिजे. विचारदेखील या सूत्राच्या दिशेने केला पाहिजे. नव्या राष्ट्रांच्या संदर्भात विचार करायचा तर तेथील कम्युनिस्ट मंडळींच्या मार्गाने जाण्याने लोकशाही स्थिर करण्याला साह्य होईल असे वाटत नाही. विचारांची सांप्रदायिकता व इतर काही देशांच्या हिताहिताशी अंधपणे समरस होऊन प्रसंगी स्वदेशाच्या हिता-कडेदेखील दुर्लक्ष करणे ही या पंथाची स्वभाववैशिष्ट्ये झाली आहेत. या राष्ट्रांचे प्रश्न सोडविण्याच्या दिशेने तो पंथ स्वतंत्रपणे विचार करू शकत नाही असे दिसून आले आहे. तसेच समाजपरिवर्तनाच्या मार्गाविषयीही त्यांच्या विचार-वर्तनात गूढाचा अंश आहे. त्यामुळे लोकशाही रुजविण्यासाठी या देशांना कम्युनिझमच्या मार्गाने जाऊन चालणार नाही. किंबहुना या मर्यादेपर्यंत कम्युनिझम हा शत्रूदेखील मानला पाहिजे. पण कम्युनिझम नको असे म्हणणे हा अर्धा भाग झाला. मूळ प्रश्न सोडविण्यासाठी अधिक पुरोगामी दृष्टीने व अधिक जिद्दीने प्रयत्न झाले नाहीत तर या नव्या राष्ट्रातले लोकशाहीचे अंकुर करपून जाण्याची भीती आहे. श्री. ॲगर यांच्या विवेचनाचे हे सार आहे.

आशिया खंडात भारत हा लोकशाहीचा एकमेव आशादीप आहे असे श्री. ॲगर यांनी म्हटले आहे. त्यामुळे भारतीय मन निश्चितच सुखावते. पण जेथे लोकशाहीच्या

परंपरा शतकानुशतके चालत आलेल्या आहेत तेथेसुद्धा स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या प्रवृत्ती केव्हा बळावतील याचा नेम नाही, अशी भीती व्यक्त करून श्री. ॲगर यांनी काही उदाहरणेही दिली आहेत. भारतात आजच्या घडीला कुठला देखावा दिसतो आहे यापेक्षा कुठल्या प्रवृत्ती वाढताहेत आणि कुठल्या कमजोर होत आहेत यावरच भारतीय लोकशाहीचे भवितव्य अवलंबून राहील.

भारतीय लोकशाहीच्या मार्गात कुठले धोके आहेत ? श्री. ॲगर यांनी याची चर्चा केलेली नाही. पण भारतातील प्रगल्भ व तटस्थ बुद्धीच्या **विचारशीलांनी** वस्तुनिष्ठ दृष्टीने निरीक्षणविश्लेषण करून आपले निष्कर्ष वारंवार नागरिकांसमोर ठेवले पाहिजेत. या दृष्टीने काही लोकशाहीनिष्ठांच्या मनात जी शंका घर करू लागली आहे ती सर्वांच्या विचारार्थ संक्षिप्तपणे मांडण्याचा एक प्रयत्न या प्रस्तावनेच्या निमित्ताने करण्यात येत आहे.

भारतीय लोकशाहीसमोर अनंत प्रश्न आहेत. दारिद्र्य, अज्ञान, परकीय आक्रमणाची टांगती तलवार–असे एक ना अनेक. ते परत परत उगाळत बसण्यात अर्थ नाही. लोकशाही दृष्टीने व लोकशाही बलवान बनविण्यासाठी ते प्रश्न एकेक करून सोडविण्याच्या मार्गातले खरे अडथळे कोणते हे पाहिले पाहिजे. मुख्य अडचण ही दिसते आहे की लोकशाहीशी फार थोड्या लोकांना कर्तव्य आहे. भारतात राष्ट्रवादाप्रमाणे लोकशाहीदेखील नवी कल्पना आहे. इथल्या जीवनाची परंपरागत धाटणीच अशी आहे की विस्तृत, व्यापक समाजाची कल्पना सर्वसाधारण नागरिकाला असत नाही. आपले गाव, आपले कुटुंब किंबहुना आपण स्वतः यांच्या क्षणिक सुखदुःखांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची त्याच्यात कुवत नाही. तसा विचार करणे शक्य आहे, त्याची गरज आहे, याचीही जाणीव त्याला नाही. त्यामुळे व्यापक प्रश्नांचे अस्तित्वच त्याच्या गावी नसते. राष्ट्रवाद थोडाफार रुजला आहे– तोही थोडाच. त्यावर घाला आला तर ज्याला 'आपले' म्हणायचे अशा कुठल्या तरी वस्तूवर किंवा कल्पनेवर संकट आले आहे अशी पुसट जाणीव भारतीय नागरिकांना स्थूलमानाने झाली आहे. समाजातल्या काही समस्यांमुळे, काही अपप्रवृत्तींमुळे लोकशाहीला धोका आहे याची जाणीव त्यांपैकी कितीकांना आहे ? चीन किंवा पाकिस्तानचा हल्ला झाला तेव्हा 'देशाच्या संरक्षणासाठी आम्ही प्राण अर्पण करायला तयार आहोत' अशा रक्ताच्या स्वाक्षऱ्या देणारे तरुण निघाले. उद्या कोणी लोकशाहीच्या गळ्याला नख लावायला लागले तर तो दुष्ट हात अडविण्यासाठी प्राणार्पण करणारे कितीजण निघतील ?

लोकशाहीचे मूल्य समजलेले, ती रुजली पाहिजे असे वाटणारे लोक अत्यंत अल्पसंख्य आहेत. शहरातील काही सुशिक्षितांना आधुनिक शिक्षणामुळे, अनेक पाश्चात्य विचारवंताच्या शिकवणुकीमुळे लोकशाहीबद्दल प्रेम वाटू लागले आहे; तर

गेल्या शंभर-सव्वाशे वर्षातील सामाजिक आणि राजकीय चळवळीमुळे, विशेषतः ग्रामीण भागातल्या साक्षर-निरक्षर कार्यकर्त्यांच्या मनावर ' लोकशाही हा एक श्रेष्ठ आदर्श होय ' असा संस्कार अस्फुटपणे घडला आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या व आर्थिक परिवर्तनाच्या चळवळीबरोबरच राजा राममोहन रॉय, फुले, आंबेडकर वगैरेंच्या पुरस्काराने निर्माण झालेल्या सामाजिक चळवळींचा ग्रामीण भागातील मोजक्या लोकांना का होईना, पण लोकशाही विचारांचा स्पर्श करून देण्यात फार मोठा वाटा आहे. त्यांच्या जोडीला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व नंतरचे भाष्यकार यानीही लोकशाहीचा जाणीवपूर्वक पुरस्कार केला आहे. घटनेने देशाच्या कारभारासाठी लोकशाही संस्थांचा सांगाडा उभा करून दिला आहे. त्या संस्थांच्या कामकाजात सहभागी होऊ लागलेली नवी पिढी लोकशाहीची भाषा बोलू लागली आहे. बहुतेक वृत्तपत्रांनीही तीच भाषा अंगीकारली आहे.

परिणामतः चित्र असे दिसते की, देशात सर्वांनाच लोकशाही हवी आहे, तिला विरोध कोणाचाच नाही. सर्वांची जबाबदारी म्हणजे कोणाचीच नाही असा प्रकार याही बाबतीत झाला आहे. लोकशाहीला विरोध करायला कुणीच उघडपणे उभा राहत नसल्याने लोकशाहीला आपला पाठिंबा आहे असे म्हणणाऱ्यांच्या निष्ठेचा कस लागणे कठीण झाले आहे. शाब्दिक पाठिंब्यामुळे होणारी फसवणूक अपार व भयानक आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याला धोका मुख्यतः बाहेरून असतो; लोकशाहीला मुख्यतः आतून असतो. सरहद्दीच्या संरक्षणाची तयारी करण्याचे काम सातत्याने करण्यासारखे असले तरी जेव्हा प्रत्यक्ष आक्रमण होते त्याच वेळी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी असलेली आच प्रगट करण्याला वाव मिळतो. लोकशाहीचे तसे नाही. ज्या वेळी हुकूमशाही किंवा अधिकारशाही (Authoritarian) प्रवृत्ती प्रत्यक्ष उठाव करून लोकशाहीचा खातमा करतात त्या वेळी लोकशाहीच्या संरक्षणासाठी प्रतिकार करण्याला फार थोडा वाव राहतो. आधीपासून प्रच्छन्नपणे काम करीत असलेल्या लोकशाहीविरोधी प्रवृत्तींचे बळ इतके वाढलेले असते की लोकशाही उलटून टाकण्याची प्रत्यक्ष क्रिया अल्पावकाशात घडते. लोकशाहीविरोधी प्रवृत्तींशी लढा द्यायचा असला तर तो आधीपासूनच द्यावा लागतो.

लोकशाही हा ध्येयवाद विचारप्रधान व त्यामुळे काहीसा अमूर्त आहे. त्याला पायदळी तुडवू पाहणाऱ्या प्रवृत्तीही अदृश्य असून अतिशय धूर्तपणे, अप्रत्यक्षपणे त्यांचे काम चाललेले असते. स्वतःला लोकशाहीप्रेमी म्हणविणारांना आपला ध्येयवाद प्राणापेक्षा प्रिय वाटत असेल तर आपल्या समाजातील लोकशाहीविरोधी प्रवृत्ती ओळखणे, त्यांना अनुकूल असणारी परिस्थिती बदलणे व प्रत्येक नागरिक लोकशाहीचा

संरक्षक बनेल अशी स्थिती निर्माण करणे हे त्यांचे कर्तव्य होय. हे कार्य बुद्धिगम्य असून ते सातत्याने, कौशल्याने व सूक्ष्मपणे करावे लागणार आहे.

भारतातील लोकशाहीनिष्ठ व्यक्तींची संख्या अल्प आहे. पण त्याने फारसे बिघडत नाही. कुठल्याही समाजात उदात्त ध्येयवादाची उपासना करणारे सुरुवातीला अल्पसंख्यच असतात. त्यांनी जिद्दीने व त्यागाने ( होय, त्यागसुद्धा बुद्धिमत्ता व जिद्द त्यांच्या इतकाच आवश्यक आहे ) प्रयत्न केला तर यश मिळणे कठीण नसते. केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे.

करणे म्हणजे काय ? शारीरिक कष्ट केले तरच काम केले असे मानायचे काय ? हा प्रश्न तसा अप्रस्तुत आहे. पण हेही खरे की भारतासारख्या मागासलेल्या देशात शारीरिक कष्टांचीही गरज आहे. पण ती एकमेव नव्हे. किंबहुना लोकशाहीची लढाई मुख्यतः बौद्धिक व मानसिक सामर्थ्यानिशी लढायची असते. लोकशाहीचे उद्दिष्ट प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विकासासाठी स्वातंत्र्य उपभोगता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे हे आहे. भारतातील विशिष्ट सामाजिक व आर्थिक घडणीमुळे बहुसंख्य व्यक्तींना आपला स्वातंत्र्याचा हक्क वापरता येत नाही. त्यांना तो वापरता यावा यासाठी सामाजिक व आर्थिक रचनेत आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे, निकडीचे आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या दिशेने प्रयत्न करणे सोपे झाले आहे. पण त्याचबरोबर काही विरोधी प्रवृत्तीही वाढू लागल्या आहेत. अंतर्भागातल्या खेड्यांपासून तो देशभर पसरलेल्या औद्योगिक साम्राज्यांपर्यंत प्रत्येक ठिकाणच्या आर्थिक व सामाजिक हितसंबंधी सत्ताधाऱ्यांची एक अदृश्य, अनामिक फळी तयार झाली आहे. आमचा स्वार्थ हा मुख्य निकष, त्याच्या आड कोणी येत नाही तोपर्यंत कुणी कुठलेही स्वातंत्र्य उपभोगायला हरकत नाही, पण आमच्या आड याल तर खबरदार, आणि आमच्या स्वार्थासाठी तुमच्या हक्कांवर गदा आणावी लागली तर त्यात गैर आहे असे आम्ही मानणार नाही, तुम्हीही मानू नका— अशी वृत्ती असलेल्यांची ही आघाडी दिवसें दिवस मजबूत होऊ लागली आहे.

अशा स्थितीत प्रत्येक व्यक्तीच्या—म्हणजेच मुख्यत: ग्रामीण भागातील नागरिकांच्या व दलित वर्गीयांच्या स्वातंत्र्याला प्राधान्य मिळेल अशा दृष्टीने देशाची धोरणे आखली गेली पाहिजेत न त्यांचा आग्रह धरला गेला पाहिजे. हे लोकशाहीनिष्ठांचे काम आहे. अंत्यजाला केंद्रस्थानी मानून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा कार्यक्रम आखणे, त्यातला तपशील सुचविणे, पवित्रा कोणता व कसा टाकायचा याबाबत दिग्दर्शन करणे हे लोकशाहीनिष्ठ विचारशीलांनी करायला हवे. पण दुर्दैवाने आज त्यांच्याकडून ही अपेक्षा पूर्ण होताना दिसत नाही. युक्तीच्या चार गोष्टी सांगण्याचे हे मर्यादित काम

करण्यासाठीदेखील समाजजीवनाचे सम्यक् चित्र समजावून घेणे, परिवर्तनासाठी ज्यांचा उपयोग करणे शक्य आहे अशा संस्थांची कार्यपद्धती अभ्यासणे, तिच्याशी दैनंदिन संबंध ठेवणे, दिनरात्र अंत्यजाचे हित नजरेसमोर ठेवून चिंतन करणे- यातूनच लोकशाही दृढमूल करण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन विचारशील करू शकतील.

सुयोग्य धोरण–कार्यक्रमाची मांडणी ही पहिली पायरी ओलांडण्यातच यापैकी बहुसंख्य मंडळी अडखळलेली दिसतात. तशा धोरणाचा हिरीरीने पाठपुरावा करणे, क्रियाशीलांना प्रोत्साहन देणे ह्या दुसऱ्या पायरीबद्दल बोलायलाच नको. इंग्लंड आणि अमेरिकेची उदाहरणे सदा न् कदा देण्याची आपल्याला खोड आहे. आणि सोयीनुसार त्यातला गैरसोयीचा भाग गाळायचा अशीही सवय आपल्याला लागली आहे. आवश्यक ती धोरणे अमलात आणण्यासाठी लोकमत उभे करणाऱ्या, प्रत्यक्ष सत्ता हाती घेऊन ती त्याप्रमाणे राबविणाऱ्या कार्यकर्त्यांचा गट असल्याशिवाय कुठलाच परिवर्तनाचा कार्यक्रम प्रत्यक्षात उतरू शकत नाही. इंग्लंडमधील वेब, शॉ, लास्की या विद्वानांनी व साहित्यिकांनी आपणाला योग्य वाटणारी धोरणे प्रमाणभूत मानणाऱ्या पक्षाच्या उभारणीत, बांधणीत भाग घेतला. त्यांनी लढविलेल्या एकदोन निवडणुका किंवा जमविलेले दोनचार हजार पौंड यांची किंमत नसते. अमुक एका विशिष्ट धोरणांना आमचा पाठिंबा आहे, ती यशस्वी होण्यात आम्ही आमचे यश व अपयशी होण्यात आमचे अपयश मानू ही भावना मोलाची आहे. विचारशीलांनी अशी निर्भीड भूमिका घेतली म्हणजे सबंध समाजाला आपली जडता सोडणे भाग पडते.

इंग्लंडची उदाहरणे जरा जुन्या चालीची झाली आहेत. सध्या सर्वच क्षेत्रातील फॅशनचे उगमस्थान अमेरिका बनली आहे. पण तेथील विचारवंतांनीही हा कित्ता गिरविला आहे. मॅकार्थीझमविरुद्ध मोहीम उभारली विचारशीलांनी, आणि त्या अपप्रवृत्तीला आसरा देणाऱ्या राजवटीला सत्ताच्युत करण्याचा निर्धार केलेल्या विरोधी पक्षाला पाठिंबा दिला तोही प्रथम त्यानीच. आयसेनहॉवर, डलेस यांच्या ‘ ब्रिंकमनशिप ’च्या धोरणाला विरोध करण्यात हार्वर्ड विद्यापीठातील विद्वानांनी पुढाकार घेतला, आणि देशाच्या परराष्ट्रीय ( म्हणजे जागतिक ) धोरणात परिवर्तन घडवून आणण्यासाठी केनेडींच्या पाठीशी आपली सर्व शक्तिबुद्धी त्यानी उभी केली. श्लेसिंजर, गालब्रेथ यानी कणखरपणे ही भूमिका घेतली. सत्ताधाऱ्यांच्या मागे जायचे, त्यांचे समर्थन करायचे अशी ही भूमिका नाही; तिच्या नेमकी उलट ही भूमिका आहे. सत्ताधाऱ्यांना मार्गदर्शन करायचे, आजचे सत्ताधारी ते स्वीकारायला तयार नसतील तर त्याना विरोध करायचा, आपण सुचवीत असलेल्या धोरणांचा जाहीरनामा स्वीकारणाऱ्या राजकारण्यांबरोबर उभे रहायचे, अपयशाचा धोका पत्करून उभे राहायचे, असा हा

पवित्रा होय. जोखीम उचलायची तयारी केवळ क्रियाशीलांनीच दाखवून चालत नाही, विचारशीलांनीही ती दाखवली पाहिजे.

भारतातील विचारशील मंडळींचे वर्तन या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहे. राजकीय नेत्यांच्या पाहणीबरोबरच विचारशीलांच्याही अशा पाहण्या केल्या जाव्यात. त्यांचे निष्कर्ष काय निघतील ते निघोत, एक गोष्ट नित्य अनुभवाची बनली आहे. ती ही की स्वतःला लोकशाहीनिष्ठ म्हणविणारे विचारशील स्वतःला ' स्वतंत्र ' ठेवू इच्छितात, सर्वच राजकीय पक्षाना क्षुद्र लेखत असतात. यात ते लोकशाहीची सेवा तर बजावीत नाहीतच, उलट हानी करतात. देशाचा कारभार विशिष्ट ( चूक की बरोबर हा प्रश्न येथे प्रस्तुत नाही ) धोरणांच्या साहाय्याने चालविला जावा असे वाटत असेल तर त्या धोरणावर स्थूलमानाने एकमत असलेला पक्ष व तत्सम राजकीय संघटन असल्याशिवाय ते जमणार नाही. त्याच्या अभावी राजकारण धोरणनिष्ठ न राहता व्यक्तिनिष्ठ—म्हणजेच लहरनिष्ठ बनत जाईल हे उघड आहे. राजकीय पक्ष म्हणजे स्वार्थसाधूंचा अड्डा असे विचारशीलांनी म्हणत बसणे हे लोकशाहीच्या खोडावरच प्रहार करण्यासारखे आहे.

विचारशीलांच्या वर्तनातील आणखी एक उणीव प्रकर्षाने जाणवते. लोकशाही समाज हा बहुकेंद्रित असला पाहिजे. समाजाच्या विविध सामाजिक, बौद्धिक, सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी व्यक्तींनी मुक्तपणे नव्या वाटा शोधल्या पाहिजेत, नवे मार्ग रुळविले पाहिजेत. या प्रयत्नांचे संयोजन करण्यासाठी स्वयंस्फूर्त, लोकायत्त संस्था वाढल्या पाहिजेत. म्हणजे समाजातील कुठलाही एक गट, पक्ष किंवा संघटना सर्वसत्ताधारी बनण्याचा प्रयत्न करू शकणार नाही. तसा प्रयत्न झाला तर या लोकायत्त संस्था त्यांचा प्रभावीपणे विरोध करू शकतील. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात असे प्रयत्न झाले होते, काहींना तर बाळसेही आले होते. स्वातंत्र्यानंतर मात्र ही प्रक्रिया उलटी चालू लागल्यासारखी दिसते. लोकायत्त संस्था निर्माण करणे, त्या जिद्दीने चालविणे, चांगले संकेत व परंपरा निर्माण करणे, समाजाला पोषक जीवनसत्त्वे पुरविणे ही कामे स्वतंत्रपणे, स्वतःच्या हिंमतीवर कोणीच हाती घेईनासे झाले आहे. साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान वगैरेंना वाहिलेल्या संस्था आपल्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांसाठी सत्ताधाऱ्यांवर अवलंबून राहू लागल्या आहेत. आधुनिक काळात व विशेषतः भारतासारख्या मागासलेल्या देशात अशा उपक्रमांसाठी लागणारे द्रव्यसाहाय्य शासनसंस्थेकडून घ्यायला काही हरकत नाही. पण त्यासाठी सत्ताधाऱ्यांची लाचारी पत्करण्याचे काय कारण ? पैसा तर जनतेचा आहे. उपयुक्त उपक्रमासाठी तो मागणे व मिळणे हा लोकांचा हक्क आहे. त्यात तत्कालीन

सत्ताधाऱ्यांची मेहेरनजर होण्याचा काय प्रश्न आहे ? पण याचे भान कटाक्षाने ठेवण्याची हिंमत फार थोड्यांच्या ठायी दिसते आहे. काही ठिकाणी तर सत्ताधाऱ्यांकडून मार्गदर्शन व नेतृत्वदेखील मागितले व स्वीकारले जाते. सत्ताधाऱ्यांपैकी जे गुणवान आहेत, त्यांचा अशा संस्थाशी संबंध असूच नये असे कोणी म्हणणार नाही. पण 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' तसे आजकालच्या जमान्यात 'सर्वे गुणाः सत्ताऽश्रयन्ते' असे झाल्यासारखे दिसते आहे. यात सर्वांचेच अधःपतन होते आहे. लाचारी व दंभ वाढतो आहे. शिकल्यासवरलेल्यांनी असा आदर्श घालून दिल्यावर अज्ञजन बिचारे कसे वागणार ? याचा भयंकर परिणाम होतो तो हा की लोकायत्त संस्थांच्यारूपाने समाजाचे स्वतंत्र, स्वायत्त, कणखर सामर्थ्य उभे राहीनासे झाले आहे. हा लोकशाहीला फार मोठा धोका आहे.

लोकशाही यशस्वीरीत्या राबविण्यासाठी परिश्रम, संयम व सहिष्णुता यांची नितांत आवश्यकता आहे. ज्याला हे समजते अशा वर्गाने याबाबत आदर्श आचरणाचे धडे घालून दिले पाहिजेत. भारतात तसे कितपत होते आहे याचाही ज्याचा त्याने विचार करावा. आधुनिक काळात समाजाचा व्यवहार अधिकाधिक परस्परावलंबी, गुंतागुंतीचा होत चालला आहे. अशा समाजाचा गाडा चालविण्यासाठी व्यवस्थापक, तंत्रज्ञ, कारभारी अशांचा वर्ग मोठ्या प्रमाणावर लागतो. परंपरेने चालत आलेल्या सत्ताधाऱ्यांच्या जोडीला आज हा नवा वर्ग बहुसंख्य समाजाचे शोषण करू लागला आहे असे दिसते. लोकशाही वाचवायची असेल तर जाणत्यांनी म्हणजे लोकशाहीनिष्ठांनी बहुसंख्य समाजाच्या सुखदुःखाशी समरस झाले पाहिजे, बहुजनांचे दुःख कमी करून त्यांचे सुख वाढविण्यासाठी झटले पाहिजे. सत्ताधाऱ्यांशी संगनमत तर नव्हेच, पण प्रसंगी त्यांच्याशी संघर्षही करायची तयारी ठेवली पाहिजे. त्याऐवजी 'काही डुकरे अधिक समान आहेत' असे म्हणून मोक्याच्या जागी असलेल्यांनी सर्व सोयी-सवलती लाटायला सुरुवात केली तर कसे होईल ? समतेच्या अभावी सर्वसाधारण नागरिकाला स्वातंत्र्याचा उपभोग कसा काय घेता येईल ? कार्यक्षमतेसाठी आवश्यक त्या सोयी व सुखलोलुपता यात मूलगामी फरक आहे हा विवेक विचारशीलांनाही करता येणार नाही काय ?

लोकशाहीनिष्ठ क्रियाशीलांची शोकांतिकाही कमी कारुण्यपूर्ण नाही. चळवळीच्या पार्श्वभूमीमुळे लोकशाही मूल्यांवरील त्यांची निष्ठा पक्की असली तरी पुरेशी डोळस नाही. त्यामुळे प्रजासत्ताकाच्या प्रस्थापनेनंतर लोकशाही रुजविण्यासाठी किती भगीरथ प्रयत्न करावे लागतील याची त्यांना पुरेशी कल्पना नव्हती. परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर काहीशा अगतिकपणे ते वाहू लागले. काही जणांनी सत्ता हाती घेऊन तिच्यामार्फत

भारतीय लोकशाहीच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला. तसे करणे आवश्यकही होते. पण लोकशाहीत सत्ता ही लोकाभिमुख धोरणांच्या जोरावर व लोकांच्या होकारार्थी क्रियाशील पाठिंब्याने मिळवायची असते याचा त्यांना विसर पडला. त्यामुळे सत्तेच्या जाळयात ते पुरे फशी पडल्यासारखे दिसतात. सत्ता हाती टिकवायची तर व्यवहार सांभाळायला हवा या 'पोक्त' विचाराने अपप्रवृत्तीबरोबर तडजोड करायला त्यांनी सुरुवात केली. ही घसरगुंडी थांबवणे मात्र त्यांच्या हातात राहिले नाही. या व्यामोहातून आपण बाहेर पडलो तर आपला आणि लोकशाहीचाही नाश होईल असा त्यांचा प्रामाणिक समज होऊ लागला आहे. सत्ता हवी, पण ती लोकांना साह्य करण्यासाठी, त्यांच्या उत्स्फूर्त कर्तृत्वशक्तीला हत्यारे–अवजारे पुरविण्यासाठी, त्याच्या स्वातंत्र्यांचे संरक्षण–संवर्धन करण्यासाठी, याचे भान त्यांना राहिलेले नाही.

जे सत्तास्थानापासून दूर राहिले त्यांना व्यावहारिक शुद्धता काही अंशी टिकविता आली असली तरी सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे किंवा मर्यादित क्षेत्रात व प्रमाणात का होईना पण लोकांना थोडेफार साह्य पोहोचवणे यातले काहीच यशस्वीरीत्या करता आले नाही. वैफल्याने त्याना ग्रासल्यासारखे झाले आहे. परिणामतः त्यांचा आदळ-आपटीवरील भर वाढला आहे.

क्रियाशीलांच्या या दोन्ही गटांचे एका बाबतीत साधर्म्य दिसते. ते म्हणजे लोकशक्तीच्या साहाय्याने लोकशाहीविरुद्ध प्रवृत्ती मोडून काढून समाजपरिवर्तनाच्या मार्गाने लोकशाही दृढमूल करता येईल यावर कोणाचाच आंतरिक विश्वास राहिलेला नाही. लोकशक्ति जागृत व संघटित करून हे ईप्सित साधायचे म्हणजे जिकिरीचे, कष्टाचे व वेळ लागणारे काम होय. त्यासाठी दमदारपणा, चिकाटी व धीर हवा. वेळ लागणार म्हणून सावकाशीने केले तरी चालेल असा समज करुन न घेता 'जितके नेटाने काम करू तितके ते लवकर होईल' अशा जाणीवेने काम करायला हवे. पण असा धीर क्रियाशीलांपैकी कोणालाच राहिलेला दिसत नाही. सर्व आघाड्यांवर तडजोड, वैफल्यजन्य आक्रस्ताळेपणा किंवा तत्त्वशुद्ध निष्क्रियता यांना ते बळी पडत आहेत. परिणामतः संघटना–बांधणीचे काम त्यांच्यापैकी कोणालाच जमेनासे झाले आहे. फाटाफूट, संकुचितता यांचे थैमान माजले आहे. लोकशाही गोटातील या अराजकामुळे व निर्नायकीमुळे लोकशाहीविरोधी प्रवृत्तींना आयतेच खतपाणी मिळत आहे.

स्वातंत्र्य व समता या तत्त्वावर आंतरिक निष्ठा नसूनहि लोकशाही ही आजची फॅशन असल्याने स्वतःला लोकशाहीवादी म्हणविणाऱ्या विचारशील–क्रियाशीलांचे आणखी दोन गट भारतात दिसत आहेत. त्यापैकी एका गटाला अंध पाश्चात्यानुकरणाची बाधा झाली आहे तर दुसऱ्याची नजर भूतकाळाकडे लागलेली आहे. ॲडम स्मिथ किंवा

मध्ययुगीन परंपरा हे त्यांचे मार्गदर्शक होत. मध्ययुगीन परंपरेला प्रमाण मानणारे अंशतः भाबडे व निष्पाप आहेत. लोकशाहीचे सूक्ष्मार्थ न कळताच बिचारे स्वतःला लोकशाहीवादी म्हणवितात. तर ॲडॅम स्मिथचे अनुयायी धूर्त असून आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी ते लोकशाहीचा सोयीस्करपणे उपयोग करून घेत आहेत. त्यांच्यात हे भेद असले तरी भारतीय जीवनातील या दोन प्रवाह–प्रवृत्ती लोकशाहीला उपकारक तर नाहीच, हानिकारक आहेत. आणि स्वतःला लोकशाहीवादी म्हणवून घेऊन ते समाजाच्या डोळ्यात धूळफेक करताहेत हाही भारतीय लोकशाहीला मोठाच धोका आहे.

विचारशील व क्रियाशील यांच्या स्वभाव–दोषांचे वरील विवेचन सर्वसाधारण आहे. प्रत्येक गटात व पातळीवर अपवाद असणारच. असे काही चैतन्यशाली अपवाद भारतात आहेत हीच लोकशाहीची आशा आहे.

राहता राहिली जनता. नव्या लोकशाही जीवनदृष्टीचे बाळकडू तिला मिळत नाही तोपर्यंत परंपरागत चाकोरी ती कशी सोडणार? डोळस आणि कणखर नेतृत्व मिळाले तर लोकशाहीचे रहस्य ओळखून ते श्रेय प्राप्त करण्यासाठी आवश्यक तो त्याग व कर्तृत्व दाखविण्याची धमक अखिल मानवजातीचा भाग असलेल्या भारतीय जनतेतही निश्चितपणे आहे. जनतेची स्थितिशीलता भंगणे व स्वार्थी हितशत्रूंचा सामना करणे हे भारतीय लोकशाहीचे **आजचे** आव्हान आहे. ज्यांना त्या मूल्यांविषयी आच आहे त्याशिवाय दुसरे कोण ते स्वीकारणार ?

एकंदर परिस्थितीच तशी आहे, त्याला कोण काय करणार, असे म्हणणे ही पळवाट झाली. सर्व दोष स्वतः सोडून बाकीच्यांचा आहे असे म्हणणे म्हणजे तर भयानक पलायनवाद झाला. परिस्थितीचे आव्हान स्वीकारून त्यावर मात केली तरच लोकशाहीचे संरक्षण–संवर्धन होऊ शकेल. लोकशाहीचा खेळ सोपा नाही, फार कठीण आहे. हा चक्रव्यूह भंगण्यात अनेक अभिमन्यू खर्ची पडतील. पण लोकशाहीनिष्ठांनी जिद्दीने प्रयत्न केले तर भारतातही लोकशाही चिरस्थायी होऊ शकेल. सतत जागरूकता ही प्रगल्भ लोकशाहीची किंमत होय. अर्धविकसित देशातील लोकशाहीला सतत जागरूकतेच्या जोडीला दमदार पराक्रमाचीही किंमत चुकवावी लागते. नुसती स्वातंत्र्याची जपमाळ ओढून भागत नाही. स्वातंत्र्याचा वापर करून कर्तृत्व गाजवावे लागते, तरच लोकशाही रुजते व फुलते.

**बार्शी** **पन्नालाल सुराणा**

ता. ३०–६–६७

---

४९६९३ निबंध
30/2016

# लोकशाहीचे धोके

# स्वातंत्र्य

१९४२ साली, दुसऱ्या महायुद्धातले पारडे फिरण्यापूर्वी, एका दूरदर्शी फ्रेंच गृहस्थाने लिहिले : “ हिटलरला खरा विरोध बोल्शेव्हिझम, भांडवलशाही, समाजवाद किंवा ज्यू यांच्याकडून होणार नाही. हिटलरला फक्त एकच धोका आहे : लोकशाही, व तिची आधारभूत तत्त्वे. त्याचा तो नाश करू शकला, तर तो कशाचाही नाश करू शकेल. ज्याची अनेक जण हेटाळणी करतात, तर काही जणांच्या दृष्टीने तो निरर्थक आहे अशा या शब्दातच संस्कृती ज्याच्याशिवाय असूच शकणार नाही असे सातत्य व उत्क्रांति, प्रगति व स्थैर्य यांचे प्राणतत्त्व सामावलेले आहे. ”[१]

लोकशाही या शब्दाची आज हेटाळणी होत नाही; पण प्रत्येक राष्ट्र कुठल्या ना कुठल्या स्वरूपाची लोकशाही चालवीत असल्याचा दावा करीत आहे आणि सर्वच दावे खरे असणे शक्य नाही, त्यामुळे तो शब्द निरर्थक बनण्याचा धोका मात्र निर्माण झाला आहे. सध्या ‘ लोकांची लोकशाही ’, ‘ पायाभूत लोकशाही ’, ‘ सहभागी लोकशाही ’ अशा अनेक प्रकारांविषयी आपण ऐकतो, शिवाय आपली पाश्चिमात्य देशातली साधी सरळ लोकशाही आहेच. अमेरिकन मदत मिळायला पात्र ठरावे म्हणून काही हुकूमशाह्या देखील स्वतःला लोकशाहीवाले म्हणवून घेत आहेत. यापैकी कुठल्या तरी एका अर्थाने आपल्या देशात लोकशाही आहे असा जगातल्या प्रत्येक देशाचा दावा आहे. अन् तरी रूसी द सेल्स लिहीत होता त्या १९४२ साली निम्म्या जगावर कबजा संपादन केलेल्या आपल्या शत्रूंचे ‘ लोकशाही मृत्युपंथाला लागली असून ती कालबाह्य झाली आहे ’ याविषयी अगदी एकमत होते. जगात यशाइतके काहीच यशस्वी होत नाही !

लोकशाह्यांच्या या रंगीबेरंगी प्रदर्शनात आपण दोन मुद्द्यांबाबत रेखीवपणे विचार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपणा पाश्चिमात्यांच्या अनुभवाच्या संदर्भात या शब्दाचा आपल्याला कुठला अर्थ अभिप्रेत आहे ? व दुसरे म्हणजे त्याचे सनातन व सार्वकालिक पैलू कोणते, आणि आपली परिस्थिती, जीवनपद्धती वगैरेमुळे निर्माण झालेले कोणते ? दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आपण नीट देऊ शकलो तर नव्या राष्ट्रांना अर्थपूर्ण वाटेल असे काहीतरी आपण देऊ शकू व त्यांच्याकडून घेऊही शकू.

---

१. रौल द रूसी द सेल्स्– दी मीनिंग ऑफ टुमॉरो.

‘ तिसऱ्या जगात ’ संसदीय किंवा अध्यक्षीय पद्धतीची द्विगृही विधिमंडळा-सकट सही सही नक्कल असली पाहिजे असे आपण म्हणतो तेव्हा ते चिडते. आपल्या प्रश्नांपेक्षा त्यांचे प्रश्न फारच वगळे आहेत, म्हणून आपली उपाययोजना जशीच्यातशी स्वीकारण्याविषयी त्यांच्या मनात संशय आहे. पण प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य मिळाले तर हवे आहे; आणि लोकशाही राज्यपद्धती म्हणजे जास्तीतजास्त स्वातंत्र्य मिळविण्याचे व टिकविण्याचे साधन होय. दुसरा, ‘ टिकविण्या’चा भाग अधिक कठीण आहे, नव्या देशांना तसा अनुभवही येऊ लागला आहे म्हणून आपल्या पद्धतीच्या लोकशाहीत असलेले अनेकविध अंगभूत धोके कोणते, ती पूर्णतया सुरक्षित किंवा स्थिर केव्हाच कशी होऊ शकत नाही, ती किती कठीण व फसवी आहे, मिळाली तर जतन करून ठेवणे किती अवघड आहे, आणि नसेल तर मिळविणे कसे अशक्यप्राय आहे, तिचे सदासर्वकाळ सर्व बाजूंनी पुन्हा पुन्हा का संरक्षण करावे लागते,–या सगळ्याचे जर आपण वर्णन करू शकलो तर आपल्या शेजाऱ्यांना त्याचा काहीसा उपयोग होऊ शकेल. तसेच त्यांच्या अनेकविध, प्रचंडकाय प्रश्नांचे स्वरूप काय आहे, ते सोडविण्यासाठी त्यांची कशी झटापट चालली आहे याचे बारकाईने निरीक्षण केले तर आपलेही बरेच शिक्षण होईल. सरकार चालविणे जिकीरीचे आहे, ते समाधानकारकपणे कधीच चालविता येणार नाही; पण त्यात सुधारणाच करू नये यासाठी हे कारण पुरेसे नाही.

व्याख्येचा शोध करताना आपण अथेन्स मधील ‘ शुद्ध ’ लोकशाही पासून सुरुवात केली पाहिजे. तेथे प्रत्येक नागरिक हा विधिमंडळाचा सभासद असे व सेनापती आणि न्यायाधीश यांची मतदानाच्या पद्धतीने निवड करण्याचा त्याला अधिकार असे. दिसते तितकी काही ही पद्धती शुद्ध नव्हती, कारण लोकसंख्येपैकी नव्वद टक्के लोक गुलाम, परदेशी किंवा स्त्रिया होत्या, ज्यांना सार्वजनिक जीवनात भाग घेता येत नसे.

तथापि अथेन्सची लोकशाही पाश्चिमात्यांसाठी दोन दृष्टींनी उपकारक ठरली. स्वातंत्र्य, व्यक्तिवाद याचा अर्थ तिने शिकविला, विचारविवेक व टीका करणे या शस्त्रांचे सामर्थ्य ध्यानी आणून देऊन त्यांच्या आधारे जुलूमशहा, एकाधिकारशाही, सर्वंकष-सत्तावादी यांचा प्रतिकार करण्याचे व योग्य रीतीने समाजाचा कारभार कसा हाकावा याचे शिक्षण अथेनियन लोकशाहीने दिले. आपणाला त्याचे भान असो वा नसो, वारंवार डोके वर काढणाऱ्या जुलमी सत्तेला आपण करीत असलेला अथक विरोध पेरिक्लीस, सॉक्रटीस व डेमॉक्रिटस यांनी प्रतिपादलेल्या कल्पनांच्या संरक्षणाच्या प्रेरणेतून निर्माण झालेला आहे. दुसरे, काय करू नये व स्वतंत्र लोकांच्या हातूनदेखील घडणाऱ्या भयानक प्रमादांपासून आपले संरक्षण कसे केले पाहिजे याचेही पाठ अथेनियन लोकशाहीकडूनच मिळाले आहेत.

त्या लोकशाहीच्या वैभवशाली बाजूचा प्रथम विचार करू. स्मशानभूमीवरील आपल्या सुप्रसिद्ध भाषणात पेरिक्लीस म्हणाला होता, "धोरणाची आखणी व मांडणी मोजकेच लोक करत असतील, पण आपण सगळे त्याची चिकित्सा करू शकतो." हा लोकशाही राज्यपद्धतीचा मूलाधार आहे. आपण सगळेजण युक्तिवाद करू शकतो, टीका करू शकतो, मित्रांच्या साहाय्याने धोरणावर हल्ला करू शकतो किंवा एखाद्या धोरणाचा पुरस्कारही करू शकतो. स्वीकारलेल्या धोरणासंबंधी आपण सगळे जबाबदार बनू शकतो. आपण सगळे नागरिक होऊ शकतो. आपण कसे वागतो यावर भवितव्य अवलंबून आहे, एखाद्या इतिहासकाराच्या ( apocalyptic ) भाकितांवर किंवा जुलूमशहाच्या लहरींवर ते अवलंबून नाही. आपण जे करू तसे होऊ शकू. आपल्यापैकी पुरेशा संख्येने लोक जे काही करतील त्यावर आपल्या भोवतालचे जग चांगले किंवा तिरस्करणीय बनेल. स्वातंत्र्याचे हेच फार मोठे ओझे आहे, जे काही घडेल त्याचे श्रेय व दोष आपला असेल, त्याचे खापर दैवावर फोडता येणार नाही. अथेनियन्स नागरिक व तेथे राहणारे काही परदेशी यांनी पहिल्यांदा ही गोष्ट इ. स. पूर्वी पाचव्या शतकात सांगितली. त्यांचे शब्द खरे ठरावेत यासाठी आपला सतत प्रयत्न चालला आहे– कधी कधी तर अजिबात आशा नसतानासुद्धा !

थुसिडायडीस- (जो उजव्या विचारसरणीचा होता व ज्याचा लोकशाहीवर विश्वास नव्हता) ने नमूद करून ठेवल्याप्रमाणे पेरिक्लीस त्या भाषणात पुढे म्हणाला, "आपल्या राज्यघटनेला लोकशाही स्वरूपाचे म्हणण्याचे कारण सत्ता थोड्यांच्या हातात नसून बहुसंख्यांच्या हातात आहे. व्यक्तींच्या खाजगी भांडणाबाबत सर्वांना समान न्याय मिळण्याची तरतूद आपल्या कायद्याने केली आहे ........ सार्वजनिक जीवनात प्रत्येकाला मुक्त संचाराचा अधिकार आहे, आणि दैनंदिन जीवनातही एक-दुसऱ्याच्या संबंधात आपण तीच सवय रुजवली आहे. आपला शेजारी स्वतःच्या इच्छेनुसार आनंद उपभोगीत असेल तर त्याच्याकडे आपण रागाने पाहणार नाही किंवा कटु शब्द उच्चारणार नाही ......... आपले शहर हे केवळ कष्टाचे केंद्र नाही. मनोरंजनाच्या इतक्या सोयी दुसरीकडे क्वचितच असतील. क्रीडास्पर्धा आणि होमहवन वर्षभर चालू असते, सार्वजनिक इमारतीचे सौंदर्य हृदयाला उत्तेजित करते आणि डोळ्यांना सुखावत असते. आपण उथळपणा न करता सौंदर्याची उपासना करतो, अमानुष कृत्ये न करता समंजसपणाने वागत असतो ...... आपले नागरिक वैयक्तिक व सार्वजनिक कर्तव्ये पार पाडीत असतात, आपापल्या व्यापातील व्यग्रतेमुळे शहराच्या कारभाराकडे आपण कुणालाही दुर्लक्ष करू देत नाही. सार्वजनिक जीवनापासून अलिप्त राहणाराला आपण निरुपद्रवी नव्ह तर निरुपयोगी समजतो ... ... ... इथे चिरनिद्रा ( Sepulchre ) घेत असलेली माणसे अशी

होती व त्यांना स्फूर्ति देणारे शहर हे असे आहे ........ इथे अनेक प्रसिद्ध पुरुष होऊन गेले; त्यांची नावे या त्यांच्या जन्मभूमीतल्या दगडावरच खोदली आहेत असे नव्हे, दूरवर पसरलेल्या लोकांच्या जीवनात ते अदृश्यपणे वावरत आहेत. ”

हे सगळे इतके चांगले आहे की ते सर्व खरे असणे कठीण आहे. पेलोपोनेशियन युद्धाच्या पहिल्या वर्षी धारातीर्थी पडलेल्या वीरांच्या स्मृतीला वंदन करण्याचा तो प्रसंग असल्याने पेरिक्लीसने ते भाषण अथेन्सच्या सर्व जनतेला उद्देशून केले होते. म्हणून त्यातली अतिशयोक्ती क्षम्य मानली पाहिजे. पण त्यावेळचे वातावरण कुठल्या कल्पनांनी व आशांनी भारलेले होते याची कल्पना त्या अतिशयोक्तीतून येते. आपल्या जीवनात त्या कल्पना–आशांचे धागेदोरे विणले गेले आहेत, या अर्थाने मृत वीरात्म्यांची स्मृती जतन केली जात आहे.

पाखंडी, अपवित्र असल्याच्या आरोपावरून (स्वतः विचार करणाऱ्या प्रत्येकावर असा आरोप केला जाऊ शकतो ) सॉक्रेटीसवर खटला भरण्यात आला. त्याने कोर्टाला उद्देशून म्हटले : “ देवाने या शहरासाठी नेमलेला मी संरक्षक आहे, दिवसभर सर्वत्र हिंडून मी तुम्हा लोकांना भेटतो, जागे ठेवतो, चांगल्या गोष्टी करायला प्रवृत्त करतो, वाईट गोष्टींसाठी तुमची निर्भर्त्सना करतो. माझ्यासारखा दुसरा संरक्षक तुम्हाला सहजासहजी मिळणार नाही, म्हणून तुम्ही माझी सुटका केली पाहिजे. ......... तुम्ही मला घाई घाईने देहान्ताची शिक्षा दिली तर, देवाने काळजी घेऊन दुसरा संरक्षक न पाठविल्यास तुम्ही आयुष्यभर झोपी जाल. ”

देहान्ताची शिक्षा फर्मावली गेल्यानंतर तो परत ते सूत्र पुढे चालवतो : “दररोज सद्गुणाची चिकित्सा करणे, इतर प्रश्नांची चर्चा करणे ( जे मी करीत असे ), तुमची व माझीसुद्धा तपासणी करणे ही माणसासाठी सगळयात चांगली गोष्ट आहे असे माझे म्हणणे आहे, कारण जे तपासले जात नाही ते जीवन जगणाऱ्या लायकीचे नाही. ... ... ... आपल्या आयुष्याचा जाब द्यावा लागू नये म्हणून तुम्ही हे कृत्य ( देहान्ताचे शासन फर्मावणे ) केले आहे. ”

संरक्षक आणि परीक्षित जीवन हे लोकशाहीचे मूलाधार होय. कुठलीही गोष्ट टीकेच्या पलीकडची मानायची नाही. मोठी माणसे अमुक एक गोष्ट खरी आहे असे म्हणतात म्हणून ती तशी मानायची असे नाही. पुरेशा युक्तिवादानंतर व चर्चेनंतरच धोरण स्वीकारले जावे. अशा प्रकारचे स्वातंत्र्य म्हणजे भलताच निग्रही पंतोजी होय. माणसांना त्याचा ताप वाटू लागतो, शेवटी ते त्याचा त्याग करतात. मग ते एकाकी बनतात व परत स्वातंत्र्याचा शोध घेऊ लागतात.

अथेनियन लोकांनी सॉक्रेटीसला ठार मारले याचे आपल्याला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. विचार व टीका करण्याचे अबाधित स्वातंत्र्य आणि सर्व माणसांच्या अतिशय जिवलग पूर्वग्रहांबाबत देखील संशय व्यक्त करण्याचा अधिकार यांचा हिरीरीने पुरस्कार करणाऱ्या पाश्चात्त्य इतिहासातील पहिल्या पिढीचा सॉक्रेटीस हा प्रतिनिधी होता. आजदेखील आपण आपल्या संरक्षकांचा छळ करीत असतो हे लक्षात घेतले म्हणजे मनोधाडस करणाऱ्यांच्या लांबलचक मालिकेतील हा ज्येष्ठ पुरुष सत्तर वर्षे कसा काय जिवंत राहू शकला याचेच आश्चर्य वाटते.[1]

अशा थोर पुरुषांच्या स्फूर्तिदायक वक्तव्यावरून आपली नजर अथेन्सच्या दैनंदिन व्यवहाराकडे आपण वळवली म्हणजे दुःखद अधःपतनाचे दृश्य आपल्याला दिसते व स्वतंत्र समाजाचा कारभार कसा चालवू नये याचे धडे मिळतात. थुसिडायडीस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांची अथेन्सचे चित्र रंगवण्यातली दृष्टी पूर्वग्रहदूषित असू शकेल. यापैकी पहिले दोघेजण लोकशाहीविरोधी पक्षातलेच होते. अतिशयोक्तीचे अस्तित्व मान्य करूनसुद्धा या तिघांच्या लिखाणातून उमटणारे अथेन्सचे चित्र आततायी अपव्ययाचे दर्शन घडविते.

पेलोपोनेशियन युद्धाच्यावेळी (इ. स. पू. ४३१–४०४) अथेन्समध्ये सर्व सत्ता लोकायत्त विधिमंडळाच्या हातात होती. पेरिक्लीसच्या त्या नगरीत प्रौढ पुरुष नागरिकांची संख्या सुमारे चाळीस हजार होती. न्यायाधीशांना तात्पुरते बडतर्फ करण्याचा व त्यांची कोर्टासमोर चौकशी करण्याचा अधिकार इतक्या मोठ्या समुदायाला, किंवा त्यापैकी ज्यांना उत्पात घडविण्यात रस वाटे अशांच्या हातात होता. कार्यकारी मंडळाला "लोकांच्या" इच्छांची अंमलबजावणी करण्यापुरता अधिकार होता. एके काळी प्रभावशाली असलेल्या 'पाचशे जणांचे मंडळा'च्या हातून सत्ता गेलेली होती व विधिमंडळ स्वीकारील, बदलील किंवा नाकारील अशा धोरणांची फक्त चर्चा करण्याचे

---

१. 'ॲपॉलॉजी 'तले विचार मांडणारा (ज्याच्यातून वरील उतारे घेतले आहेत) सॉक्रेटीस व 'रिपब्लिक' मध्ये प्रगट होणारा सर्वंकषसत्तावादी सॉक्रेटीस यांचा मेळ कसा घालायचा या चर्चेत आपण पडण्याचे कारण नाही. या दोन्हीतले संवाद प्लेटोने सॉक्रेटिसाच्या मृत्यूनंतर लिहिलेले असल्याने 'ॲपॉलॉजी' व 'क्रिटो' यात खुद्द सॉक्रेटिसाचे शब्द प्लेटोने उद्धृत केले व रिपब्लिकमध्ये त्याने सॉक्रेटिसाच्या तोंडी स्वतःच्या कल्पना घातल्या असे मानणे हा मेळ घालण्याचा एक प्रकार होऊ शकतो. पण आपल्या दृष्टीने ते महत्त्वाचे नाही. एकदा बोललेले वा लिहिलेले शब्द परत घेता येत नसतात. ॲपॉलॉजी व क्रिटो यांच्यातील सॉक्रेटीसच लोकशाहीवादी मानवाला आतापर्यंत प्रेरणा देत आला आहे.

त्याच्या हाती राहिले होते. मतदानाने निवडलेल्या सहा हजार सभासदांच्या न्यायमंडळाच्या हाती कायद्याच्या अंमलबजावणीचे काम सोपवलेले होते. 'न्यायाधीश' 'ज्यूरी' किंवा 'न्यायालये' (त्यांना काहीही म्हटले तरी चालेल ) पाचपाचशेचा गट करून वेगवेगळया खटल्यांचे काम चालवीत व निवाडा देत. न्यायाधीश (मॅजिस्ट्रेट) खटल्याचे स्वरूप त्यांच्यापुढे मांडत, पण त्या पुढच्या कामकाजात मात्र भाग घेत नसत. न्यायमंडळ साध्या बहुमताने निवाडा देत असे.

इ. स. पू. ४४३ पासून इ. स. पू. ४२९ मध्ये मृत्यू येईपर्यंत पेरिक्लीस या चमत्कारिक सरकारचा सर्वमान्य नेता होता. दरवर्षी सेनापती म्हणून तो निवडला जाई, गैरशिस्त विधिमंडळात त्याच्या शब्दाला मानही होता पण त्याच्या अंगी मुरलेल्या हट्टाग्रहाला पायबंद बसून विवेकाला स्थान मिळेल इतका मात्र त्याचा प्रभाव नव्हता. दरम्यानच्या काळात अथेन्स शहर त्याने खूप सुंदर बनविले; त्यामुळे तरी तेथील रहिवाश्यांच्या (गुलाम व स्वतंत्र दोन्ही) चित्तवृत्ति उदात्त बनतील अशी त्याला आशा होती. कवींनी तर त्या शहराला जगाच्या आश्चर्यनगरीची प्रतिष्ठा मिळवून दिली. पण तिथल्या 'शुद्ध' लोकशाहीने माणसांच्या शक्तीला सत्कार्याप्रमाणे आत्यंतिक अपकृत्यासाठी व स्वनाशासाठीही अवसर प्राप्त करून दिला— ज्यामुळे पूर्व–भूमध्यसामुद्रिक प्रदेशातील लोक अथेन्सचा अतिशय द्वेष करू लागले. मित्र राष्ट्रांना त्याने मांडलिक प्रांताप्रमाणे वागविले; 'जुलमी शहर' म्हणून त्याची दहशत सर्वत्र निर्माण झाली. पश्चिम-भूमध्य-सामुद्रिक प्रदेशाबरोबर त्याचा व्यापार वाढला, तशी त्याची आत्मप्रौढी व स्वार्थीवृत्तीही असह्य होईपर्यंत बळावली. एकेकाळी त्याचे मित्र असलेले पण आता त्याचा तिरस्कार करणारे मांडलिक देश मदतीसाठी स्पार्टा या शहराकडे नजर वळवू लागले.

परिणामतः जे पेलोपोनेशियन युद्ध झाले त्याचे स्वरूप अथेन्स व स्पार्टा यांच्यातील साम्राज्यस्पर्धेपुरते मर्यादित नव्हते. थुसिडायडिसने लिहून ठेवले आहे की युद्धाच्या सुरुवातीच्या काळात "सबंध ग्रीक ( हेलेनिक ) जग भयानक गोंधळलेल्या स्थितीत सापडले होते; प्रत्येक शहरात लोकशाहीचे सेनानायक व मिरासदारांचे प्रमुख यांच्यात झगडा चालला होता, लोकशाहीवाले अथेनियन्सची मदत घेऊ पहात होते, मिरासदार लॅसडॅमोनियन्सना निमंत्रण देऊ इच्छित होते." आश्चर्य असे की खुद्द अथेन्समध्ये देखील असाच झगडा चालला होता. युद्ध चालू असतानाच अल्सिबियाड्सूसारखे साहसी वीर व मिरासदारी पक्षाचे क्रीटीयस् सारखे नेते यांची स्पार्टाबरोबर खलबते- कारस्थाने चालली होती. मुख्यतः या फंदफितुरीमुळे जेव्हा युद्धात पराभव झाला तेव्हा मात्र योगायोग असा की अल्सिबियाड्सूच्या थोर शौर्यगुणांची अथेन्सला

गरज भासल्याने त्याला परत येण्याविषयी पाचारण करण्यात आले. असे गृहीत धरायला हरकत नाही की इ. स. पूर्व पाचव्या शतकातील ग्रीकांना फंदफितुरी हा राजकारणाचा सनदशीर मार्ग वाटत होता.

युद्धाच्या तिसऱ्या वर्षी प्लेगमुळे पेरिक्लीसचा मृत्यू झाला नसता तर अथेन्सच्या लोकशाहीचे वर्तन अधिक चांगले झाले असते; प्रत्यक्षात मात्र झोटिंगशाही व क्रौर्य याचा तेथे नंगानाच झाला. ४१५ मध्ये जेव्हा युद्धात जवळ जवळ जय मिळाला तेव्हा सिसिलीपर्यंत आपले विजयक्षेत्र वाढविण्याला विधिमंडळाने अल्सिबियाड्सला प्रोत्साहित केले, पण त्यानंतर मात्र त्याला आपल्या सर्व सामर्थ्यानिशी पाठिंबा देण्यात कच खाल्ली. परिणामतः दारुण पराभव झाला, दबलेल्या "दोस्त" देशांनी उठाव केला, त्यामुळे कसलीही आशा राहिली नाही.

लोकशाहीत सुप्त स्वरूपात असणाऱ्या क्रौर्याचा प्रखर इशारा अथेन्सने पराभवापूर्वीच दिला होता. चांगल्या व कालांतराने मान्य झालेल्या संस्थांचे संरक्षण नसेल तर "लोक" तशा अनिर्बंध अवस्थेत अतिशय भयभीत आणि म्हणूनच रक्तपिपासु समुदायाचे स्वरूप धारण करतात हे दिसून आले.

पेलोपोनेशियन युद्धाच्या सोळाव्या वर्षी स्पार्टाच्या संरक्षणाखालील पण युद्धात तटस्थ असलेल्या मेलोस या छोट्याशा बेटावर अथेन्सने हल्ला केला. राजकीय व लष्करी दृष्ट्या काही महत्त्व नसतानासुद्धा अथेनियन्सनी केवळ लोकांची इच्छा म्हणून मागणी केली की मेलोसने स्पार्टाशी संबंध तोडावेत व अथेन्सचे दोस्त राष्ट्र असल्याची (म्हणजेच गुलामी स्वीकारण्याची) घोषणा करावी. अथेनियन राजदूत व मेलोसचे नागरिक यांच्यातील संवाद थुसिडायडिसने लिहून ठेवला आहे. त्यातले अगडबंब शब्द वगळले तर हिटलर व त्यांचे बळी यांच्यातलाच तो संवाद होय. उदाहरणार्थ,

**अथेनियन्स :** व्यवहारी माणसे या दृष्टीने आमच्याप्रमाणे तुम्हालाही माहीतच आहे की न्यायाचा प्रश्न समबल पक्षात उपस्थित होत असतो. बलशाली-पक्ष मन मानेल ते करू शकतो, दुर्बलांना शरणागती पत्करण्यावाचून गत्यंतर नसते ... आमची इच्छा आहे की तुम्ही आमची प्रजा व्हावे. तुमच्या स्वतःच्या कल्याणाबरोबर आमच्या हितासाठीही तुम्ही जिवंत रहावे अशी आमची भावना आहे.

**मेलियन्स :** आम्ही युद्धाच्या बाहेर राहून तुमचे मित्रही राहू शकू अशी व्यवस्था तुम्हाला मान्य होऊ शकणार नाही का ?

**अथेनियन्स :** नाही ... निसर्गाचा नियमच असा आहे की जी माणसे बलवान असतात ती दुसऱ्यावर अधिकार गाजवितात. हा देवाघरचाच न्याय

> आहे असा आमचा विश्वास आहे ...... लॅसेडेमन लोकांकडून तुमच्या अपेक्षा व ते तुम्हाला मदत करतील ही तुमची आशा पाहून तुमच्या निरागसतेविषयी तुमचे मनःपूर्वक अभिनंदन. पण तुमच्या मूर्खपणाचे कौतुक करणे आम्हाला शक्य नाही.

तरीही मेलियन लोकांनी स्पार्टावर विश्वास ठेवून आपला प्रतिकार चालू ठेवला. त्यांच्या प्राचीन व सुंदर शहराचा लगेच ताबा घेण्यात आला. स्पार्टाने काही मदत केली नाही. अलिसबियाड्सच्या सूचनेनुसार अथेन्सच्या विधिमंडळाने ठरविले की मेलोन्समधील सर्व प्रौढ पुरुषांना ठार मारण्यात यावे, स्त्रिया व मुले यांना गुलाम म्हणून विकण्यात यावे. नंतर त्या बेटावर वसाहत करण्यासाठी अथेन्सने पाचशे नागरिकांना पाठविले.

पार्लमेंटमधील आपल्या सुरुवातीच्या काळात विन्स्टन चर्चिलने भाषण केले त्यावेळी त्याच्या नजरेसमोर मेलोन्स दुर्दैव असावे. तो म्हणाला, “मंत्रिमंडळापेक्षा लोकशाहीची सूडबुद्धी अधिक तीव्र असते. राजेलोकांच्या युद्धापेक्षा लोकांची युद्धे अधिक भयंकर असतील.” ‘लोकांच्या युद्धां’पैकी पहिले युद्ध सुरू होण्याच्या तेरा वर्षे आधीचे म्हणजे इ. स १९०१ सालचे ते उद्गार आहेत. त्या पहिल्या ‘लोकयुद्धा’ने आपला समाज जवळ जवळ धुळीला मिळाला.

प्लेटोचा जन्म पेलोपोनेशियन युद्धाच्या तिसऱ्या वर्षी झाला. लोकशाही म्हणजे जुलूमशाहीचा व स्वातंत्र्य म्हणजे गुलामगिरीचा अव्यवस्थित जन्मदाता होय, असे त्याचे मत बहुधा त्यामुळेच झाले असावे. त्याने लिहिले आहे : “दुसऱ्या कशातून नव्हे तर लोकशाहीतूनच जुलूमशाहीची स्थापना होत असते, आणि मला वाटते की अत्युच्च प्रमाणातील स्वातंत्र्यातूनच महाभयानक गुलामगिरीचा जन्म होतो.”

राज्यघटनेचे बंधन नाही, न्यायालयांना जाब देण्याचा दंडक नाही, अशा सर्वसत्ताधारी व सार्वभौम आणि तितक्याच लहरी असलेल्या बहुमताच्या मतदानाने अधिकारावर येणाऱ्या सरकारविषयी प्लेटो लिहीत होता हे आपण लक्षात घेतले पाहिजे. लोकशाहीचा असा अर्थ घेतल्याने सर्वंकषसत्ताधारी शासनसंस्थेच्या निष्कर्षाप्रत पोहोचणे अपरिहार्य होते. कुठल्याही दिवशी, कुठल्याही घटकेला लोक आपल्याला पाहिजे ते म्हणजे काय वाटेल ते करू शकतात; म्हणजेच जुलूमशहाच्या हाती एकवटणारी सत्ता योग्य मार्गानेच मिळालेली असते. कारण हेकट, दुष्ट बहुमतानेच त्याला निवडून दिलेले असते. तिसऱ्या नेपोलियनने स्वतःला सम्राट व हिटलरने स्वतःला प्रतिईश्वर याच मार्गांनी बनविले. १९३३ साली झालेल्या एका निवडणुकीने हिटलर नाझीपक्षाला हजार वर्षांसाठी सत्तेवर बसवू पहात होता. वेगळ्या शब्दात मांडायचे तर

लोक इतके सार्वभौम आहेत की ते मतदानाच्या मार्गाने स्वतःला गुलाम बनवू शकतात. लोकायत्त सरकारच्या मार्गातील हा अतिशय मोठा व स्पष्ट धोका आहे. दीर्घकालीन मूर्खपणापासून लोकांना वाचविणे कुठल्याच पद्धतीला शक्य नाही; पण शुद्धीवर असलेल्या पाश्चात्त्य लोकशाही समाजांनी अकस्मात येणाऱ्या वेडाच्या लहरीपासून स्वतःला बचावण्यासाठी काही उपाययोजना केली आहे खरी.

पेलोपोनेशियन युद्ध संपल्यानंतर एकोणीस वर्षांनी ॲरिस्टॉटल जन्मला. भीती व अपयशाच्या वेळी अथेन्सच्या विधिमंडळातील रानटी देखावे त्याने पाहिले नव्हते. त्यामुळे तो लोकशाहीविषयी अधिक समतोलपणे विचार करू शकला, तरी त्यालाही लोकशाहीविषयी विशेष सख्य वाटत नाही. त्याच्या ग्रीसमधील अनुभवावरून त्याने असा निष्कर्ष काढला की सुवर्णमध्य राखणे लोकशाहीला शक्य नाही, ती नेहमी एकान्तिक टोकाला जाणार, त्यामुळे अराजकात पर्यवसान होणे अपरिहार्य आहे. तरी त्याने इतके मान्य केले आहे की लोकशाहीने कायद्याचे बंधन व सार्वभौमत्व स्वीकारले तर ती वरदायिनी ठरू शकेल. कायद्याच्या प्रभुसत्तेचा विचार आपण करायला लागलो की दुर्दैवी ग्रीक लोकशाह्यांचे युग मागे पडते, आणि सनदशीर सरकारच्या आधुनिक कल्पनेपाशी आपण येऊन पोहोचतो.

ग्रीकांचा निरोप घेण्यापूर्वी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अपयश, गोंधळ, बजबजपुरी, क्रौर्य हे धोके पत्करून सुद्धा अथेन्समधल्या बहुतेक लोकांनी लोकशाहीचाच पाठपुरावा केला आहे, दुसऱ्या कुठल्याही पद्धतीचा स्वीकार करायला त्यांनी नकार दिला आहे. लोकशाही मिळावी, टिकावी व पेलोपोनेशियन युद्धातील पराभवानंतर स्पार्टाने मिरासदारांची सरंजामशाही लादली, त्यानंतर लोकशाही पुनरुज्जीवित व्हावी यासाठी त्यांनी सतत लढा दिला आहे. त्या तीस मिरासदारात प्लेटोचा चुलता व चुलतभाऊ होता. आपले जन्मदाते शहर म्हणजे जणू काही युद्धात मिळालेली लूट होय असे त्यांनी वर्तन केले. सुमारे अठरा महिने फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या दहशतराज्याला लाजवील अशा प्रकारचा खून व लुटालुटीचा तेथे नंगानाच चालला होता. शेवटी लोकशाहीवाद्यांनी त्या तीस जणांना ठार मारून लोकशाही राज्यघटनेचे पुनरुज्जीवन केले. सॉक्रेटीसला ठार मारून त्यांनी आपल्या अपयशाला कालिमा लावायला नको होता असे आपल्याला वाटते; पण प्लेटो व त्याचे नातेवाईक यांच्याबरोबरचा सॉक्रेटीसचा स्नेहसंबंध त्याच्याआड आला असावा. पूर्वीच्या लोकशाहीवाद्यांपेक्षा या लोकशाहीवाद्यांचे वर्तन खूपच चांगले होते. सत्ता व वैभव कमी झाल्याने मोह व आकर्षणे कमी राहिली असतील हेही कदाचित त्याचे कारण असेल. मॅसेडोनच्या फिलिपने चेरोना येथे ३३८ साली नाश करीपर्यंत तीन पिढ्यांपावेतो लोकशाहीचा कारभार चांगला चालला होता.

# – २ –

सनदशीर सरकारच्या दिशेने प्रगती करायला एखाद्या प्राचीन राष्ट्राला बराच वेळ लागेल. नव्याने आपले घर सजविण्याऱ्या नव्या राष्ट्राला मात्र आपले उद्दिष्ट काळजीपूर्वक ठरवावे लागते व अराजकाच्या चक्रात सापडू नये यासाठी ते उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीने सर्व इच्छाशक्ती वापरावी लागते. ब्रिटनने आपली अलिखित घटना आठ शतके प्रयोग–चुकांच्या मार्गाने हळुहळू बनवली, तर युनायटेड स्टेट्सच्या नेत्यांनी मात्र १७८७ साली लिखित घटना तयार करण्याकडे काळजीपूर्वक लक्ष पुरविले.

त्या दस्तऐवजाची चर्चा करण्यासाठी फिलाडेल्फिया येथे जमलेले अमेरिकन हे त्यापूर्वी इंग्लंड व फ्रान्समध्ये सरकारच्या स्वरूपाविषयी दीडशे वर्षे चाललेल्या विचार-मंथनाचे वारसदार होते. खानदानी जगाचा अनुभव व तत्त्वसिद्धान्त यांचाही वारसा त्यांना लाभलेला होता. प्लेटोने वर्णन केलेला मिरासदारी सरंजामशाही–> लोकशाही–जुलूमशाही हा क्रम जेथे प्रत्यक्षता घडला त्या मध्ययुगीन इटालीतील स्वतंत्र शहराचाही अमेरिकन नेत्यांनी अभ्यास केलेला होता. ते शहाणे व समजदार लोक होते. स्वातंत्र्य व सनदशीरपणा प्राप्त करण्यासाठी धडपडणाऱ्या प्रत्येक नव्या राष्ट्राला उद्बोधक ठरावेत असे त्यांचे त्यावेळचे वादविवाद व आपण स्वीकारलेल्या पद्धतीचे समर्थन करणारे नंतरचे युक्तिवाद आहेत.

फिलाडेल्फियात जमलेले सद्गृहस्थ लोकशाहीविषयी फार बोलत नसत, आणि बोलत त्यावेळी हेटाळणीच्या सुरात उल्लेख करीत, कारण त्यांच्यासमोर मुख्यतः ग्रीकांच्या लोकशाहीची उदाहरणे होती. राज्यघटनेच्या समर्थनार्थ बोलताना अलेक्झांडर हॅमिल्टन म्हणाला, " प्राचीन लोकशाह्यात लोक स्वतःच चर्चा–वादविवाद करीत असले तरी चांगल्या सरकारचे एकही लक्षण त्यात दिसून येत नाही. त्यांचे स्वरूपच मुळी जुलूमशाहीचे होते. "

अमेरिकन प्रजासत्ताकाच्या जन्मदात्यांनी आपले सर्व विचार स्वातंत्र्यावर केंद्रित केले होते. त्यांच्यापैकी काहीजण समतेविषयीही बोलत; पण बहुतेकजण गटेच्या पुढील उद्गारांशी सहमत होते. " समता व स्वातंत्र्य दोन्ही एकाचवेळी द्यायचा प्रयत्न करणारे घटनाकार किंवा क्रांतिकारक लोक स्वप्नाळू तरी असले पाहिजेत किंवा दांभिक तरी असावेत." मात्र अमेरिकेत सामाजिक लोकशाहीचे वातावरण होते ( अनेकजणांप्रमाणे आपणही येथे गुलामांना नजरेआड करावे.). अटलांटिकच्या किनाऱ्यापासून फार दूर नसलेल्या सरहद्दीवरील जीवनात सामाजिक लोकशाही व्यवहारात रूढ झालेली होती. लोकशाहीचा प्रसार होत गेला व सरकारच्या कार्यक्षेत्रावर तिने आक्रमण केले त्यावेळी

आपल्या हिताच्या दृष्टीने राज्यघटनेचा स्वीकार करणे तिला मुळीच जड गेले नाही. ही मोठी गंमतशीर घटना आहे: स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी बनविण्यात आलेली घटना विस्तारत जाणाऱ्या लोकशाहीला आत्मसात करून घेऊन, नव्हे तर तिला प्रोत्साहन देऊन तिच्याशी एकरूप होऊ शकली. उलट लोकशाहीच्या उपासनेसाठी समतेवर आधारलेली राज्यघटना मात्र दुर्दैवाने जुन्या सरकारी जुलूमशाहीच्या चक्रात सापडली आणि नागरिकाला गुलाम बनविले.

म्हणून आपण लोकशाहीविषयी एक सर्वसामान्य विधान करू शकतो: लोकशाही हे एक साधन असून स्वातंत्र्य हे साध्य आहे. कारण लोकांना नेहमी स्वातंत्र्यच हवेसे वाटले आहे, व त्यांवर त्यानी सतत आग्रह धरला पाहिजे, कारण स्वातंत्र्याशिवाय माणसांना खऱ्या अर्थाने 'मानव' बनता येत नाही. अमेरिकन इतिहासकार हेन्री कोमॅजर याने ही बाजू अतिशय समर्थपणे मांडली आहे: " चिकित्सा, चौकशी, मतभेद, संघटन, शिक्षण, विज्ञान, साहित्य, राजकारण अशा सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचे व त्याच्या उपयोगाचे आपण संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे. स्वातंत्र्य ही केवळ अदृश्य कल्पना नव्हे, ती दररोजच्या जीवनातील निकडीची गरज आहे......आम्ही केवळ भावनेच्या आहारी जाऊन मतभिन्नतेची जोपासना करतो असे नाही, आम्ही त्याची जोपासना करतो कारण त्याशिवाय आमचे जीवनच अशक्य आहे. खऱ्या अर्थाने खाजगी वा वैयक्तिक व्यवसाय हा फक्त बौद्धिक उपक्रमशीलतेचाच आहे, बाकीचे सर्व उपक्रम त्यावर आधारलेले आहेत. "

असले विचार कम्युनिस्ट जगतात पाखंडी मानले जातात, पण तो केवळ पाश्चात्यांचा वेडेपणा आहे असे नाही. पंडित जवाहरलाल नेहरूंनी लिहिले आहे: " जोपर्यंत व्यक्तीची प्रगती होत नाही तोपर्यंत खरी प्रगती होत नाही, आणि जोपर्यंत व्यक्तीला पुरेसे स्वातंत्र्य देत नाही तोपर्यंत त्याची प्रगती होणार नाही. " संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेचे भूतपूर्व अध्यक्ष लेबेनॉनचे चार्ल्स् मलिक हे त्यांच्याशी सहमत आहेत: " खरी समता व आदरभाव फक्त स्वतंत्र संस्कृतीतच वाढू शकतो— आणि स्वतंत्र संस्कृती ती होय की जेथे शासनसंस्था, पक्ष, राष्ट्र, विचारप्रणाली किंवा अदृश्य तत्त्वज्ञान नव्हे तर मानव व्यक्ति, तिची शान व तिच्या सुप्त शक्ती यांना प्राधान्य दिले जाते. " हे एक निरपवाद सत्य आहे. सनदशीर लोकशाही सरकार ही त्या निरपवाद सत्याच्या दिशेने वाटचाल करायला साह्यभूत ठरणारी एक यंत्रणा होय. ग्रीक लोकशाहीवर टीका करण्याचे कारण तिने वाजवीपेक्षा जास्त स्वातंत्र्य दिले हे नव्हे, तर अल्पकाळ जास्त स्वातंत्र्य दिल्यानंतर ती लोकशाही कोलमडली व नंतर तिने स्वातंत्र्य दिलेच नाही. स्वातंत्र्याची जोपासना करण्यासाठी आज माहीत व

उपलब्ध असलेल्या यंत्रणेत सनदशीर लोकशाही ही सर्वात उत्तम होय. म्हणून आपण तिचे संरक्षण केले पाहिजे. आणि आपले उदाहरण पाहून तिचा प्रयोग करायला नव्या देशांना आपण उद्युक्त केले पाहिजे. पण आपल्याला जर एखादी नवी यंत्रणा आढळून आली की जिच्यामुळे स्वातंत्र्याचे संवर्धन होते तर आपण आपली गुंतागुंतीची यंत्रणा टाकून द्यायला किंवा सुधारायला तयार असले पाहिजे.

वेगळ्या शब्दात मांडायचे तर राजकीय लोकशाही ही आर्थिक व्यवस्थेसारखीच एक व्यवस्था आहे असे मानून आपण पुढील प्रश्न विचारला पाहिजे : "व्यक्तीच्या स्वातंत्र्याला पुरेसे संरक्षण देणारी हीच सर्वोत्तम यंत्रणा आहे काय ?" ख्रुश्चेव्ह जेव्हा म्हणाला की तो व त्याचे देशबांधव आपल्याला गाडून टाकणार आहेत, तेव्हा त्याचा अर्थ असा की पाश्चात्यांच्या संमिश्र अर्थव्यवस्थांपेक्षा सोव्हिएट अर्थव्यवस्था अधिक चांगल्या स्वस्त वस्तु व सेवा मोठ्या प्रमाणावर उत्पादन करू लागेल. स्वयंचलनाच्या दिशेने त्याने सुरू केलेल्या प्रचंड प्रयत्नांचा निर्देश त्याला, करावयाचा असेल व त्याला असे वाटले असेल की त्यामुळे त्याचा देश पाश्चात्यांच्या पुढे बरीच आघाडी मारील. १९५९ साली एका सोव्हिएट अर्थशास्त्रज्ञाने एक अर्थपूर्ण विधान केले : "अभिजात भांडवलशाहीचे वैशिष्टय जर कामाचे यांत्रिकीकरण हे मानायचे तर कम्युनिझममुळे एका नव्या युगाची सुरुवात होईल; ज्यात उत्पादनाचे पूर्णतया स्वयंचलन झालेले असेल."

हे सर्व ठीक आहे, तरीपण आपण विचारले पाहिजे : "तुमच्या स्वयंचलित नंदनवनात स्वातंत्र्याचे काय ? रशियात स्वयंचलनाच्या दिशेने होत असलेली सध्याची प्रगती वरिष्ठांच्या आदेशानुसार व सक्तीने होत आहे. आपणा पाश्चात्यांच्यापेक्षा ते बरीच आघाडी मारू शकतील, कारण उद्योगाचे स्वरूप अंतर्बाह्य बदलताना व कामगारांना एकातून दुसऱ्या उद्योगात घालताना आपण हजारो लोकांशी विचारविनिमय करतो. दुसऱ्या शब्दात, आपण शक्य तितके स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न करतो. कम्युनिझमचे पैगंबर आपल्या कल्पनाराज्यात स्वातंत्र्याला स्थान देत आले आहेत. कम्युनिस्टदेशात प्रत्यक्ष व्यवहारात जर स्वातंत्र्य मिळू लागले, जास्त वस्तु व सेवा यांच्याबरोबर जास्त स्वातंत्र्यही तेथे उपलब्ध होऊ लागले तर मग आपल्या खडखडणाऱ्या व अर्धवट कार्यक्षम पद्धती आपण स्वतःच गाडून टाकायला हरकत नाही.

दैवयोग असा की लोकशाहीतदेखील स्वातंत्र्य दडपले जाऊ शकते. पण इतर कुठल्याही पद्धतीपेक्षा आज घटकेला लोकशाहीत स्वातंत्र्याची गळचेपी कमी होते. विन्स्टन चर्चिलने १९४७ साली हाऊस ऑफ कॉमन्समध्ये भाषण करताना बरोबर म्हटले होते, "असे म्हटले जाते की लोकशाही ही सर्वात वाईट राज्यपद्धती आहे.

ते खरे आहे, पण आतापर्यंत अनुभव घेऊन झालेल्या सर्व पद्धतींचा अपवाद केल्यानंतरच."

लोकशाहीच्या व्याख्येचा अधिक शोध घेण्यापूर्वी ज्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणे तिचा उद्देश आहे, त्यांचा जरा अधिक विचार करू. १९४१ च्या जानेवारीत फ्रँकलीन रूझवेल्टने चार स्वातंत्र्यांची घोषणा केली : (१) भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य; (२) पूजा–उपासनेचे स्वातंत्र्य; (३) गरजांपासून स्वातंत्र्य; (४) भीतीपासून स्वातंत्र्य. पहिली दोन स्वातंत्र्ये सतराव्या व अठराव्या शतकातील क्रांत्यांच्या वारशाच्या स्वरूपात चालत आली आहेत. बाकीच्या दोनचा त्यांचे सर्व गर्भितार्थ लक्षात घेऊन विचार केला तर ती जास्त क्रांतिकारक होत हे लक्षात येईल.

भाषण व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या कक्षेत सध्याच्या विस्तृत साधनांसकट दळणवळणाची सर्व साधने येतात. हे स्वातंत्र्य काही अंशी मर्यादित आहे, काही गोष्टी म्हणण्याचे वा लिहिण्याचे स्वातंत्र्य देऊन चालणार नाही. ऑलिव्हर वेंडेल होम्स यांनी म्हटल्याप्रमाणे भरगच्च थिएटरात विनाकारण 'आग, आग' म्हणून ओरडण्याचा हक्क कोणालाच नाही. सुसंस्कृत व बौद्धिक जीवनासाठी भाषणस्वातंत्र्य अत्यंत आवश्यक असले तरी कधी कधी त्यापासून जीविताला धोका संभवतो. त्याच्याशिवाय आपली प्रगती नाही; पण ते आपल्याला भलतीकडे ओढून नेऊ शकते. प्रत्येक नागरिकाकडून (मग तो साबणविक्रेता असो, वृत्तपत्रसंपादक असो की दूरचित्रवाणीचा केंद्राधिकारी असो) सतत संयमाची व शिस्तीची अपेक्षा आहे, अन्यथा भाषणस्वातंत्र्य हा लोकशाहीचा फार मोठा धोका बनू शकतो.

आपणा सगळ्यांना हे माहीत आहे की अशी शिस्त नियमितपणे पाळली जात नाही. काही वृत्तपत्रमालक व सेनेटर मॅक् आर्थी यांच्या नावामुळे आपल्या लक्षात येईल की ह्या कर्तव्यात आपल्याकडून फार सहजपणे कुचराई होते. वाईट वृत्तपत्रे व वाईट सेनेटर यांना अंशतः आपणही जबाबदार असतोच.

वृत्तपत्रांच्या समस्येला खरोखरी काही उत्तर नाही, कारण तो मानवी स्वभावाचाच प्रश्न आहे. स्वातंत्र्याचा उपयोग (म्हणजे दुरुपयोग) करून वृत्तपत्रे खूपसे नुकसान करू शकतात, करतातही. पण जर त्यांचे उत्पादक व उपभोक्ते सुधारले तर ते सुधारणाही खूप करू शकतात. बंधनांनी आवळलेली वृत्तपत्रे म्हणजे मात्र सर्वनाश होय, आपली स्वातंत्र्याची सर्व आशाच त्यामुळे नष्ट होते.

वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिले पाहिजे कारण त्यामुळे सरकारच्या कारभारावर लक्ष ठेवायला आपल्याला साह्य होते. पण वृत्तपत्राना हे माहीत असते की लोकांना सौंदर्यसम्राज्ञी व उच्चभ्रू समाजाच्या लैंगिक सवयी यांच्यावर लक्ष ठेवणे जास्त आवडते. चिकार खप असलेल्या वृत्तपत्रांनी या ज्ञानाचा उपयोग करू नये अशी अपेक्षा आपण

कशी काय करावी ? बेजबाबदार वृत्तपत्रे पावित्र्याचे धडे देण्याचा आव कमी आणतील एवढीच आशा आपण करू शकतो. 'महत्त्वपूर्ण' आकडेवारी, विकृत बातम्या व अयोग्य भाष्ये यांचे खाद्य पुरवत असता "ती वृत्तपत्रे म्हणजे देवाने पाठविलेला अनमोल ठेवा आहे, त्यांच्या अभावी आपण भिकारी बनू" असे सांगण्यापासून तरी त्यांनी स्वतःला आवरावे.

मॅक् आर्थीझम हा देखील असा रोग आहे ज्यापासून आपल्याला स्वतःचे संरक्षण पूर्णतया करता येत नाही. जेव्हा जेव्हा आपण ढिले किंवा भयभीत बनू त्या त्या वेळी या रोगाचा प्रादुर्भाव होत राहील. मॅक् आर्थीझम निर्माण होऊ शकला याची दोन मूलकारण आहेत. १९३० नंतर स्टॅलीनवादाचा विचार करताना उदारमत-वादी लोकांना आपली उदार दृष्टी टिकविण्यात आलेले अपयश; व चीनचा कम्युनिझ्म-मने घेतलेला ताबा, फूश लोकांची फितुरी, हिस लोकांची निमफितुरी आणि रशियाने अणुबाँब तयार करणे अशासारख्या न आवडणाऱ्या घटनांमुळे अनेकांची भीतीने उडालेली गाळण !

१९३०–४० च्या दरम्यान स्टॅलीनवादाचे खरे स्वरूप समजून घेण्यात आलेले अपयश व १९२० च्या महामंदीमुळे आलेला गर्भगळीतपणा (आणि त्या आधीच्या हार्डिंग–कूलरीज कारकीर्दीतील आत्मसंतुष्ट वृत्ति) यामुळे खऱ्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचे भान उदारमतवाद्यांना राहिले नाही, गुलामगिरीच्या राजकारणाचा त्यांनी जवळ जवळ पुरस्कार केला; त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर सेनेटमधल्या एका बदमाषाने केलेले ( अनेक सद्‌गृहस्थांवरील) छुप्या कम्युनिझमचे आरोपसुद्धा खरे आहेत असे मानायला ते चटकन तयार झाले. युद्धात विजय झाला म्हणजे शांतता आपोआप निर्माण झाली, आता सत्तेचे व सामर्थ्याचे विसर्जन करायला हरकत नाही अशी भाबडी आशा ब्रिटिशांप्रमाणे अमेरिकनांनीही बाळगल्याने शत्रुत्वाचे आव्हान देणारा चीन व शंभर सेना विभाग आणि अणुबाँब यांच्या साहाय्याने त्याला पाठिंबा देणारा रशिया पाहिल्याबरोबर आपण अर्धमेले झालो, आपली जिद्द हरवून बसलो. १९४५ चा वसंत-ऋतु इतका प्रसन्न होता, मग सगळीकडून एकदम असे अंधारून का आले ? कोणीतरी आपला विश्वासघात केला, नाहीतर असे कसे होईल ? अशी भावना पसरली. जुनी ढिलाई व नवी भीती यामुळे मॅक् आर्थीझमला अनुकूल असे लोकमत तयार झाले. नागरिकस्वातंत्र्याचे जागरूकपणे संरक्षण करण्याच्या कामात लोकांनी थोडी जरी ढिलाई केली तरी पडक्या घरातल्या ओल–बुरशीप्रमाणे अशा प्रकारचे सेनेटर्स लोकांच्या कमकुवत मनोभावनेवर आरूढ व्हायला चटकन पुढे सरसावतील.

इंग्लंडमध्ये नागरिकस्वातंत्र्याची हमी देणारी लेखी घटना नाही. १९३० नंतर स्टॅलिनिझमचा डाव्या अंगाने अनुनय तेथेही झाला होता, फूशसारख्या देशद्रोह्यांचे

साह्य असलेल्या रशियाचा धोका असतानाही जल्दीबाजीने सैन्याची हालवाहालव व आंशिक विसर्जन इंग्लंडनेही केले होते. मग तेथे मॅक् आर्थीझम न वाढता राज्यघटनेत १७९१ साली खास दुरुस्ती करून बिल ऑफ राईट्सच्या स्वरूपात नागरिक स्वातंत्र्याची सर्वप्रकारे हमी दिली गेली असलेल्या अमेरिकेतच त्या रोगाचा प्रादुर्भाव का व्हावा ? दीर्घ अनुभव व संथ गतीने उत्क्रांति यांचे परिणामस्वरूप म्हणून जेव्हा नागरिकस्वातंत्र्ये ( राजकीय स्वातंत्र्याचे सहोदर म्हणून ) विकसित होतात त्याचवेळी ती अधिक सुरक्षित असतात असे वरील प्रश्नाचे समर्पक उत्तर दिसते.

पार्लमेंटमधील कामचलाऊ बहुमताच्या जोरावर सर्व नागरिकस्वातंत्र्ये गटारात ओतून द्यायचे ब्रिटिश सरकारने ठरविले तर त्याला अटकाव करणारे लेखी काहीही नाही. सरकार तसे करत नाही, धोक्याच्या वेळीसुद्धा करत नाही; याचे कारण तसे करणे ' घटनाबाह्य ' ठरेल हे नाही तर ते लोकांना आवडणार नाही, लोक नाराज होतील, रागावतील हे होय. आयव्हर जेनिंग्जने म्हटले आहे, 'काटेकोर नियमातून नव्हे तर मनाच्या ठेवणीतून स्वातंत्र्याचा जन्म होतो......आपल्या स्वातंत्र्याचे उगमस्थान कायदा किंवा संस्था हे नसून स्वतंत्र लोकांची अस्मिता हे होय. "

जिचे संरक्षण केवळ ' मनाच्या ठेवणी 'मुळे होत राहते, अशी अलिखित घटना उत्क्रांत करायला खूप खूप वेळ लागतो. युनायटेड स्टेट्सला वेळ नव्हता, आणि नव्या राष्ट्रांनाही तो असणार नाही. पण मॅक् आर्थीझमच्या उदाहरणाने आपल्याला या गोष्टीचे सतत स्मरण राहिले पाहिजे की जनतेने स्वतंत्र लोकांची चित्तवृत्ती त्यागली तर स्वातंत्र्याचे संरक्षण कोणी करू शकणार नाही, ' हक्कां 'ची यादी असलेला दस्तऐवज कवडीमोलाचा ठरतो.

आधुनिक जगात भाषणस्वातंत्र्याला आणखी एक धोका निर्माण झाला आहे. ' सुरक्षिततेच्या ' नावाखाली महत्त्वाची माहिती गुप्त ठेवली जाते. तुम्हाला काहीही बोलायला परवानगी आहे, पण महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीची माहिती ' राष्ट्रीय हितां'च्या नावाखाली तुम्हाला नाकारण्यात येत असली तर त्याचा काय उपयोग ?

' सुरक्षितता ' स्वतःच स्वतःचा अनेक प्रकारे पराभव करते. माहिती गुप्त ठेवून कल्पकता व टीका यांना गुदमरवून टाकण्यात येते, कोमॅजरने अत्यावश्यक मानलेल्या मतभिन्नतेला मूठमाती मिळते. पूर्वी शास्त्रज्ञात आंतरराष्ट्रीय पातळीवर विचारांची स्वैर देवाण घेवाण चालत असे. ती थांबवल्याने ज्या प्रश्नांचा निकाल लागला आहे किंवा ज्यांची सोडवणूक शक्य नाही असे आढळून आले आहे अशा प्रश्नांवर विचार व संशोधन करण्यात अनेक समर्थ विज्ञानांचा वेळ व श्रम वाया जातात; आणि दडपादडपीच्या व हळू आवाजात बोलण्याच्या अतिरेकामुळे अयोग्य वेळी त्याचा परिस्फोट

होतो. हिरोशिमावर अणुबाँब टाकण्यात आले त्याच्या काही आठवडे आधी प्रस्तुत लेखक लंडनमधील अमेरिकन दूतावासाशी संबंधित असताना त्याचे ब्रिस्टल येथील क्लिफटन कॉलेजात भाषण झाले. सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी इतकी घेण्यात आली होती की ( अणुबाँब शोधण्याच्या वा वापरण्याच्या दिशेने ) काय प्रयत्न चालले आहेत याची त्याला काहीच कल्पना नव्हती, काय बोलू नये याबद्दलही त्याला काही सूचना देण्यात आली नव्हती. भाषणाच्या ओघात त्याने म्हटले की जर्मनीत अणुशक्तीचा वापर करण्याची तयारी पूर्ण होण्यापूर्वीच आपण त्याचा पराभव केला ही मोठी भाग्याची गोष्ट होय. त्याबरोबर विलक्षण वेगाने चक्रे फिरू लागली. वॉशिंग्टनहून नौदलप्रमुखांना विमानाने ( चौकशीसाठी) पाठविण्यात आले. "देशद्रोहा"सारखे शब्द वापरले गेले. हे सर्व केवळ सुरक्षिततेसाठी !

टॅलीरँडने म्हटले आहे की 'हस्तक्षेप करणार नाही' असे म्हणणे हा हस्तक्षेपाचाच दीर्घसूत्री प्रकार आहे. 'सुरक्षितता' हे असुरक्षिततेच्या व्यवस्थेचे अल्पसूत्री वर्णन होय.

दी न्यू मीनिंग ऑफ ट्रेझन (देशद्रोहाचा नवा अर्थ) या पुस्तकात रेबेका वेस्टने शास्त्रज्ञांची कुचंबणा होत असल्याबद्दल निषेध व्यक्त केला आहे, पण शेवटी निष्कर्ष काढला आहे की सध्याच्या अर्धवट वेडसर जगात आपण त्याबाबत काही करू शकत नाही. तिने म्हटले आहे, "दुर्मिळ गुण अंगी असलेल्या लोकांच्या छोट्या छोट्या गटांनी मानवजातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या प्रश्नांवर पुंजक्या-पुंजक्यांनी काम करत रहावे, त्यांच्या शक्तिबुद्धीचा एकत्रितपणे उपयोग करता येऊ नये ही अतिशय हास्यास्पद घटना आहे. पण आपण जिवंत रहावे यासाठी सर्व विश्व आपल्याला अशा हास्यास्पद गोष्टी करायला भाग पाडीत आहे." जगभर झपाट्याने वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या धोक्याचाही रेबेका-बाईंनी निर्देश केला आहे. "आपली प्रजोत्पादनक्षमता ('fruitfulness') हाच सुरक्षिततेच्या दृष्टीने खरा धोका आहे...... अतिजास्त लोकसंख्येची प्राथमिक घटना व तिचा अपरोक्ष परिणाम या दोहोंच्या संयोगामुळे फार मोठी जोखीम निर्माण झाली आहे. खूप लोकसंख्या असल्यामुळे खूपसे कागदपत्र व दस्तऐवज तयार होत आहेत. त्यावर देखरेख वगैरे करण्यासाठी खूप मोठा सेवकवर्ग ठेवावा लागतो, केवळ जास्त पगार दिल्याने ते प्रामाणिक राहतील याची खात्री नाही, म्हणून मोठ्या संख्येने सुरक्षा–अधिकाऱ्यांची नेमणूक करावी लागते, फायलींच्या कपाटांना नीट कुलुपे लावली जातात ना आणि कोणी काही कागद आपल्या गुप्त घरी नेत नाही ना याकडे डोळयात तेल घालून लक्ष ठेवावे लागते."

कुठल्याही स्वरूपातील सुरक्षितता हा स्वातंत्र्याला धोकाच होय. हा शत्रू कायमचा राहणार हे आपल्याला गृहीतच धरायला हवे; मात्र सखोल अविश्वासाच्या नजरेने त्याच्या सर्व हालचालींवर बारीक पहारा ठेवायला हवा, शक्य होईल तेव्हा त्याची शक्ती वेगाने खच्ची करायला हवी आणि बाहेरच्या धोक्याचा दाब वाढला तरच ती वाढवायला हवी. पण सुरक्षा–अधिकारांची वाढ कार्यकारी मंडळाने करता कामा नये ( कारण जितकी जास्त 'सुरक्षतता' तितका त्यांना त्रास कमी ), सार्वजनिक वादविवादानंतर विधिमंडळानेच त्या अधिकारात आवश्यक तेवढी वाढ करावी.

रूझवेल्टचे दुसरे स्वातंत्र्य म्हणजे उपासनेचे. प्यूरिटन लोक ज्यावेळी अमेरिकेला पळून आले त्यावेळी या स्वातंत्र्याविषयी त्यांची जी कल्पना होती त्याच्या नेमकी उलट आज अंगिकारली पाहिजे. त्यांना केवळ एकाच मार्गाने उपासना करण्याचे स्वातंत्र्य हवे होते, आणि त्यांच्याशी कोणाचा मतभेद होणार नाही अशी खबरदारी घेण्याचही स्वातंत्र्य त्यांना हवे होते! त्यांच्या मते "धार्मिक सहिष्णुता म्हणजे कुणाची सद्सद्विवेकबुद्धि कितीही घाणेरडी वा दरिद्री असो, प्रत्येकीला तबेला व घास मिळावा." प्लीमथ व मॅसॅच्युसेट्स् बे येथील लोकांना ही कल्पना भयंकर वाटली. प्रेसिडेंट रूझवेल्टला नेमके तेच हवे होते; जगभरच्या लोकांना आपल्या इच्छा–आवडी-नुसार सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य हवे, मग ती कितीही दरिद्री वा विटलेली असो.

धार्मिक भावनेला सध्या उतरती कळा लागलेली असल्याने या स्वातंत्र्याला पाठिंबा देणे सर्वात सोपे आहे, त्यामुळे आपल्यावर फार थोडी शिस्त लादली जाते. पाश्चात्य देशात आपण सगळेजण फक्त एकाच आध्यात्मिक निष्ठेला चिकटून आहोत, ती म्हणजे प्रत्येक व्यक्ति वैशिष्ट्यपूर्ण ( युनिक् ) आहे व तिच्या व्यक्तिमत्त्वाचा फुलोरा तिच्या मार्गाने होऊ देण्यासाठी पूर्ण, अबाधित–स्वातंत्र्य दिले जावे. "स्वातंत्र्य हे महान् ईप्सित होय, सहिष्णुता थोर सद्गुण आहे, आणि एकबद्धीकरण (रेजिमेंटेशन) हे परम दुर्भाग्य होय."[1] पण हा महान् सद्गुण, म्हणजे सहिष्णुता हा देखील एक मोठा धोका बनू शकतो. लोकशाहीने असा मार्ग शोधून काढला पाहिजे की ज्यामुळे सद्गुणाचे विषात रूपांतर होणार नाही.

ज्यांना सनदशीर सरकारच्या ऐवजी जुलूमशाहीची प्रतिष्ठापना करायची आहे त्यांना आपल्या लोकशाहीच्या सहिष्णुतेचा संपूर्ण फायदा घेऊ द्यायचा का? एक-बद्धीकरण हे फार मोठे दुर्दैव असल्याने एकबद्धीकरण करावे म्हणणारांना त्यांचे बोलणे थांबवायला केव्हा सांगायचे? वीमर प्रजासत्ताकाने नाझींना कोणत्या क्षणी

---

१ आल्डस् हक्सले, ब्रेव्ह न्यू वर्ल्ड रीव्हिजिटेड, पृ. १२०.

अटकाव करायला पाहिजे होता ? सामूहिक वेडाच्या झटक्याला बळी पडण्यात जर्मन लोक विशेष पटाईत असतील; पण आपणापैकी कोणीही त्या रोगापासून पूर्णतया सुरक्षित राहू शकत नाही. त्याची सुरुवातीची चिन्हे दिसू लागल्याबरोबर जुलूमशहा संबंधित लोकांना तुरुंगात टाकून किंवा ठार मारून काळजी घेऊ शकतात; लोकशाहीवाद्यांनी स्वतःचे संरक्षण कसे करायचे ?

वॉल्टर लिपमनने उपासनेच्या स्वातंत्र्याच्या दुसऱ्या एका चमत्कारिक परिणामाकडे लक्ष वेधले आहे; चर्चना त्यामुळे अडचणीत सापडल्यासारखे होते. " अंतर्गतरीत्या, आपल्या पंथातील भाविकांना ते सांगत राहतात की सत्याचे खरे व पूर्ण स्वरूप फक्त त्यांनाच समजले आहे. पण बाह्य व्यवहारात इतर चर्चबरोबर, इतर पंथांबरोबर व नागरी सत्तेबरोबर संबंध ठेवताना त्यांना सहिष्णुतेचा उद्घोष व आचार करावा लागतो. ...... दररोजच्या व्यवहारात सर्व धर्मपंथांना समान लेखायचे, आणि केवळ एकाच धर्मपंथाचा अधिकार हा दैवी वा ईश्वरदत्त आहे अशी मनोमन प्रबळ श्रद्धा ठेवायची याचा समन्वय कसा साधायचा ? " स्वातंत्र्य म्हणजे **त्यांच्या** मार्गाने, म्हणजे खऱ्या, योग्य मार्गाने उपासना करण्याचे स्वातंत्र्य होय, बाकीचे मार्ग, चुकीचे व म्हणून गुलामीचे होत असे प्यूरिटन्सना मनोमन वाटत असण्याचे कारण हेच असावे.

अठराव्या शतकातील आणखी एका अभिजात स्वातंत्र्याचा रूझवेल्टने उल्लेख केलेला नाही. ते म्हणजे एकत्र जमण्याचे ( असेंब्ली) स्वातंत्र्य होय. आपल्या पूर्वजांइतकी आज आपल्याला त्याची तितकी गरज राहिलेली नाही, कारण दळणवळणाच्या साधनांचे यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. अर्थात ते जेथे नाकारले जात आहे अशा समाजाला आजही कोणी स्वतंत्र समाज म्हणणार नाही. आणि तरीही स्वातंत्र्याला त्यापेक्षा मोठा धोका दुसरा कोणता असू शकेल ? हिटलरने हे हजाराव्या वेळी दाखवून दिले आहे की लोकांनी जमाव केला म्हणजे ते सारासारविवेक करण्याच्या शक्तीला रामराम ठोकतात व संताप, भीती आणि क्रौर्य यांना बळी पडतात. जमाव-नशेमुळे निर्माण झालेल्या भावनांना भडकवून त्यांना काहीही करायला लावणे, हिटलरवर विश्वास ठेवायला लावणे देखील, कसे शक्य आहे हे हुल्लडबाज नेत्याला चांगले माहीत असते. म्हणजे एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य ही सुसंस्कृत जीवनाची गरज आहे, पण त्याचबरोबर संस्कृतीला तो आणखी एक धोका आहे.

आपल्या प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात आणखी एक आवश्यक बनलेले स्वातंत्र्य म्हणजे संघटना करण्याचे स्वातंत्र्य होय. याचे एक ठळक उदाहरण म्हणजे मजुरांना त्यांच्या संघटना– ज्यांचे संचलन त्यांचे सभासद स्वतः किंवा एखाद्या संलग्न संघटनेमार्फत करतात– करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. अशा स्वातंत्र्यामुळे एक नव्या

प्रकारची संपत्ति अस्तित्वात येते आणि संपत्ति नसणारांना खरेखुरे स्वातंत्र्य कसे मिळवून द्यायचे या सरकारापुढील पुरातन प्रश्नांचे उत्तर आपोआप मिळते.

सतराव्या शतकात जेम्स हॅरिंग्टन या गृहस्थाने (प्रजासत्ताकवादी असूनही हा पहिल्या चार्ल्स् राजाचा मित्र होता, त्यामुळे यादवी युद्धाच्यावेळी तो दोन्ही बाजूकडून संकटात सापडला) संपत्ति व सत्ता यांच्यातील संबंधाविषयी एक उत्कृष्ट पुस्तक लिहिले.[1] ते सतरावे शतक असल्याने संपत्ति म्हणजे जमीनजुमलाच त्याला अभिप्रेत होता. त्यानंतर सुमारे दीडशे वर्षांनी स्वतंत्र माणसासाठी राज्यघटना बनविण्याचा अमेरिकनांच्या मनावर हॅरिंग्टनच्या कल्पनांचा पगडा होता; मात्र त्यांनी छोटा जमीनमालक, लोहाराची भट्टी, खेड्यातले दुकान व किनारपट्टीवर उपयोगात असलेली होडी यांच्या संदर्भातच त्यांनी विचार केला.

गुलामांना वगळून (सर्वच माणसांनी विचार करताना त्यांना वगळलेले दिसते) इतर नागरिकांपैकी ज्यांच्याजवळ संपत्ति नाही त्यांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण कसे करायचे? ज्यांनी राज्यघटना अद्याप स्वीकारलेली नव्हती त्यांना उद्देशून जेम्स मॅडिसनने घटनेच्या मसुद्याच्या समर्थनार्थ फेडरॅलिस्ट[2] मध्ये लिहिले, " माणसाच्या उदरनिर्वाहाच्या साधनावर सत्ता असणे म्हणजे त्याच्यावरच सत्ता असणे होय." न नाकारता येणारे हे सत्य जॉन ॲडम्सने पुढील शब्दात मांडले, " सत्ता संपत्तीच्या मागे जाते." (पॉवर फॉलोज प्रॉपर्टी)

युनायटेड स्टेट्सूच्या राज्यघटनेत लोकशाहीविषयी काहीसा चरचरीत दृष्टिकोन घेतला जाण्याचे कारण पुढील शृंगापत्तीत असावे : सत्ता जर संपत्तीच्या मागे जाते तर ज्यांच्याजवळ संपत्ति नाही त्यांना आपण सत्ता कशी काय देऊ शकतो? त्यांच्या उपजीविकेवर ज्यांचे नियंत्रण आहे त्यांचे ते होयबा किंवा हस्तक बनणे अपरिहार्य नाही का? इकडले तिकडले काही कलावंत, मोजके लेखक यांचा प्रश्न नाही, ते विशेष उपद्रव देऊ शकणार नाहीत. पण दुसऱ्याचे दुकान, खाणावळ किंवा शेत यावर काम करणारांची संख्या वाढते आहे, त्यांचे काय? मालकाला आवडले नाही तर नोकरी जाण्याच्या भीतीने तो भाषण, उपासना किंवा एकत्र जमण्याच्या स्वातंत्र्याचा उपयोग करू शकणार नाही. याला अपवाद फक्त संतांचा असू शकतो पण संतांसाठी कसलाच कायदा करण्याची गरज नाही. जे आर्थिकदृष्ट्या परावलंबी, परतंत्र आहेत ते अयोग्य

---

१. दि कॉमनवेल्थ ऑफ ओशनिया. १६५६

२. राज्यघटना मजूर व्हावी यासाठी लोकमत तयार करण्याच्या दृष्टीने १७८८ साली अलेक्झांडर हॅमिल्टन, जेम्स मॅडसन व जॉन जे यांनी लिहिलेल्या निबंधांच्या संग्रहाचे ' दि फेडरॅलिस्ट ' असे नाव आहे.

दडपणाला (ब्लॅकमेल) बळी पडणारच. जे अशा प्रकारे दडपणाला बळी पडू शकतील त्यांना राजकीय अधिकार देणे शहाणपणाचे ठरेल काय ?

याचे उत्तर फिलाडेल्फियात मिळणे शक्य नव्हते. तरीही राजकीय लोकशाही वाटचाल करीतच राहिली. हे लक्षात घेणे उद्बोधक ठरेल की अमेरिकेतील लोकशाही पुढे जात राहिली कारण मागे रेटा होता, सरहद्द सारखी पुढे पुढे सरकत होती, जवळ जवळ प्रत्येक कुटुंबाला स्वतःची जमीन किंवा संपत्ति मिळत राहिली. राज्यघटना संमत झाल्यानंतर अवघ्या चाळीस वर्षांच्या अवधीत प्रेसिडेंट अँड्रू जॅक्सनच्या रूपाने राजकीय लोकशाहीने आपले अस्तित्व आग्रहाने व्यक्त केले. मात्र संघटनेचे संपूर्ण स्वातंत्र्य, मजूरसंघटना बनविण्याचा अनिर्बंध अधिकार ( संपत्तीच्या इतर प्रकारांना मिळते त्या पद्धतीच्या सरकारी संरक्षणासह ) फ्रँकलीन रूझवेल्ट व त्याच्या न्यू डीलपर्यंत अस्तित्वात आला नाही. ग्रेट ब्रिटनमध्ये तो लवकर अस्तित्वात आला, पण त्याचे संरक्षण करणे सुरवातीच्या काळात तेथेही कठीण गेले. या अडचणीचे एक कारण असे की संघटनास्वातंत्र्यामुळे एक नव्या प्रकारची संपत्ति किंवा सत्ता निर्माण होते : उद्योगात गुंतलेल्या कामगारांची एकत्रित केलेली संघशक्ति आणि स्वातंत्र्याची जोपासना करू पाहणाऱ्या सरकारांना कुठल्याही प्रकारच्या संपत्तीचे नियमन करणे कठीण जाते.

## — ३ —

जॉन स्ट्रॅचीने आपल्या चॅलेंज ऑफ डेमॉक्रसी या पुस्तिकेत आणखी एका स्वातंत्र्याचा उल्लेख केला असून त्याला तो 'कायद्याचे राज्य' असे संबोधतो. तो लिहितो, " स्वातंत्र्याचा हा सगळयात जुना व साधा प्रकार आहे, आणि तो अतिशय मूल्यवान असल्याचे सिद्ध झाले आहे. समाजाचे सर्व लोकमान्य (पब्लिक) कायदे धाब्यावर बसवून आपल्या इच्छेनुसार सरकार जेव्हा या स्वातंत्र्याची गळचेपी करते, लोकांना अटक करणे, तुरुंगात टाकणे, त्यांचा छळ करणे किंवा त्यांना ठार मारणे अशा मार्गांचा अवलंब करते, त्यावेळी बाकीच्या सर्व स्वातंत्र्यप्रकारांचा लोप होतो." तो पुढे असे म्हणतो की हे फार साधे स्वातंत्र्य आहे, कायदे चांगले वाईट हा प्रश्न नाही, काही तरी कायदे असले पाहिजेत, जे निश्चित व लोकांना समजणारे असतील, ज्यांचे कार्यकारीमंडळाकडून उल्लंघन होणार नाही, विधिमंडळे पश्चात–परिणाम देऊन जे बदलू शकणार नाहीत, व ज्यांची अंमलबजावणी प्रामाणिक न्यायालयामार्फत होत राहील.

कायद्याचा आधार ( सँक्शन ) काय या सनातन प्रश्नाला स्ट्रूचीने शेवटच्या भागात बगल दिली आहे. आधार कोणता— केवळ सत्ता ? की अंशतः का होईना पण नैतिक सत्यांचा आधार असला पाहिजे ? किंवा वेगळ्या शब्दात बोलायचे तर नैसर्गिक कायदा म्हणून काही आहे की नाही ? नैसर्गिक कायद्याविषयी स्वतःचे विचार स्पष्ट करून घेतल्याशिवाय सरकारच्या स्वरूपाविषयीचा सिद्धान्त कोणालाही नीट मांडता येणार नाही. कायद्याचे राज्य म्हणजे चांगल्या किंवा वाईट कायद्यांवर देखील आधारलेले असू शकेल या भूमिकेवर लोकशाहीचा सिद्धान्त रचता येणार नाही. स्वतंत्र लोक वाईट कायद्यांचे— किंवा ज्याला ते वाईट समजतात अशा कायद्यांचे— काय करतात हे आपल्याला माहीत आहे. ते त्यांचा भंग करतात : सातत्याने, रागाने, उघडपणे, जोपर्यंत ते रद्द होत नाहीत तोपर्यंत. युनायटेड स्टेट्स्‌मधील दारुबंदीचा कायदा हे त्याचे ढळढळीत उदाहरण आहे. राज्यघटनेला अठरावी दुरुस्ती करणाऱ्या व्होल्स्टीड कायद्याची (म्हणजेच दारुबंदी कायद्याची) विल्हेवाट अमेरिकनांनी ज्याप्रमाणे लावली त्याचप्रमाणे सर्व कायद्यांबाबत वर्तन होऊ लागले तर प्लेटोने कल्पना केल्याप्रमाणे लोकशाहीचे अराजकात रूपांतर होईल व त्यातून जुलूमशाहीशिवाय सुटका राहणार नाही.

स्वतंत्र लोक ज्या कायद्यांचे पालन करतात, नव्हे तर त्यासाठी आत्मबलिदान करायलाही तयार होतात ते स्वतःचा विश्वास नसताना केवळ हितसंबंधी गटांच्या दडपणामुळे विधिमंडळ-सदस्यांनी मान्यता दिलेले किंवा त्यांच्या लहरीवर आधारलेले नसतात; त्यांचा आधार त्यापेक्षा फार वेगळा व मजबूत असतो. ज्याला ‘ कायद्याचे राज्य ’ हे तत्त्व शिरोधार्य वाटते किंवा लोकशाहीला संभवणाऱ्या धोक्यांविषयी ज्याला चिंता वाटते त्याने अमेरिकेच्या दारुबंदी कायद्याचा नीट अभ्यास केला पाहिजे.

वसाहतवादाच्या वेळेपासून काही जणांची तक्रार होती की अमेरिकन लोक फार दारू पितात. १८४६ साली मेन या संस्थानाने व नंतर मधूनमधून इतर काही राज्यांनी दारुबंदी कायद्याचा प्रयोग करून पाहिला. त्यामुळे कुणाचीच अडचण झाली नाही, कारण शेजारच्या राज्यातून दारू आणणे शक्य होते. १८९३ साली ओहाओ येथे स्थापन झालेली अँटी—सलून लीग ही अवघ्या दोन वर्षात राष्ट्रव्यापी संघटना झाली. त्यांनी अनुचित मार्गाने दडपण आणायला सुरुवात केली. लीगचे सूत्रधार आदर्शवादी होते, पण राजकारणातील मार्गांविषयी त्यांना कसलाही विधिनिषेध वाटत नव्हता. प्यूरिटन व ठग यांची ही संघटना हळूहळू अतिशय प्रबळ बनली.

९५८४

सत्ता–समतोलाच्या पद्धतीचा आश्रय घेण्याचे लीगने ठरविले. ज्या जिल्ह्यात चुरशीची निवडणूक होईल असे दिसे तेथे काही थोडे वेडेपीर ही संघटना आपल्या हाताशी धरीत आणि दोहोंपैकी जो पक्ष दारुबंदीच्या बाजूने मत द्यायचे आश्वासन देईल त्याला ती सर्व मते घाऊक पद्धतीने दिली जात. बहुधा दोन्ही उमेदवार आश्वासने देत, कारण त्याचा त्यांच्या वैयक्तिक सवयींवर कसलाच परिणाम होणार नव्हता.

अशा मार्गाने व काही ठिकाणी मानवताप्रेमी चर्चेसचा आधार घेऊन तर काही ठिकाणच्या गुत्त्यांच्या अपकीर्तीची भरपूर प्रसिद्धी करून १९१७ साली नशा आणणाऱ्या पेयांचे ‘ उत्पादन, विक्री किंवा वाहतूक ’ करण्यावर बंदी घालणारी दुरुस्ती घटनेला करण्यासाठी कॉंग्रेसच्या दोन्ही सभागृहातील बहुसंख्य सभासदांना उद्युक्त केले. अशा पेयांच्या ‘ विक्री ’बद्दल मात्र काहीही उल्लेख नव्हता. त्यामुळे विकत घेणारा सुरक्षित होता, त्याच्या पुरवठा केंद्राचे काहीही होवो. तीन चतुर्थांश संस्थानांच्या विधिमंडळांनी ती दुरुस्ती संमत केली, आणि १९१९ च्या ऑक्टोबरात व्होल्स्टाड ॲक्ट हा अंमलबजावणी करण्यालायक कायदा झाला. अर्धा टक्का अल्कोहोल असलेले कुठलेही पेय हे नशा आणणारे आहे अशी व्याख्या ठरविण्यात आली.

परिणाम काय झाला हे सर्वांना माहीतच आहे. कुठल्याही आधुनिक सुसंस्कृत राष्ट्रात कधी झाले नाही इतक्या मोठ्या प्रमाणावर अमेरिकेत अधःपतन झाले. पोलीस, कायदा, अंमलबजावणी करणारी संस्थानांची व संघराज्याची खाती, युनायटेड स्टेट्सची कॉंग्रेस व प्रेसिडेंट हार्डिंग– सगळे चेष्टेचे, उपहासाचे व निर्भर्त्सनेचे विषय बनले. कायदा बदलला होता, घटना दुरुस्त झाली होती, पण ( ज्यांनी कायदा केला व घटना बदलली त्यांच्यासकट ) अमेरिकन लोकांच्या सदसद्विवेकबुद्धीत कोणीच बदल घडविला नव्हता. पावित्र्याच्या नावाने जबरदस्ती करणारे लोक बिचारे इतके साधेभोळे होते की विधिमंडळाच्या सदस्यांवर दडपण आणून त्यांना एखादा कायदा करायला लावला की लगेच तो कायदा होतो असा त्यांचा भाबडा समज होता.

काही देशातील लैंगिक कायद्यांकडे नजर टाकली की हाच प्रश्न उपस्थित होतो– कायदा म्हणजे काय ? याही संदर्भात युनायटेड स्टेट्स् आत्यंतिक स्वरूपाचे दाखले पुरवू शकतो. याच्याशी संघराज्याला काही कर्तव्य नाही; पण एक किंवा अधिक संस्थानात ज्यावर बंधन नाही असे लैंगिक प्रकार नाहीत. आणि किन्से अहवालावरून असे दिसते की जी केली जात नाही अशी एकही गोष्ट नाही.

मग कायद्याला ‘ कायदा ’ असे केव्हा म्हणायचे ? स्वतंत्र लोकांच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा व निर्णायक आहे. स्वतंत्र लोक असण्याच्या शक्यतेविषयी

किंवा आवश्यकतेविषयी सुद्धा ज्याला अजिबात विश्वास नव्हता त्या हॉब्ज्चे म्हणणे असे, " शहाणपण नव्हे तर दंडसत्ता ही कायद्याची जननी असते." शासनसंस्थेला जे योग्य वाटेल त्याविषयी तिने कायदा करावा, लोक त्यावर विश्वास ठेवतीलच, कारण " सर्वसाधारण माणसांची मने कोऱ्या पाटीसारखी असतात, सार्वजनिक सत्तेला जे चित्र रेखाटायचे असेल त्याचा ठसा तिने त्या पाटीवर खुशाल उमटवावा." युनायटेड स्टेट्स्च्या सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश ऑलिव्हर वेंडेल होम्स यांनी आपल्या चमत्कारिक मनोवस्थेत वरील विचाराशी सहमति दर्शविली आहे : " जोपर्यंत कायदा म्हणजे दंडन होय ( आणि त्याचा अर्थ तसा नसेल तेव्हा तो कायदा कोणी का केला याचा विचार करण्याचे मला कारण नाही, तोपर्यंत दंडन म्हणजे लष्कर होय." उघडच आहे की ही भूमिका अतिशय अपुरी आहे. अठरावी (दारुबंदीची) घटनादुरुस्ती झाली त्यावेळी युनायटेड स्टेट्स् जवळ पंचवीस लाख सुसज्ज सैनिक होते. फ्रान्समधून परतलेल्या सैनिकांना दारुबंदीच्या कायद्याच्या अंमलबजावणीचे काम द्यावे असे कोणीही सुचविले नाही. कारण प्रत्येकाला माहीत होते की त्याचा काही उपयोग नाही. आणि शय्येवरील "अनैसर्गिक" प्रकार वा अवस्थांवर प्रतिबंध घालणाऱ्या अनेकविध कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रादेशिक सेना वापराव्यात असेही कोणी म्हणत नाही— कारण तेच ! तेव्हा हॉब्ज्च्या 'सार्वजनिक सत्ते'पेक्षा किंवा होम्सच्या 'लष्करा'पेक्षा कायद्याला दुसरा कुठला तरी अधिक मजबूत आधार असला पाहिजे.

या दृष्टीने सर फ्रेडरिक पॉलॉक यांची विशेष मदत होते, " एकंदरीने पाहता ज्यांना कायदा लागू होत असतो त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचे प्रतिबिंब त्या कायद्यात उमटत असते. तसे झाले नाही तर निदान स्वतंत्र देशात तरी तो कायदा पाळला जाणार नाही." मात्र सर फ्रेडरिक यांचा अधार्मिक किंवा बिगर अध्यात्मिक अर्थाने नैसर्गिक कायद्यात विश्वास होता. त्यांनी १९१८ साली होम्सला लिहिले, " तुमचे जर असे म्हणणे असेल की नैसर्गिक कायदा ( = नैसर्गिक न्याय = कॉमन लॉ मध्ये मान्यता पावलेला विवेक ) हा संपूर्णतया निरपवाद रीतीने सत्य असल्याचे माहीत झाल्याशिवाय त्याचा स्वीकार करणे शक्य नाही, तर मग माझा तुमच्याशी मतभेद आहे...... विवेकाने वागू पाहणाऱ्या सर्व माणसांना आचाराचे काही समान नियम असतात व ते त्यांना मान्य असतात हे जर तुम्ही नाकारत असाल तर मग तुम्हाला नीतिशास्त्र कसे काय मांडता येईल किंवा कायद्याला नैतिक पार्श्वभूमि कशी काय उपलब्ध होईल याविषयी मला दाट शंका वाटते." सर फरेडरिक यांच्या 'सर्व माणसां' ऐवजी 'पाश्चात्त्य परंपरेतील सर्व माणसे' असे वाचले म्हणजे स्वतंत्र समाजात आवश्यक असलेल्या कायद्याच्या

(महत्त्वपूर्ण, आशयगर्भ कायदा, केवळ वाहतुकीचे नियम नव्हेत) आधाराविषयी किमान एकमत होऊ शकते. तसेच नैसर्गिक कायद्याची ती अतिशय नम्र आणि कमीतकमी विवाद्य व्याख्या होऊ शकते.

इतिहासकालापासून नैसर्गिक कायदा हा एक अतिशय पुरातन युक्तिवाद चालत आला आहे. तो कदाचित् अस्तित्वात नसेलही, पण इतक्या लोकांनी त्यावर विश्वास ठेवल्यामुळे त्याला अर्थगंभीर महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रा. द. एन्त्रेवीस यांनी लिहिले आहे, "नैसर्गिक कायदा नसता तर इटालियन द्वीपकल्पातील छोट्याशा शेतकरी समाजाचे सामान्य कायदे आंतरराष्ट्रीय सस्कृतीचे सर्वमान्य कायद्याची प्रतिष्ठा प्राप्त करू शकले नसते. नैसर्गिक कायदा नसता तर मध्ययुगात दैवी आणि ऐहिक शहाणपणाचा जो समन्वय झाला तो साधलाच नसता. नैसर्गिक कायदा नसता तर अमेरिकन व फ्रेंच क्रान्त्या झाल्या नसत्या, लोकांच्या हृदयात विराजमान असलेल्या स्वातंत्र्य व समता या तत्त्वांना कायद्याच्या पुस्तकात स्थान मिळाले नसते." हे सर्व खरे आहे. शिवाय जुलमी शासनसंस्थेविरुद्धच्या झगड्यात माणसाला नैसर्गिक कायदा हा विश्वासू साथीदारासारखा उपयोगी पडला आहे. पण आपण त्याचे अस्तित्व सिद्ध करू शकत नाही, आणि सदसद्विवेकबुद्धीची व्याख्या करण्याइतकेच नैसर्गिक कायद्याची व्याख्या करणेही कठीण आहे.

हेब्रु धर्मप्रचारकांनी प्रतिपादिले की खरा कायदा ईश्वरदत्तच असून तो राजे, सरदार वा इतर प्रस्थापित सत्ताधाऱ्यांवर बंधनकारक आहे. ग्रीक लोकांनी पहिल्यांदा हा विचार ऐहिक परिभाषेत मांडण्याचा प्रयत्न केला. पेरिक्लीसने स्मशानभूमीवरील भाषणात म्हटले आहे की "ज्यांचा आधार योग्य काय याविषयीची सार्वत्रिक भावना हा आहे, अशा अलिखित कायद्यांचे पालन करण्याचे आम्हा अथेनियन लोकांना बाळकडू मिळाले आहे." डेमॉक्रिटसने लिहिले आहे, "भीतीमुळे नव्हे तर काय योग्य होय याच्या भावनेमुळे अयोग्य किंवा चुकीचे वर्तन करण्यापासून आपण परावृत्त झाले पाहिजे." सोफोक्लीसच्या अँटिगोन या नाटकातील नायिका दुष्ट कायद्याचे पालन करण्यापेक्षा मृत्यु स्वीकारते. नैसर्गिक कायद्याचे पहिल्यांदाच नीटपणे विवेचन व स्पष्टीकरण करताना ॲरिस्टॉटलने अँटिगोनचा संदर्भ दिला आहे. त्याने लिहिले की, "कायद्याचे दोन प्रकार होत– विशिष्ट व सार्वकालिक. प्रत्येक समाजाने आपल्या सभासदासाठी ठरविलेला व घोषित केलेला तो विशिष्ट कायदा होय.... सार्वकालिक कायदा म्हणजे निसर्गाचा कायदा होय ... आपणा सर्वांना कमी अधिक प्रमाणात याची जाणीव आहेच की माणसांना एकत्र गोवणारा समाज किंवा करार किंवा संकेतपरंपरा नसली तरीही योग्य व अयोग्य याचे सर्वांना बंधनकारक असणारे स्वरूप अस्तित्वात आहेच.

सोफोक्लीसच्या शोकांतिकेतील ॲंटिगोन क्रेऑनच्या हुकुमाविरुद्ध आपला भाऊ पॉलिनायसिस याला पुरताना 'ते कृत्य योग्य होय' असे म्हणते तेव्हा तिला हा 'नैसर्गिक' न्यायच अभिप्रेत असतो " ते कृत्य करायला प्रवृत्त करणाऱ्या कायद्याचे ॲंटिगोनेने केलेले वर्णनही ॲरिस्टॉटलने उद्धृत केले आहे," त्याचे शासन कालचे किंवा आजचे नाही. त्याचा उगम चिरंतन कालापासून झाला आहे. मानवाला त्याचा जन्म (केव्हा व कसा झाला ) माहीत नाही. "[1]

एम्पेडोक्लस व अल्सिडामस यांचाही असाच विश्वास असल्याचे त्याने उद्धृत केले आहे. ती कल्पना वातावरणातच भरून राहिली होती. स्टॉईक तत्त्वज्ञान्यांनी ती एक पाऊल पुढे नेली. त्यांचे म्हणणे की सर्व माणसे जन्मतःच स्वतंत्र आणि समान असतात, व सद्भावनेने एकमेकांशी बांधलेले असतात. गुलामगिरीवर आधारलेल्या रोमन विश्वात अशा कल्पनांना स्थान मिळाले नाही, पण आधुनिक क्रान्त्यात त्या अत्यंत उपयुक्त ठरल्या आहेत.

मात्र रोमन कायदा तयार करणारांना त्या अत्यंत अल्पांशाने उपयोगी पडल्या. जस्टीनिअनच्या **इन्स्टिटयूट्स्** मध्ये म्हटले आहे, " निसर्गाचे कायदे सदा स्थिर व अबाधित राहतात, कारण ईश्वरी प्रेरणेमुळे ते निर्माण झालेले असतात. " जस्टीनिअनने केलेली कायदेसंहिता (ॲरिस्टॉटलच्या परिभाषेतील 'विशिष्ट' कायदा) ही सार्वत्रिक नैसर्गिक कायद्याशी अतिशय जुळणारी आहे असे सूचित करण्याचाच हा प्रयत्न होता. वस्तुतः ती तशी जुळत नाही ही गोष्ट वेगळी. ते काही असो, सर्व माणसे निसर्गतः जे योग्य मानतात अशा निकषाच्या आधारावरच सर्व कायदे तपासले पाहिजेत हा अतिशय महत्त्वाचा वारसा रोमन साम्राज्याने मागे ठेवला आहे.

मध्ययुगात या संदिग्ध कबुलीला ख्रिश्चन संप्रदायसूत्राचे स्वरूप प्राप्त झाले. सेंट टॉमस ॲक्विनसने ते अतिशय क्रांतिकारक व रोखठोक सोपेपणाने मांडले आहे: " माणसाने तयार केलेले कायदे त्या हद्दीपर्यंतच विवेकाला धरून आहेत जोपर्यंत ते नैसर्गिक कायद्यापासून तयार केलेले किंवा त्याला अनुसरून आहेत. जर मानवनिर्मित कायदा हा एखाद्या तपशीलाबाबत नैसर्गिक कायद्याशी विसंगत असेल तर तो कायदा नव्हे, ते कायद्याचे अधःपतन होय. "

मात्र एखाद्याला सत्ताधाऱ्यांचा कायदा अयोग्य, नैसर्गिक कायद्याशी विसंगत आहे असे वाटले तर तेवढ्यावरून त्याचे उल्लंघन करायचा त्याला अधिकार आहे

---

१ त्या पंक्ति पुढीलप्रमाणे–

Not of today or yesterday its force :
It springs eternal–no man knows its birth.

असे मध्ययुगाला वाटले नाही. त्या युगाचे म्हणणे की सरकार किंवा सत्ताधारी लोक नैसर्गिक कायद्याला सोडून वागले असे चर्चने घोषित करीपर्यंत त्याने थांबले पाहिजे. मगच आज्ञापालन किंवा सत्ताधाऱ्याच्या निष्ठेपासून त्याची सुटका होत असे. रेफर्मेशन नंतरच्या काळात चर्च तोंड उघडीपर्यंत थांबण्याचे निदान प्रॉटेस्टंट जगतात तरी कारण राहिले नाही. मिल्टनसारखी माणसे राजाचे वागणे चूक की बरोबर, योग्य की अयोग्य याचा निर्णय स्वतःच घेऊ लागली. टॉमस जेफरसनने तसेच केले, फ्रेंच राज्य-क्रांतीच्या उद्गात्यांनी तसेच केले.

ॲंटिगोनच्या बंडाळ्याचे व अंतिम अधिकार चर्चचा आहे या ॲक्विनसच्या श्रद्धेचे समर्थन करणारी नैसर्गिक कायद्याची प्रणाली हीच अठराव्या शतकातील निरप-वादशाहीची शत्रू ठरली. नैसर्गिक शास्त्रांच्या आकस्मिक व धक्का देणाऱ्या यशामुळे ही प्रक्रिया अधिक बळावली. ज्याप्रमाणे सतराव्या शतकात ग्रोटिअसने म्हटले की माण-साच्या आचरणाच्या संदर्भात नैसर्गिक कायदा हा विश्वरचनेतच सामावलेला आहे, केवळ बुद्धीच्या साहाय्याने त्याचे आकलन होऊ शकते, कुठल्याही ईश्वरी शक्तीचा त्यासाठी आधार घेण्याचे कारण नाही, त्याप्रमाणे अठराव्या शतकातील वैज्ञानिक म्हणू लागले की निसर्गातील प्रत्येक घटना व घडामोड अपरिवर्तनीय कायद्याने बांधलेली आहे, माणसाला आपल्या बुद्धिशक्तीचा उपयोग करून हे कायदे शोधून काढता येतात किंवा जाणून घेता येतात, त्यासाठी दैवी आविष्कारांची किंवा अवतारांची काहीही गरज नाही.

ज्योतिषशास्त्र व पदार्थविज्ञान या क्षेत्रातील शोधांमुळे वरील धाडशी विचारांना एकदम भक्कम आधार मिळाला आणि माणसाला असा विश्वास वाटू लागला की त्याच्या आचरणाविषयीच्या कायद्यासकट सर्व नैसर्गिक कायद्यांचा शोध एके दिवशी लागू शकेल. खुळ्या समजुतींना न जुमानता निसर्गाचा ग्रंथ बारकाईने व बिनचूकपणे वाचणे हा तो कायदा शोधण्याचा मार्ग होय. त्याच ग्रंथात जॉन लॉकला १६८९ च्या वैभवशाली राज्यक्रांतीच्या सनातन सत्यतेचा आधार सापडला. तिसऱ्या जॉर्जविषयी वसाहतींना वाटणाऱ्या तिरस्काराला ‘ निसर्गाचे व निसर्गातील ईश्वराचे कायदे ’ यांचे समर्थन आहे. ज्यांच्या नावाने फ्रेंचांनी आपले सरकार उलथून पाडले व निम्मा युरोप जिंकून घेतला ते ‘ मानवाचे व नागरिकाचे हक्क ’ त्यांना याच निसर्गाच्या ग्रंथात सापडले.

तेव्हा आपण असे म्हणू शकतो की नैसर्गिक कायद्यात लोकांचा विश्वास अस-ल्याने इतिहासात तो अतिशय महत्त्वपूर्ण ठरला आहे; पण तो खरोखरच अस्तित्वात आहे की नाही हे आपल्याला अद्यापही माहीत नाही. तो संदिग्धतेच्या वेष्टनात

गुंडाळलेला असल्याने स्वातंत्र्याच्या मित्राप्रमाणे शत्रूही त्याचा वापर करू शकतात. दडपशाही विरुद्ध तो वापरला गेला की आपण त्याला अभिवादन करतो, पण दडपशाहीच्या समर्थनार्थच तो वापरला गेला तर आपण त्याला अभिवादन करू शकतो का?

युनायटेड स्टेट्स्मध्ये गुलामगिरीसंबंधी झालेल्या भांडणात ती नष्ट करावी म्हणणारांनी गुलामगिरीला मान्यता देणाऱ्या किंवा ती लादणाऱ्या संस्थानांच्या कायद्यांना व राज्यघटनेला विरोध करण्यासाठी 'उच्चतर' कायद्याचा, निसर्गाच्या कायद्याचा आधार घेतला. पण गुलामांच्या मालकांनी 'निसर्गाच्या ग्रंथा'वरच नजर टाकली व वेगळा मजकूर वाचला. गुलामगिरी 'नैसर्गिक' होती; 'काही अढळ कायद्यां'चाच ती परिपाक होती. उच्च प्रतीच्या संस्कृतीची ती किंमत होती–आणि या विधानाचे समर्थन करणारे उतारेच्या उतारे स्वातंत्र्यप्रेमी ग्रीकांच्या साहित्यातून देण्यासारखे आहेत.

तेव्हा शहाणपणाचा मार्ग हा दिसतो की निसर्गाला आपण बाजूला ठेवले पाहिजे, कारण अठराव्या शतकाने कल्पना केली त्यापेक्षा तो बराच गुंतागुंतीचा व अनाकलनीय आहे; आणि ईश्वरालाही दूर ठेवले पाहिजे कारण आपण कुठलीही बाजू घेतली तरी ईश्वर आपल्याच बाजूला आहे असे आपल्याला प्रामाणिकपणे वाटत राहते. पण स्वतंत्र माणसाच्या कायद्याचा आधार काय याचे उत्तर आपल्याला मिळाले पाहिजे. 'दंडसत्ता' हे उत्तर स्वीकारण्याच्या लायकीचे नाही, त्याशिवाय अधिक समर्पक उत्तर शोधले पाहिजे. माणसाच्या नम्रस्वरूपी विवेकबुद्धीत किंवा 'ज्यांना तो लागू आहे त्यांच्या समान सदसद्विवेकबुद्धी'त आपल्याला तो सापडणार नाही का? विवेकबुद्धि ही स्थूल व स्पष्ट नसल्याने ती विश्वासार्ह नाही, विकाराचा आवेग तिला विकृत स्वरूप देऊ शकतो, हे आपल्याला माहीत आहे. म्हणूनच चांगली माणसे देखील जेव्हा म्हणतात की गुलामगिरी ही प्रथा योग्य ( रीझनेबल ) आहे तेव्हा आपल्याला आश्चर्याचा धक्का बसू नये, कारण कालांतराने त्या युक्तिवादातले वैयर्थ्य त्यांचे त्यांनाच कळून येईल अशी आशा आपण बाळगू शकतो. विवेकबुद्धीचा सद्गुण असा की त्यामुळे आपले ध्येय ( कॉज) कधीच नष्ट होत नाही, उलट त्यासाठी तलवारीचा आधार घेतला तर पहिल्याच लढाईत ते ध्येय नष्ट होऊ शकते.

इंग्लंडचा कॉमन लॉ ( जो युनायटेड स्टेट्स्च्या बहुतेक भागात स्वीकारण्यात आला आहे ) हा विवेकबुद्धीच्या प्रगल्भ वापराचे एक चांगले उदाहरण आहे. सॅक्सन लोकांच्या चालीरीती पासून सुरुवात करून त्यावर नॉर्मन कायदेपंडितांनी आपले अन्वयार्थ दिले. बदलत्या परिस्थितीनुसार सूक्ष्मपणे व कल्पकतेने त्यात बदल करण्यात आले. त्यामुळे नैसर्गिक कायद्याच्या अगदी जवळचे म्हणता येईल अशा स्वरूपात तो

उत्क्रांत झाला. चिरंतन किंवा अतिनैसर्गिक कल्पनांना त्यात आवाहन नाही, आपली विवेकबुद्धी शक्य तितक्या निरलसपणे वापरणाऱ्या माणसांच्या अनुभवांचा तो परिपाक आहे. अशा अनुभवावर आधारलेल्या कायद्यांचे संबंधित लोकांकडून पालन होण्याची शक्यता फार आहे. अर्थात बदलत्या परिस्थितीनुसार त्यात परिवर्तन झाले नाही किंवा फारच मंद गतीने झाले तर क्रांतिकारक असंतोष निर्माण व्हायला वाव राहतो. कुठलीही गोष्ट अमर नसल्याने, आणि सर्व ऐहिक संस्था मानवाने आपल्या सोयीनुसार बनविलेल्या असल्याने क्रांतीविरुद्ध कायमचे व हमखास संरक्षण संभवत नाही.

म्हणून आपण असे सुचवावे की स्वतंत्र समाजात कायदा म्हणजे ( समाज जेवढी विवेकबुद्धी एकत्र करू शकेल तेवढ्या ) विवेकबुद्धीने तयार केलेले नियम असे मानावे. जर ते मान्य झाले नाहीत तर त्यांना कायद्याचा दर्जा प्राप्त होणार नाही, कारण त्यांचे पालनच होणार नाही. केवळ जुलमी राज्यातच लोकांना मान्य न होणारा व म्हणून गुप्त पोलिसांच्या साहाय्याने मध्यरात्री अंमलबजावणी केली जाणारा कायदा असू शकतो.

ऑलिव्हर वेंडेल होम्सनी म्हटले आहे, “ कायदेपंडिताच्या भाषेत कायदा म्हणजे न्यायालयामार्फत माणसावर सार्वजनिक दंडनाचा अंमल ज्या परिस्थितीत केला जातो त्या परिस्थितीचे सूत्रवजा वर्णन.” लोकशाहीत सार्वजनिक दंडनाचा उपयोग त्याच वेळी केला जाऊ शकेल ज्यावेळी कायदा योग्य (रीझनेबल) आहे अशी जनतेची खात्री पटलेली असेल. जनतेच्या मनात पूर्वग्रह साचलेले असतील व त्यामुळे त्यांना योग्य वाटणारा कायदा इतरांच्या दृष्टीने अयोग्य असेल— उदाहरणार्थ, अलाबामा संस्थानातील निग्रोंना वेगळी वागणूक देणारे कायदे. काटेकोरपणे बोलायचे तर ते ‘कायदे’ राहिलेले नाहीत, कारण त्यांना घटनाबाह्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. पण त्यांची अद्यापही अंशतः अंमलबजावणी होऊ शकते कारण स्थानिक जनतेपैकी बहुसंख्यांना ते कायदे वस्तुस्थितीशी मेळ खातात असा अद्यापही भ्रम आहे.

विवेक हा आधार मान्य केल्यामुळे या विषयाची चर्चा खुली राहते व त्यामुळे परिवर्तनालाही वाव राहतो. दंडसत्ता (होम्सचे लष्कर किंवा हॉब्ज्‌ची निरपवादशाही) हा आधार घेतला तर मतभेद मोडून काढण्यासाठी दंडसत्तेचा वापर किती करणे आवश्यक आहे याशिवाय दुसऱ्या कुठल्याच बाबतीत चर्चा होऊ शकत नाही. हॉब्ज्‌ने हे स्पष्ट केले आहे. त्याने सामान्य माणसाची विवेकबुद्धी ( ‘ जिच्यातून केवळ वाईटच निष्पन्न होते ’ ) निकालात काढली असून ज्याच्याविरुद्ध अपील नाही अशी शासन-संस्थेची अबाधित सत्ता यामुळेच खरे संरक्षण उपलब्ध असते असे त्याचे मत होय. आणखी असे की शासनाने आपल्या सोयीचे जाईल अशा रीतीने लोकमत बनवावे.

शासनाला ज्याचे साह्य होते ते चांगले; ज्याचा त्रास होतो ते वाईट. बहुतेक स्त्रीपुरुष म्हणजे शासनाने आपल्या फायद्यासाठी वापरायची साधने होत. "प्रवासी लोक जहाजासाठी जगत असतात."

हॉब्ज्च्या जुलूमशाहीत कायदे स्पष्टपणे मांडलेले असतात, कार्यकारी मंडळ त्यांना धाब्यावर बसवत नाही, आणि निःपक्षपाती न्यायालयांकडून त्यांची अंमलबजावणी होते म्हणून त्या व्यवस्थेला 'कायद्याचे राज्य' म्हणणे शक्य आहे. पण तेथे स्वातंत्र्य असणार नाही. म्हणून जॉन स्ट्रॅचीच्या म्हणण्याप्रमाणे कायद्याचे राज्य हेही एक आवश्यक स्वातंत्र्य मानावयाचे असेल तर त्या कायद्यांचा आधार विवेकबुद्धी किंवा कॉमन लॉमध्ये अध्याहृत असलेल्या 'सर्वसाधारण विचारी माणसांची' मान्यता हा असला पाहिजे. मग होम्सच्या सार्वजनिक दंडसत्तेचा वापर व्हायला हरकत नाही, कारण त्यामुळे अपाय होण्याची शक्यता फार कमी राहील.

एडवर्ड कोक या नामवंत पंडिताने सतराव्या शतकाच्या सुरुवातीला लिहिताना म्हटले की इंग्लंडचा कॉमन लॉ म्हणजे "दुसरे तिसरे काही नसून केवळ विवेक होय." हा कदाचित् फाजील आशावाद असेल; पण निदान तो कायदा माणसाच्या सारासार विवेकबुद्धीवर विश्वास ठेवतो. हा विश्वास सद्गुणी आहे, कारण सामान्य माणसाच्या सारासार विवेकबुद्धीचा आधार घेतल्याने वंश, धर्म, परंपरा यांच्या मर्यादा ओलांडून जाणाऱ्या सर्वसामान्य निकषाचा आपण वापर करू लागतो. त्यामुळे इतर राष्ट्रांना समजून घ्यायला व आपले वर्तन इतरांना समजण्याला काही समान माध्यम उपलब्ध होते. दंडसत्ता हा कायद्याचा खरा आधार नव्हे असे मानणारांना एक प्रश्न नेहमी विचारला जातो : "कायदा पाळण्यापूर्वीच त्यावर निवाडा देणे हे का व्यक्तीचे कर्तव्य आहे ?" स्वतंत्र समाजात प्रश्नाचे उत्तर 'होय' आणि 'नाही' असे आहे. विविध किरकोळ नियमनांच्या बाबतीत (उदा० मोटर वाहतुकीबाबतचे नियम) विशेष तत्त्वचर्चा करण्याचे कारण नाही; लोकांची खरी इच्छा प्रतिबिंबित झालेली नसताना दडपणामुळे किंवा फसवाफसवीमुळे किंवा लहरींमुळे तयार झालेल्या कायद्यांच्या बाबतीत (उदा० अमेरिकेतील दारुबंदी) चर्चा केली पाहिजे. पण आशयगर्भ कायद्यांच्या बाबतीत मात्र असे स्वातंत्र्य सरसहा वापरून चालणार नाही, कारण स्वतंत्र माणूस चळवळ करून तो कायदा अन्याय्य असल्याचे आपल्या शेजाऱ्यांना पटवून देऊ शकतो. म्हणून त्याने तसले कायदे पाळले पाहिजेत पण त्याचबरोबर आवश्यक वाटले ते बदलून घेण्यासाठी प्रयत्नशीलही राहिले पाहिजे.

जेथे युक्तिवाद दडपले जात नाहीत व विवेकबुद्धीचे राज्य चालते अशा खुल्या समाजात एखादा कायदा चुकीचा आहे असे वाटत असून देखील लोक त्याचे

स्वखुषीने पालन करतील; कारण त्याविरुद्ध निषेध नोंदविण्याचा व आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार वापरता येत असतो, व त्यासाठी तुरुंगात जावे लागत नाही. (स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्याबाबत ब्रिटिश पुरुषांच्या विवेकबुद्धीने आपले काम स्थगित ठेवले त्याप्रमाणे) विवेकबुद्धीचे काम स्थगित करण्यात आले तर कायद्याचे पालनही स्थगित होत जाते.

विवेकबुद्धीच्या आधारावरील कायद्याचे राज्य व दंडसत्तेच्या आधारावरील कायद्याचे राज्य यातील फरक अतिशय महत्त्वाचा आहे, कारण ते एक महत्त्वाचे स्वातंत्र्य आहे, त्याचप्रमाणे न्यायाचा पायाही तोच आहे.

स्वतंत्र संस्थांच्या वातावरणात राहणाऱ्या कुठल्याही आधुनिक माणसाला न्यायाची व्याख्या करायला सांगितली तर तो बहुधा म्हणेल : न्यायाची पहिली गरज अशी की कायद्यासमोर सर्व नागरिकांना समान वागणूक मिळाली पाहिजे, कायद्याने काही व्यक्तींच्या किंवा काही वर्गांच्या– समूहांच्या बाबतीत पक्षपात करू नये, न्यायालये निःपक्षपाती असावीत, आणि समाजाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अगदी किमान आवश्यक असतील तेवढीच बंधने कायद्याने स्वातंत्र्यावर लादावीत. इमॅन्युएल कांटने हा शेवटचा मुद्दा अतिशय चपखलपणे मांडला आहे. "न्यायावर आधारलेली घटना ती होय जिच्यात एकाच्या स्वातंत्र्याचे इतरांच्या स्वातंत्र्याबरोबर शांततापूर्ण सहअस्तित्व राहू शकेल अशा रीतीने कायद्यांची आखणी करून माणसाला जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्यात आलेले असते."

ही अगदी नेहमी सांगितली जाणारी बाब वाटेल. पण माणसाच्या लांबलचक राजकीय इतिहासात ती अतिशय क्रांतिकारक ठरली आहे, कारण न्यायाची ही व्याख्या शासनाला नव्हे तर व्यक्तीला केंद्रस्थानी मानून करण्यात आली आहे. प्लेटोला ती अतिशय चमत्कारिक वाटली असती. त्याने आपल्या 'रिपब्लिक' मध्ये म्हटले आहे की आदर्श शहराचा ऱ्हास होऊन त्याचा नाश होण्याने माणसाच्या सर्व चांगल्या गोष्टी धुळीला मिळतात, म्हणून शहराचा ऱ्हास टाळण्यासाठी केले जाणारे आचरण किंवा असणारी संस्था म्हणजे न्याय होय. तशा परिपूर्ण शहरात कुठलाही बदल होणे वाईटच, म्हणून अपरिवर्तनीयतेचे ज्यामुळे संवर्धन होईल त्यामुळे न्यायाचीही प्रस्थापना होते. आणि प्लेटोच्या त्या परिपूर्ण शहरातील समाजाची तीन कप्पेबंद वर्गात विभागणी केली असल्याने त्या वर्गरचनेचे जतन करणे हीही न्यायाचीच गरज होय!

परिपूर्ण शहरात (किंवा राज्यात) काय व्हावे याविषयी वादविवाद करण्याचे आपल्याला कारण नाही, कारण ते तसले शहर दृष्टीला पडण्याचाच धोका नाही.

मात्र याची आपण दखल घेतली पाहिजे की प्लेटोसारख्या आदर्शवाद्यांची देखील धारणा अशी की प्रवासी लोक जहाजासाठी असतात. शहरातील बहुसंख्य नागरिकांना गुलामीचे जीवन जगावे लागत असले तरी त्या परिपूर्ण शहराचे संपूर्ण संवर्धन झाले पाहिजे. हा फॅसिस्टांचा दृष्टिकोण होऊ शकतो, आणि कम्युनिस्ट देशांचा देखील तसाच असल्याचे दिसते. स्वातंत्र्य व लोकशाहीला त्यापासून गंभीर धोका आहे, आणि तरी मानवी इतिहासाच्या बहुतेक काळात तोच दृष्टिकोन प्रभावशाली होता असे दिसते. तो वातावरणात इतक्या दीर्घकाळपर्यंत राहिला आहे की आपले विचार गढूळ होऊ नयेत यासाठी सतत दक्ष राहिले पाहिजे. प्लेटोच्या 'रिपब्लिक'ची शैली आर्जवी आहे आणि अनेक चांगल्या भावना त्यात व्यक्त करण्यात आल्या आहेत. त्यामुळे बरेच लोक ते वाचतात. आणि आपण जुल्मशाहीचा पुरस्कार करणारा ग्रंथ वाचतो आहोत याचे भान फारच थोड्यांना असते.

## -- ४ --

रूझवेल्टने उद्घोषिलेली आणखी दोन स्वातंत्र्ये म्हणजे भयापासून व गरजांपासूनचे स्वातंत्र्य. १९४१ साली रूझवेल्टला या दोन स्वातंत्र्यांच्या प्राप्तीची खरोखरच आशा वाटत असावी. घनघोर युद्धाच्या वेळी युद्धानंतर स्वर्ग अवतरेल असे विचार माणसांच्या मनात घोळत असतात, पण वस्तुतः उलटेच घडत असते. नजीकच्या भविष्यकाळात कुठल्या सत्तागटाचा अंमल चालणार हा युद्धातला प्रश्न असतो, आणि भरपूर किंमत घेऊन युद्ध त्या प्रश्नाचे उत्तर देत असते. माणसाला आशा असते की 'सच्छील' गटाने यशस्वी व्हावे, आणि म्हणून युद्धे लढली जातात; पण युद्धात अनेक चांगली माणसे मारली जातात आणि चांगल्या चांगल्या शहरांची राखरांगोळी होऊन जाते हे माहीत असताना युद्धानंतर जग चांगले होईल अशी अपेक्षा करायला आपल्याला काहीही आधार नाही. "आर्थिक समजूतदारपणाच्या मार्गाने गरजेपासून स्वातंत्र्य– व **तेही जगात सर्वत्र.** जागतिक पातळीवर निःशस्त्रीकरण करून भीतीपासून स्वातंत्र्य– तेही **जगात सर्वत्र**" ही भाषा बोलत असताना रूझवेल्टने मात्र तशी भाबडी आशा हृदयाशी कुरवाळलेली दिसते. तो उपहासाने तर बोलत नव्हता ना अशी शंका आज यायला लागते.

पहिली गोष्ट अशी की निम्म्या जगाच्या गरजा पूर्ण होत नाहीत, त्या वखवखलेल्या राहतात; आणि अगदी जिगर दोस्त म्हणविणाऱ्या राष्ट्रातसुद्धा

आर्थिक समजूतदारपणा दिसत नाही. उलट राष्ट्रवादामुळे निर्माण झालेल्या आर्थिक अराजकाचा बुक्क्याचा मार तोंड दाबून सहन करावा लागतो आहे. आणि गरजेने गरज सारखी वाढते आहे, कारण भुकेने पछाडलेल्या लोकांना प्रजोत्पादना-शिवाय दुसेरे काही सुचत नाहीसे झाले आहे : " काटकसरीची सवय नसलेली शहरे उध्वस्त जीवनांचा फैलाव करीत आहेत, ज्यांना आपल्या वेडेपणाने एका कृतीशिवाय मनोरंजनाचे दुसेरे साधन ठेवलेले नाही; चित्रगुप्ताच्या दरबारातील निवाडयासारखे दृश्य सगळीकडे दिसत आहे, माणसांचा ढीग वाढतो आहे, आणि संपत्तीचा ऱ्हास होतो आहे. " [१]

दुसरी गोष्ट अशी की सर्व जग भीतीच्या कचाटयात सापडले आहे. भीतीच्या पोटी जास्त भीती जन्माला येते, आणि त्यामुळे शस्त्रास्त्रांचे प्रमाण कमी होण्याला पायबंद बसतो आहे.

आज ही स्वातंत्र्ये अशक्यप्राय वाटताहेत. पण जर आपणाला काही भविष्य असेल तर त्या भविष्यकाळात हे प्रश्न गंभीर स्वरूप धारण करतील. रूझवेल्टच्या चारपैकी पहिल्या दोन स्वातंत्र्यांचा ( भाषण व उपासना ) संबंध माणसाच्या स्वतःच्या पद्धतीने जगण्याच्या व विकास करून घेण्याच्या हक्काशी आहे. ही स्वातंत्र्ये कशी उपलब्ध करून घ्यायची हे आपल्याला माहीत आहे, आणि आपल्या प्रगत लोकशाही देशात आपण या बाबतीत जवळ जवळ यशस्वी झालो आहोत. पण दुसऱ्या दोन स्वातंत्र्यासाठी परस्परावलंबनाची, आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक आणि राजकीय संघटनांद्वारा प्रयत्न करण्याची गरज आहे. पहिल्या प्रकारची स्वातंत्र्ये वैयक्तिक आहेत तर दुसऱ्यांचे स्वरूप सामूहिक आहे. दुसऱ्या प्रकारच्या स्वातंत्र्यांमुळे पहिल्या प्रकारच्या स्वातंत्र्यांवर काही अंशी बंधने येतील, कारण त्याच्या अभिव्यक्तीसाठी देशांतर्गत व शेजारच्या मित्र देशांबरोबर सामाजिक संघटनेची गरज आहे, त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्य व राष्ट्रीय सार्वभौमत्व या दोन्हीवर मर्यादा येतात.

सध्या स्वप्नाळू वाटणाऱ्या गरज व भीती यापासूनच्या स्वातंत्र्यांचे सुख अनुभवायचे असेल तर सर्व प्रकारच्या नवख्या परदेशीयांबरोबर स्नेहाने एकत्र

---

१ मुळातील पंक्ति पुढीलप्रमाणे–

The Thriftless towns litter with lives undone,
To whom our madness left no joy but one;
And irony that glares like Judgment Day
Sees Men accumulate and Wealth decay.

जगण्याच्या व राष्ट्रीय स्वार्थ आणि वैयक्तिक अहंकार यांचा त्याग अपेक्षिणाऱ्या शिस्तीचे बंधन स्वतःवर घालून घ्यावे लागेल.

" अंतिमतः वैयक्तिक स्वातंत्र्यावर आधारलेल्या आपल्या संस्कृतीच्या कल्पनेचा गरज व भीती यांचे निर्मूलन सामूहिक शिस्तीच्या मार्गानेच होऊ शकेल या ज्ञानाशी मेळ बसू शकेल काय ? " असा प्रश्न रूसी द् सेल्स ने विचारला आहे. स्वातंत्र्य आणि कार्यक्षमता ( किंवा व्यक्तीचे स्वेच्छेनुसार वर्तन करण्याचे स्वातंत्र्य आणि जगाचे गरजेपासूनचे स्वातंत्र्य ) यांच्या मधील शृंगापत्तीपासून सहजासहजी सुटका दिसत नाही. राजकीय जीवनात आतापर्यंत घडत आले त्याप्रमाणे एका असमाधान-कारक पर्यायापासून दुसऱ्या तितक्याच किंवा फार तर थोड्या कमी असमाधान-कारक पर्यायापर्यंत आपल्याला ठल्ले खात मार्ग काढावा लागेल. आनंदपर्यवसायी शेवटाची हमी आपल्याला कोणीच दिलेली नाही. त्याचा अर्थ असा नाही की ज्याच्या दिशेने आपण सतत धडपडत वाटचाल करावी अशा त्या स्वातंत्र्याचे मोल किंवा निरपराधित्व नष्ट होते. त्याचा अर्थ एवढाच की मनुष्य जातीच्या बचावासाठी सामूहिक स्वातंत्र्ये कधी कधी इतकी महत्त्वाची होतात की त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्यांचा थोडा संकोच करावा लागतो– मात्र केवळ संकोचच. सामूहिक स्वातंत्र्यांनी वैयक्तिक स्वातंत्र्याची गळचेपी कदापीही करता कामा नये, कारण मानवी प्रगतीची जी काय थोडीफार आशा आहे ती त्यावरच अवलंबून आहे.

---

# प्रातिनिधिक लोकशाही

ज्यांचा उपभोग आपण घेतला व ज्यांच्या संरक्षणासाठी आपली धडपड चालली आहे त्या स्वातंत्र्यांचे धोके काय आहेत हे आपण पाहिले. एका बाजूला स्वातंत्र्य आणि दुसऱ्या बाजूला चांगला राज्यकारभार, सुरक्षितता हे दोन्ही वरदान एकाच वेळी मिळवायचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक समाजाला त्या धोक्यांना तोंड द्यावे लागेल. नव्या राष्ट्रांना या धोक्यांना एकेक करून तोंड द्यावे लागेल. अर्धवट यश व काही अपयश यांनी भरलेल्या आपल्या प्रदीर्घ कहाणीचे त्यांनी नीट परिशीलन केले तर बऱ्याच शहाणपणाचा त्यांना लाभ होइल. कारण त्याशिवाय अद्याप न शोधलेला असा स्वातंत्र्याचा दुसरा कुठलाही प्रकार संभवत नाही. अपवाद एकच– रानटी माणसाचे स्वातंत्र्य. आणि रूसो काहीही म्हणो, तो प्रकार फारच क्लेशकारक आणि अल्पजीवी होय. स्वातंत्र्याचे धोके खूप असले तर लोकशाही- ( आपल्या स्वातंत्र्याची सर्वात चांगली संरक्षक ) चे धोकेही जवळ जवळ तितकेच आहेत.

स्वातंत्र्याची चर्चा करताना आपल्याला असे आढळून आले की त्याचा पाया असलेल्या कायद्याची व त्या कायद्यासाठी कुठला आधार मान्य करायला आपण तयार आहोत याची चर्चा करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपल्या अनेक राष्ट्रात अंगीकारल्या गेलेल्या लोकशाहीची चर्चा करताना फ्रेंच राज्यक्रान्तीनंतर ज्याने सबंध जगावर छाप पाडली आहे त्या राष्ट्रवादाचा विचार करणे आवश्यक आहे. राष्ट्रवाद हा वरदान नसून शाप आहे असेच चर्चेअंती दिसून येईल, पण आधुनिक राजकीय इतिहासातील ती एक प्रचंड घटना आहे हेही नाकारता येणार नाही. त्याचे आजचे स्वरुप ही अगदी अलीकडची घटना आहे. त्यामुळे त्याच्या हातून संस्कृतीचा नाश होण्यापूर्वीच आपण त्याच्या मर्यादा ओलांडू शकू अशी आशा बाळगायला हरकत नाही.

आज आपले सर्व लोकशाही समाज ही राष्ट्रशासने ( नेशनस्टेट्स् ) आहेत. समाज एकत्र रहावा यासाठी आवश्यक असलेले प्रेम व निष्ठा राष्ट्र-शासन या राजकीय स्वरूपामुळे निर्माण होते किंवा टिकू शकते असे दिसते. पण हेही खरे की राष्ट्र–शासन हे शांततेचा शत्रू आहे, व्यापक प्रमाणावरील कायदा व सुव्यवस्थेचा ते विरोधक आहे; राष्ट्रशासनांनी निर्माण केलेले अराजक लोकशाही जिंकू शकली नाही तर तिचाच त्या अराजकात बळी पडेल, आणि म्हणून या अर्थाने राष्ट्र–शासन

हा लोकशाहीचा नकार (निगेशन) आहे. देशभक्ति ही आरोग्यवर्धक होऊ शकते, आणि मानवजातीवरील निष्ठेला ती मज्जावच करते असे नाही. राष्ट्रवाद म्हणजे संघटित केलेला स्वार्थ किंवा अप्पलपोटेपणा होय, त्यामुळे त्याच्या पडच्छायेत सर्व मानवतावादी भावना आटून जातात. 'चूक असो की बरोबर, माझा देश हेच प्रमाण' ही घोषणा लोकशाहीशी सुसंगत नाही.

## – २ –

प्राचीन काळातील टोळी– स्वरूप जमातीत आणि नंतरच्या ग्रीसमधील सुधारलेल्या समाजात व रोमन प्रजासत्ताकातसुद्धा कार्थेजच्या उदाहरणाने दाखवून दिल्याप्रमाणे युद्धातील पराजय म्हणजे संपूर्ण विनाश ठरत असे, किंवा मेलोस् बाबत घडले त्याप्रमाणे गुलामगिरी व मृत्यू यांचे थैमान होत असे. तटस्थता किंवा आंतरराष्ट्रवाद अशक्यच होता. आपल्या जन्मभूमीसाठी लढणे हे माणसाचे आदि कर्तव्य मानले जाई. एखाद्या समाजाने या कर्तव्याकडे दुर्लक्ष केले तर शेजाऱ्यांच्या हल्ल्याला तो तात्काळ बळी पडे.

रोमन साम्राज्यामुळे क्षितिजाची कक्षा थोडी तरी उंचावली. बऱ्याच दूरवर राहणाऱ्या लोकांना आपले नागरिक–बंधु मानायला माणसे शिकली. सुसंस्कृत जगताचे संरक्षण दूरवरच्या तटावरून व्यावसायिक सैनिक करीत, आणि त्यामुळे मायदेशी संस्कृति, खेळ आणि अवनती यांना सवड मिळत असे. रोमच्या ऱ्हासानंतर युरोपात ही समान निष्ठेची कल्पना चालू राहिली– पण तिचे केंद्र चर्च हे झाले. चर्च दुभंगले त्यावेळी प्रचंड रक्तपात झाला; तरी एकतेचे जुने स्वप्न रेंगाळत राहिले, आणि टोळीवाल्यांची किंवा धार्मिक युद्धे या काळया गतकाळातील घटना होत अशी स्थिती अठराव्या शतकात निर्माण झाली. गिबनच्या 'रोमन साम्राज्याच्या पश्चिमेकडील अवनतीबाबत काही विचार' यात अठराव्या शतकातील ही मनःस्थिती व्यक्त झाली आहे : "युरोप हे एक प्रजासत्ताक असून त्याच्या विभिन्न रहिवाश्यांनी शिष्टाचार व शालीनता यांची जवळजवळ समान पातळी गाठली आहे असे तत्त्वज्ञान्याने गृहीत धरले तर त्याला हरकत असू नये. सत्तेचा समतोल बदलत राहील, आणि आपल्या देशाचे किंवा शेजाऱ्यांचे वैभव आलटून पालटून कमी जास्त होत राहील; पण या आंशिक घटनांमुळे, युरोपियन लोक व त्यांच्या वसाहती इतर मानव जातीपासून ज्यामुळे वेगळया उमटून दिसतात त्या, सर्वसाधारणपणे पसरलेले समाधानाचे वातावरण, कला, कायदे, शिष्टाचार या बाबी नाश पावणार नाहीत.....शांततेच्या काळात

विविध स्पर्धकांच्या चढाओढीमुळे ज्ञान व उद्योग यांच्या प्रगतीचा वेग वाढत राहतो; युद्धाच्या काळात युरोपियन सैन्ये निकाली लढाया न लढण्याचा संयम दाखवतात. ''

जीवन नेहमीप्रमाणे ' महापुरुषाला चकवा ' हा खेळ खेळत होते. डिक्लाईन अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर या ग्रंथाचा शेवटचा खंड १७८८ साली प्रसिद्ध झाला. पुढल्याच वर्षी ब्रॅस्टीलचा तुरुंग फोडण्यात आला, आणि तेरा वर्षानंतर जेना विद्यापीठात हेगेल तत्त्वज्ञानाचे पाठ देत होता. मुक्ती- (लिबर्टी)च्या नावाने फ्रेंचानी स्पार्टन लोकांची धर्मवेडी शासन-पूजा पुनरुज्जीवित केली व तिचे राज्यक्रान्तीच्या बेफाट शक्तींबरोबर लग्न लावून दिले. ईश्वरी राजसत्तेच्या नावाने हेगेलने पुराणकालातील वांशिक–शासनसंस्थेला देवतास्वरूप दिले आणि नागरिकांना त्याच्या सेवेसाठी पोलादी साखळदंडांनी जखडून टाकले. राजे आणि मुक्तिदेवतेचे पुजारी इतिहासाच्या उदरात गडप झाले; पण आपल्या स्वातंत्र्यांना धमकावणी देणारा व अंतिम युद्धाची तयारी करीत असलेला नवा राष्ट्रवाद शिल्लकच आहे.

१७९३ च्या फ्रेंचांच्या लष्करीकरणाच्या कायद्यात म्हटले आहे : " आज-पासून फ्रेंच भूमीवरून सर्व शत्रूंना हाकलून लावीपर्यंत सर्व फ्रेंच नागरिक लष्कराच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत असे मानले जाईल. तरुण लोक रणांगणावर जातील; विवाहित पुरुष शस्त्रास्त्रे तयार करतील आणि सामानाची वाहतूक व पुरवठा करतील; स्त्रिया तंबू व कपडे तयार करण्याचे आणि रुग्णालयातील कामे करतील; लहान मुले फाटक्या कपड्यापासून जखमा गुंडाळण्यासाठी पट्ट्या तयार करतील; वृद्ध माणसांना चौकाचौकात उभे केले जाईल, त्यांनी सैनिकांचा उत्साह वाढविण्याचे व राजेलोकांचा द्वेष आणि प्रजासत्ताकाचे ऐक्य लोकांच्या मनावर बिंबविण्याचे काम करावे. ''

यावर ॲर्नाल्ड टायन्बीचे भाष्य असे : " लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी फ्रेंच शासनाचे सार्वजनिक सुखसोयी पुरवठामंडळाऐवजी वंदनीय देवतेत रूपांतर करण्यात आले. '' त्या अभिनव देवतेमुळे भारून जाऊन मेरी जोसेफ चेनियरने लोकसभे (कन्व्हेन्शन)ला सांगितले, " पदच्युत करण्यात आलेल्या रूढी व चाली-रीतींची दगडमाती पायात चिणून त्यावर एकमात्र नैसर्गिक धर्माची स्थापना करायला हवी, ज्याचे पंथ असणार नाहीत वा गूढ गुपितेही असणार नाहीत. त्याचे धर्मप्रसारक म्हणजे आपले विधिमंडळाचे सभासद असतील, त्याचे पुरोहित म्हणजे आपले कार्यकारी अधिकारी असतील. या धर्माच्या मंदिरात मानवजात आपल्या देशाच्या बलिवेदीवर धूपदीप अर्पण करील– जो देश म्हणजे आपली मायभूमी व आपली दैवगती होय. ''

ही अगदी कठोरकर्कश माता होय, आणि ती दैवगती म्हणजे ओल्ड टेस्टामेंट मधील द्वेषगती होय; कारण ज्या नागरिकांचा मतभेद असेल त्याना शिस्त लावून सुधारण्याची सोय नाही, त्यांना सरळ ठारच मारले जाते. कन्व्हेन्शनपुढे बोलताना सेंट जस्ट म्हणाला, " जोपर्यंत स्वातंत्र्याचा एक तरी शत्रू जिवंत आहे तोपर्यंत परिस्थिती सुधारण्याची आशा नाही ... फ्रेंच जनतेने एकदा आपली इच्छा जाहीर केल्यानंतर त्याच्याशी विसंगत असलेली प्रत्येक बाब राष्ट्राच्या सार्वभौमत्वाच्या बाहेरची मानली जाईल; आणि जो त्या सार्वभौमत्वाच्या बाहेर उभा राहील तो राष्ट्राचा शत्रू होय." पण हे 'लोक' म्हणजे तरी कोण ? ज्याने आजूबाजूला नजर टाकली आहे त्या प्रत्येकाला हे माहीत आहे की लोक सतत बदलत असतात, बुद्धिमत्तेच्या बाबतीत ते असमान असतात, छंद, करमणुकीची साधनें, गरजा या सर्व बाबतीत ते विभागलेले असतात, एक जण दुसऱ्यापेक्षा जितका निराळा असणे शक्य आहे तितका तो निराळा असतो. ते काही नॉर्वेजियन मासे नव्हेत, प्रत्येकजण वैशिष्ट्यपूर्ण किंबहुना काही अंशी त्रासदायक व्यक्ती होय, एका आवाजात उद्घोषित करता येईल अशी त्यांची समान इच्छा वगैरे काही नसते. सेंट जस्टने अशा आविर्भावाने भाषण केले की लोकांना काय हवे ते त्याला जणू बिनचूक माहीत आहे. त्या आत्मविश्वासाच्या आधारे तो व त्याच्या मित्रांनी सत्ता गाजवली आणि अल्पकाळातच नेपोलियनने त्यांचा खेळ संपवला. पण राष्ट्र म्हणजे मायभूमी किंवा दैवगती, हा लोकभ्रम रेंगाळतोच आहे.

स्वतःला मानवहृदयी मानणाऱ्या एका बुद्धिमान व प्रामाणिक कम्युनिस्टाला त्याचा मायदेश रुमानिया येथील निवडणुकांच्या गौप्याचा खुलासा विचारण्यात आला " इतके शंभर टक्के एकमत झाले म्हणजे त्या निवडणुकीतले मतदानदेखील आदेशाबर-हुकूम झाले असे का नाही समजायचे ? " त्याला काहीसा धक्का बसला, तो गोंधळल्या-सारखा झाला. पण म्हणाला " मतदान आदेशाबरहुकूम झाले हे खरेच आहे. पण तसे होण्यात काय चूक ? लोक इतके अज्ञानी आहेत की कम्युनिस्टांना मत देण्याची त्यांना अक्कल नाही. म्हणून त्यांना आदेश देणे आमचे कर्तव्यच होय. " सेंट जस्टप्रमाणे त्याच्याही मते काय योग्य हे शासनाला कळतच होते. आणि शासन म्हणजे सत्ता आपल्या हाती ठेवण्यानेच आपण सर्वांचे कल्याण साधतो असा प्रामाणिक समज असलेली व म्हणून इतर माणसांवर हुकमत गाजवणारी मूठभर माणसे होत.

क्रांतीच्या परमोच्चक्षणी बरेटने घोषणा केली, " मुले ही प्रजासत्ताकाची संपत्ती होय. सुरवातीच्या काही वर्षात तुम्हाला मार्गदर्शन करण्याचे काम पालकांवर सोपवले जाईल, पण तुमची बुद्धिमत्ता आकाराला आल्याबरोबर तुम्हाला ताब्यात ठेवण्याचा आपला अधिकार प्रजासत्ताक अभिमानाने वापरील. तुमचा जन्मच प्रजासत्ताका-

साठी झाला आहे." हिटलरने अशीच भूमिका घेतली होती. 'वैयक्तिक सुखाचे दिवस संपले आहेत' असे सांगून त्याने सूचित केले की नागरिकाचे जीवन हे यापुढे शासनाची शक्ती व वैभव वाढविण्यासाठीच वापरले गेले पाहिजे.

दि हिस्टॉरिकल इव्होल्युशन ऑफ मॉडर्न नॅशनॅलिझम या ग्रंथात कार्लटन हायेस याने पुढील शब्दात सार मांडले आहे : "'लोक' हेच 'राष्ट्र' झाले आहे, ते गूढमय अस्तित्व (एंटिटी) किंवा निरपवाद सार्वभौम बनले आहे, केवळ काही वर्गांचेच नव्हे तर सर्व व्यक्तींचे श्रद्धास्थान झाले आहे. ते आपल्या नागरिकांना पोपटपंची करायला लावते, आणि शेजारच्या राष्ट्रातल्या नागरिकांनाही बळदंडाच्या जोरावर पोपटपंची करायला लावण्याचा प्रयत्न करते ... कुठल्याही वस्तूचा ताबा घेऊन ते ती नष्ट करू शकते, कारण त्याच्या वर कुठलाही कायदा नाही... मतभिन्नता, संघर्ष, अल्पसंख्य यांचा त्याला धसका वाटतो. एकता, सर्वसमानता आणि एककेंद्रितता यासाठी ते प्रयत्न करते......त्याला मोलाची वाटणारी मुक्तता किंवा स्वातंत्र्य हे अंतिमतः व्यक्तीसाठी नाही तर राष्ट्र-शासनासाठीच होय. राष्ट्र स्वतःच्या इच्छेप्रमाणे काहीही करू शकते; व्यक्तीने राष्ट्र-शासन ठरवील तेच केले पाहिजे."

अशा समाजात आपल्या पाश्चात्त्य स्वातंत्र्यांना क्वचितच स्थान असते; पण हेगेलने पुरस्कारलेल्या शासनसत्तेपेक्षा (फ्रेंच)क्रान्तीचे अधिराज्य दयाळूपणाचेच म्हटले पाहिजे. स्वातंत्र्य, समता व मानवमात्राचे बंधुत्व यांच्या नावाने त्या क्रांतीने स्वातंत्र्याची गळचेपी केली. या अपव्यवहारावर चांगल्या कल्पनांचा कधी ना कधी विजय होऊ शकेल. पण हेगेलने तर नेपोलियनच्या गमनानंतर झालेल्या प्रशियन प्रक्रियेचा भाग म्हणूनच स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा पुरस्कार केला आहे. त्यानेही असेच प्रतिपादन केले की शासनसत्ता म्हणजेच सर्व काही होय, व्यक्ती म्हणजे कःपदार्थ! त्याने म्हटले आहे, "दैवी कल्पनेचा पृथ्वीवरील आविष्कार म्हणजे शासनसत्ता होय." तसेच "दैवी शक्तीचा पृथ्वीवरील आविष्कार म्हणून शासनसत्तेची आपण पूजा केली पाहिजे... ईश्वराची जगात होणारी वाटचाल म्हणजे शासनसत्ता होय" ती स्वतःसाठीच अस्तित्वात येते, आणि तिच्यातच (किंवा तिच्यामार्फतच) आपण नीतिशुद्ध जीवन प्राप्त करू शकतो.

या कल्पना वाचून प्रशियाचा राजा तिसरा फ्रेडरिक विल्यम खूष झाला असेल. त्याने १८१८ साली हेगेलला बर्लीन येथे बोलावून तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक केले. हेगेलने राज्यक्रान्तीच्या राष्ट्रवादाला माणसाळवून प्रशियन शासनसत्तेच्या शिस्तबद्ध उपासनेत त्याचे रूपांतर केले. सर्वंकषसत्तावादाचे आधुनिक पुरस्कर्ते हेगेलचे

फार मोठे ऋण मानतात यात आश्चर्य नाही. स्वातंत्र्याविरुद्धच्या बंडाव्याला त्याने स्पार्टन साधेपणाच्या चळवळीचे स्वरूप दिले; सर्वंकषसत्तावाद्यांनी त्याचे समूहाच्या वेडाचारात रूपांतर केले; पण मुळात तो स्वातंत्र्याविरुद्धचा बंडावाच होय.

हेगेलच्या मते शासनसत्ता म्हणजेच नैतिक कायद्यासकट सर्व प्रकारच्या कायद्यांचे मूर्तिमंत स्वरूप होय. हिटलरचे तेच मत होते; आणि न्यूरेंबर्गच्या न्यायालयातील अपराध्यांनी अश्रुपूर्ण शब्दात चुकीच्या आज्ञा पाळत असल्याचा जो कबुलीजबाब दिला त्याच्यामागचे तर्कशास्त्रही हेच होय. मुसोलिनीला अस्सल शासनसत्ता उभारण्यात यश आले असते तर त्यानेही असेच मत जोरदारपणे मांडले असते. आणि त्यातच स्वातंत्र्याचा मृत्यूही लपलेला आहे. कारण अशा शासनसत्तेच्या वर्तनाची चिकित्सा किंवा न्यायनिवाडा कुठल्याही बाह्य निकषांनी करता येणार नाही, व्यक्तीची किंवा 'भांडवलशाही' नीतिमत्ता ह्या निकषांनी तर नाहीच नाही. यशाची कसोटी एकच– शासनसत्तेचे सामर्थ्य, आणि तिला आव्हान द्यायला भीती वाटेल असा इतर देशात पसरलेला दरारा. ज्यांच्या कल्पना वेगळ्या आहेत त्यांच्याबाबत हेगेलचे म्हणणे असे की, "शासनसत्तांच्या विशिष्ट इच्छांचे एकमत झाले नाही तर वादविवादाचा निर्णय फक्त युद्धानेच लागू शकतो." आणि असे गृहीत धरलेले दिसते की युद्धात नेहमी हेगेलियन किंवा स्पार्टन शासनसत्तेचाच विजय होणार, कारण तेथील समाजाचे सर्व जीवनच तिच्या सेवेसाठी वाहिलेले असते.

जीवनविषयक अशा दृष्टिकोनाची लज्जास्पदता एका किरकोळ उदाहरणाने दाखविता येईल. जेव्हा स्वातंत्र्याची गळचेपी करायची असते (किंवा तोंडदेखली स्तुती करीत त्याची उपेक्षा करायची असते) तेव्हा प्रथम गप्प बसवावे लागते इतिहासकाराला. राष्ट्रवादाच्या अनेक गुन्ह्यांपैकी सर्वात भयंकर गुन्हा म्हणजे राष्ट्र–शासनांचा 'इतिहास' ज्यांच्या द्वारा शिकविला जातो ती इतिहासाची क्रमिक पुस्तके होत. अमेरिकेतील बऱ्याच संस्थानातील विधिमंडळसदस्यांच्या एका गोष्टीविषयी अगदी पक्का विश्वास आहे : युनायटेड स्टेट्सने कधीही चुकीचे वर्तन केलेले नाही, क्रौर्याचे आचरण केले नाही, दुसऱ्यावर अन्याय केला नाही, की कधी कोणाच्या हातून पराभव खाल्ला नाही. आणि अशाच विधिमंडळ सदस्यांना स्थानिक शिक्षण-संस्थातून एखाद्या पुस्तकाला बंदी घालण्याचा अधिकार असतो. याचा परिणाम अपेक्षेइतका भयानक झालेला नाही, कारण ते सदस्य बहुधा गलथानपणे वागतात, पुस्तके वाचण्याचेही कष्ट घेत नाहीत. ज्यांचा असा पूर्ण विश्वास आहे की शासन-सत्ता कधीच चुकत नाही व तिचे नेते पवित्र आहेत, अशा हेगेलियन शासनसत्तेच्या

सुशिक्षित व चोख अधिकाऱ्यांनी ज्ञानाच्या सर्व साधनांवर नियंत्रण ठेवले तर काय परिणाम होईल ? याचे अंशतः उत्तर आपल्याला रशियात सापडते.[1]

स्टॅलीन मेल्यानंतर त्याच्यामागे मॅलेंकॉव्ह सत्ताधारी होणार असे दिसू लागले तेव्हा प्रावदात एक फोटो प्रसिद्ध करण्यात आला ज्यात तो स्टॅलीन व माओत्सेतुंग यांच्या सोबत असल्याचे दाखविले आहे. तीन वर्षांपूर्वी तोच फोटो प्रसिद्ध झालेला होता, पण त्यात मॅलेंकॉव्ह हा स्टॅलीनच्या इतक्या जवळ नव्हे तर बराच लांब दाखविला होता. जेव्हा बेरियाला परकीय राष्ट्राचा गुप्तहेर ठरवून ठार मारण्यात आले तेव्हा लार्ज सोव्हिएट एन्सायक्लोपीडिया-( विश्वकोश )ने आपल्या सर्व वर्गणीदारांना 'बेरिंग स्ट्रेट्स्' या विषयावरील लेख पाठविला आणि विश्वकोशातील 'राष्ट्रद्रोही' बेरिया वरील लेखाऐवजी तो वाचला जावा अशी सूचना करण्यात आली. सोव्हिएट इतिहासाचे एक पुस्तक 'शॉर्ट कोर्स' याच्या १९३८ च्या आवृत्तीत स्टॅलीनला देवसमान लेखले होते आणि त्याचे टीकाकार कोणी नाहीतच, किंवा असले तर सैतानी प्रवृत्तीचे होत असे दाखविलेले होते. हे 'सत्य' ख्रुश्चोव्हने स्टॅलीनविरोधी मोहीम ( त्याच्या मृत्यूनंतर ) सुरू करीपर्यंतच टिकले. म्हणून 'शॉर्ट कोर्स'च्या त्या वेळच्या आवृत्तीत एकेकाळी सर्वशक्तिमान असलेल्या त्या राष्ट्रनायकाला लक्षात येणार नाही अशी पार्श्वभूमीतली जागा देण्यात आली. आणि सांप्रतकाळी हिस्टरी ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी ऑफ दि सोव्हिएट युनियन हा ग्रंथ मागे घेण्यात येत आहे. कारण ख्रुश्चोव्ह हा कोणी विशेष महत्त्वाचा नेता नव्हता, त्याचे वरिष्ठ मधून मधून त्याला किरकोळ भाषणे करायला परवानगी देत होते, असा नवा इतिहास लिहिला जात आहे.

हा सर्व एक मोठा विनोद आहे असे वाटेल; पण रशियन लोक एकमेकांच्या बाबतीत जर असे करतात तर परकीयांविषयी काय करत असतील ? बाहेरचे सगळे जग सैतानांनी भरलेले आहे, सोव्हिएट रशियाचा नाश करायचे त्यांचे कट चालले आहेत, रशियन शेतकऱ्यांना कमी धान्य पिकवा अशी चिथावणी देत आहेत, आणि एकंदरीने त्याच्या जीवनाच्या झऱ्यात विष कालवीत आहेत असा सर्वसाधारण सज्जन रशियनाचा प्रामाणिक समज होत असला तर त्यात आश्चर्य कसले ? राजकारणाचा पहिला व शेवटचा हेतू म्हणजे शासनसत्तेचे सामर्थ्य वाढविणे असे समाजाला वाटले किंवा तसे वाटायला भाग पाडण्यात आले तर स्वातंत्र्य आणि न्याय यांचा लोप होतो एवढेच नाही, निःपक्षपाती, वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्याच्या माणसाच्या तुटपुंज्या पण

---

१ पुढील घटनांची माहिती दि टाईम्स, लंडन, या वृत्तपत्रातील बातम्यांच्या आधारे दिली आहे.

प्रामाणिक प्रयत्नांना मूठमाती मिळते. सर्वसाधारणपणे प्रामाणिक व वस्तुनिष्ठ इतिहास ज्या माणसांजवळ नसेल त्याच्यात आणि स्मरणशक्ति नसलेल्या पण भरमसाट वेडगळ कल्पना असलेल्या माणसात फरक काय ?

फ्रेंच राज्यक्रांतीचा अतिउत्साह आणि त्यानंतर झालेली प्रतिक्रिया या दोन्हींमुळे नव्या राष्ट्र-शासनांना प्रोत्साहन मिळाले. आजच्या विस्तृत आर्थिक एककांच्या आणि प्रत्येक जिवंत वस्तूचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या शस्त्रांच्या युगात स्वयंकेंद्रित शासनसत्ता ही ( एक जुलूमशहाची सोय सोडली तर बाकी ) सर्व अर्थांनी कालविसंगत वस्तु होय. स्वातंत्र्याचा शोध घेणाऱ्या ( आणि स्वातंत्र्य एका व्यक्तीचे असूच शकत नाही, ते फक्त रानटी माणसाबाबतच संभवते ) व लोकशाही- ( जी बंधुभावनेची संहिता होय ) चा पुरस्कार करणाऱ्या पाश्चात्त्य जगतात तर ती एक विलक्षण व धोकादायक कल्पना होय.

लोकशाहीची सेवा करण्यासाठी आपण दुहेरी निष्ठा जोपासण्याची गरज आहे; एक आपल्या देशाशी आणि दुसरी मानवजातीशी (किंवा त्यापैकी जेवढा विभाग आपणाशी संवाद करायला तयार असेल त्याच्याशी ). कम्युनिस्टांनी आपल्या मार्गाने ही व्यापक निष्ठा निर्माण केली आहे. पण ते लोक फक्त कम्युनिझमवर विश्वास ठेवणाऱ्यांशीच बोलायला तयार असतात; उलटपक्षी आपली मने व आपले राजकारण जिवंत व चैतन्यशाली ठेवायचे असेल तर मतभेदांचा शोध घेऊन त्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

अहंमन्य राष्ट्रवादाविरुद्धची शेवटची तक्रार अशी की परराष्ट्रीय संबंधात त्यामुळे धोकादायक कडकपणा (रिजिडिटी) निर्माण होतो. एकदा का एखादा 'हक्क' किंवा 'तत्त्व' शासनसत्तेच्या नावाने ( किंवा आणखी वाईट म्हणजे 'राष्ट्रीय हिताची बाब' या नावाने ) उद्घोषिले गेले म्हणजे एरवी शांत सरळ असलेले लोकशाही राष्ट्र देखील एकदम तापते व भांडकुदळ बनते. त्यामुळे युद्धे निर्माण होतात. बोनर लॉ यांनी म्हटले आहे, "अमुक एक युद्ध 'अटळ' होते याला काही अर्थ नाही. युद्ध होते ते माणसाच्या शहाणपणात उणीव राहून जाते म्हणून." त्याने पुढे असेही जोडायला हरकत नव्हती की "किंवा मानवी संस्था अपयशी ठरतात म्हणून." कारण स्वतःपुरते समाधानी असलेले व स्वतःची प्रौढी मिरविणारे राष्ट्र–शासनच युद्धांना जन्म देते. आपण वर पाहिल्याप्रमाणे हेगेलने तर मुळी सांगूनच ठेवले आहे की 'दोन राष्ट्र-शासनांच्या इच्छांचे एकमत झाले नाही तर वादाचा निकाल फक्त युद्धानेच लागू शकतो.' याचे कारण असे की शासनसत्ता, अगदी लोकशाहीचा अवलंब करू पाहणाऱ्या शासनसत्ता देखील ज्यांच्या बाबत तडजोड होणे शक्य नाही अशा निरपवाद हक्कांची किंवा अक्षम्य आगळिकीची भाषा बोलू लागतात व

त्यामुळे शांतपणे चर्चा होणे देखील अशक्य होऊन बसते. एकदा केलेला आत्यंतिक दावा सोडून देणे शक्यच नसते. मुत्सद्यांप्रमाणे नव्हे तर द्वंद्व युद्ध करणारांप्रमाणे विजय किंवा पराभव होईपर्यंत ताणावे लागते. अशा भांडणांची उदाहरणे म्हणून मेक्सिको व स्पेनविरुद्धची अमेरिकेची युद्धे, क्रिमीयन व बोअर युद्धे, किंवा युनायटेड स्टेट्स्मधील प्रचंड यादवी युद्ध अशी किती तरी सांगता येतील. ( फ्रेंच –प्रशियन युद्धाचा यात अंतर्भाव न करण्याचे कारण असे की त्यापैकी एक हेगेलच्या कल्पनेतली शासनसत्ता होती; जिच्या दृष्टीने युद्ध म्हणजे शोकांतिका नसून चांगला गोष्ट आहे. )

परराष्ट्र संबंधात सर्व राष्ट्रे अतिसंवेदनशील व कडक असतात, आणि लोकशाही राष्ट्रे देखील तशीच अगतिक असतात. राज्यकर्ते कितीही शहाणे असोत, कुठल्याच आधुनिक लोकशाही राष्ट्राला विजयानंतर आपले सैन्य नीट ठेवता येत नाही. १९४५ साली इंग्लंड व अमेरिका दोन्ही राष्ट्रे भावुक कल्पनेला बळी पडली, युद्ध जिंकले असल्याने सामर्थ्याची आता गरज नाही असे समजून दोघांनीही आपले सामर्थ्य शीतगृहात ठेवून दिले. त्याग व दुःख हा युद्धक्रीडेचा अपरिहार्य भाग असेल, पण ती क्रीडा आता थांबली आहे. निकाल जाहीर करण्यात आला; विजयी वीरांचे कोडकौतुक करण्यात आले; मग आता घरी का जाऊ नये ? पंतप्रधान, अध्यक्ष किंवा सर्व सेनानी मिळूनदेखील शस्त्रे खाली ठेवणाऱ्या सैनिकांना अडवू शकले नसते, आणि मायदेशातील मतदारांचाही या मूर्खपणाबद्दल तितकाच आग्रह होता. उलट दुसऱ्या बाजूला, रशियन लोकांशी कोणी विचारविनिमय केला नाही, त्यांना फक्त आदेश देण्यात आले ज्यांचे पालन करणे त्यांना भाग होते.

लोकशाही राष्ट्रे घरी लवकर परत जातात, आणि रणांगणावर मात्र हटकून उशीरा जातात. आपल्या शेताला, कारखान्याला, किंवा जीवनपद्धतीलाच धोका निर्माण झाला आहे असे जोपर्यंत लोकांना वाटत नाही तोपर्यंत जीवनमरणाच्या प्रश्नावर देखील कोणीही नेता त्यांना हाकारू शकत नाही. त्यामुळे ते जेव्हा युद्धावर जातात तेव्हा त्यांची तयारी अर्धवट असते. ही स्वातंत्र्याची किंमत आहे, ती टाळणे अशक्य आहे.

## -- ३ --

नवे देश एकामागून एक राष्ट्रवादाच्या पिंजऱ्यात सापडत आहेत. ‘ स्वातंत्र्य ’ म्हणजे साम्राज्यशाही अंमलाचा अभाव असे समीकरण ते मांडतात, आणि आपल्या

शासनसत्तेपासून आपली मूलभूत स्वातंत्र्ये मागण्याचे विसरून जातात. पाश्चात्यांच्या वाईटाचे ते अनुकरण करतात, आणि चांगल्याकडे दुर्लक्ष करतात; ते राष्ट्रवाद अंगीकारतात आणि नागरी स्वातंत्र्यांची उपेक्षा करतात. विचार करण्याच्या, बोलण्याच्या, उपासनेच्या, एकत्र जमण्याच्या व जे योग्य वाटणार नाही त्याविरुद्ध सशस्त्र बंडावा न करता पण सर्व शक्तीनिशी निषेध करण्याच्या आपल्या अंतर्गत हक्कापेक्षा राष्ट्रसंघात आपला नवा ध्वज फडकणे हे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. काही काळानंतर त्यांच्या अनुभवाला येईल की जुन्या मालकांच्यापेक्षा त्यांनी निवडलेल्या नव्या मालकांची ताबेदारी जास्त क्लेशकारक आहे.

आपल्या डोळ्यासमोर ही शोकांतिका घडत असल्याचे पाहताना असे म्हणणे मात्र योग्य ठरणार नाही की ही साधीसुधी माणसे निष्ठुर व कणखर शासनाच्याच लायकीची आहेत. त्यांच्या या अवस्थेला अंशतः आपण जबाबदार आहोत याचे भान आपण ठेवले पाहिजे. आपण त्यांना चुकीचा धर्म शिकवला आहे : ज्याला आपण प्राणापेक्षा प्रिय समजतो त्या स्वातंत्र्याची नव्हे, तर राष्ट्रवाद आणि सार्वभौम शासनसत्ता यांची तनमनधनाने पूजा करण्याचा.

फ्रेंच राज्यक्रांती व हेगेल यांच्या परिभाषेतून मुक्त करून घेऊन जरा समंजसपणे विचार केला तर आपल्या हे सहज लक्षात येईल की शासन-सत्ता या संकल्पनेची व तिची पडछाया असणाऱ्या राष्ट्रवादाची आपल्याला खरोखर काहीच गरज नाही. राष्ट्रवादावरील हल्ला म्हणजे देशभक्तीवर किंवा स्वतःच्या देशावरच हल्ला होय असे आज मानले जाते. पण वस्तुतः स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या व गुलामगिरीला प्रोत्साहन देणाऱ्या अमूर्त कल्पनेवर त्याचा रोख आहे.

राजकीय जगाचे लोकशाहीवादी चित्र रेखाटण्याला आपल्याला दोन संकल्पनांची गरज आहे. पहिली संकल्पना ज्या समाजात माणसाचा जन्म होतो त्या देशाची ( किंवा राष्ट्राची ). आपण या समाजाचे घटक आहोत, परकीय नव्हे, ही भावना समजायला सोपी आणि संगोपण्याला सोयीची आहे. भोवतालची दृश्ये, आवाज, सवयी, अन्न, पेय, समजुती व पूर्वग्रह हे सर्व आपल्या हृदयाच्या अगदी निकटचे आहे असे वाटते. आपल्या समाजातील संस्थांविषयी प्रेम वाटेल किंवा राग येईल, आपल्यासाठी व आपल्या मुलाबाळांसाठी त्यांचे जतन करावे असे वाटेल किंवा त्या मुळापासून बदलाव्यात असेही ( किंवा दोन्ही ) वाटेल. ही संकल्पना म्हणजे घराची कल्पना होय. आणि दुसरी संकल्पना म्हणजे मर्यादित सरकाराची. दुसऱ्या नागरिकांचे संरक्षण करण्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही कारणास्तव नागरिकावर दडपण आणले जाणार नाही, अशा रीतीने व्यक्तीच्या, नम्र नागरिकाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या सामर्थ्याच्या वापरावर आवश्यक ती बंधने घालून घेण्याची सरकारची तयारी असली पाहिजे.

अशा सरकारात ब्रेरर आणि हेगेल, स्टॅलीन आणि हिटलर यांच्या कल्पनेतल्या शासन-सत्तेला स्थान नाही. वस्तुतः स्वातंत्र्याचे संगोपन-संवर्धन करू इच्छिणाऱ्या लोकशाही देशात ' शासनसत्ता ' म्हणून काही चीज अस्तित्वातच असू शकत नाही. राष्ट्रवादाची जागा देशभक्ती घेते. शासनसत्तेच्या दैवी आविष्काराची जागा सरकार घेते. रूझवेल्टने सूचित केलेल्या भीती व गरजेपासून स्वातंत्र्य यांच्या दिशेने आपल्या भोवतालच्या मित्र-राष्ट्रांशी सहकार्य करायला आपल्याला कसलाच प्रत्यवाय नाही— आपल्या जुन्या वाईट सवयी, आपला अप्पलपोटेपणा, तृप्त न होणारी धनाची अभिलाषा, अज्ञान, परदेश व परदेशी लोक यांच्याविषयी संकुचित स्वाभिमानामुळे निर्माण झालेली नावड व तिरस्कार यांचा अपवाद करून. या अडचणी महत्त्वाच्या आहेत, पण त्या यथावकाश दूर करणे शक्य आहे. तसा प्रयत्न करायला निदान कोणाची हरकत किंवा बंधन तरी असत नाही.

ईश्वर आणि दैव यांना विसरून जाऊन घर व सरकार या दोन संकल्पनांना आपण चिकटून राहिलो तर आमचा देश म्हणजे ' ईश्वराची या जगातील वाटचाल ' वगैरे सारखे काही नसून जगायला, कष्ट करायला, व आपल्या मुलांचे संगोपन करायला एक चांगली जागा आहे, तिच्यात सुधारणा करण्याचाही आम्ही प्रयत्न करत असतो, आम्ही त्याचे संरक्षण काय वाटेल ती किंमत देऊन करू हे खरे असले तरी इतरांच्या विरुद्ध कसलेही कपटकारस्थान किंवा पाशवी हल्ला आम्ही करणार नाही असे युक्तिवाद करून आपल्याशी सध्या शत्रुत्व असलेल्या देशांची सुद्धा समजूत घालू शकू.

जाणूनबुजून नाही, पण नकळत दुष्टपणा मात्र आपल्या हातून दररोज घडत असतो, आणि त्याचा रोख गुलामगिरीतून नुकत्याच मुक्त झालेल्या व काहीसे भांबाव-लेल्या लोकांवरच मुख्यतः असतो हे मात्र प्रांजलपणे मान्य केले पाहिजे. राष्ट्र-शासन ही कालबाह्य वस्तु असून आपले सर्व भविष्यच त्याच्या अस्तित्वामुळे नष्ट होण्याची शक्यता आहे हे आपण अतिशय क्लेशकारक अनुभवातून शिकतो आहोत. आणि त्याचवेळी ज्या जाळयातून बाहेर पडायची आपण धडपड करतो आहोत त्यात नव्याने स्वतंत्र झालेल्या लोकांना गुरफटून घ्यायला उत्तेजन देत आहोत. कारण त्यांच्यासमोर ठेवता येईल असा दुसरा कुठला आदर्श वा नमुनाच आपल्याजवळ नाही. राजकीय जीवनासाठी व विविध राजकीय एककांच्या परस्परसंबंधासाठी नवा आधार शोधण्याचा प्रयत्न आपण उशिरा सुरू केला आहे. दरम्यानच्या काळात जी अर्धवट कोसळून पडली आहे अशा जुन्या पद्धतीतच आपण नव्या देशांचे स्वागत करीत आहोत. राष्ट्रहिताच्या नावाखाली आपल्या मुलाबाळांच्या भावी आशा

चिरडून टाकण्याचा उपक्रम ते लवकरच सुरू करतील. शास्त्राच्या प्रगतीमुळे आपली छोटी छोटी एकमेकांचा मत्सर करणारी राष्ट्रे अगदी हास्यास्पद होत याची लोकशाही देशांना पूर्ण जाण येण्यापूर्वीच ही राष्ट्रे स्वतंत्र झाली ही घटना कीव करण्यासारखी आहे.

## -- ४ --

घरसमान देश ही संकल्पना पुरेशी स्पष्ट आहे; पण "पृथ्वीवरील दैवी शक्तीची उपासना" यापासून आणि पर्यायाने निरपवाद सामर्थ्याची उपासना यापासून विभक्त केलेले सरकार या संकल्पनेचा नेमका अर्थ काय ? ग्रीक पद्धतीत सर्व नागरिक विधिमंडळाचे सदस्य ( आणि अधूनमधून न्यायाधीश किंवा ज्यूरी ) असत. त्याचा आधुनिक पर्याय म्हणजे प्रातिनिधिक सरकार किंवा सनदशीर लोकशाही होय. लोकशाही व स्वातंत्र्याविषयी बोलताना ती उदात्त तत्त्वे अपूर्णतया तरी ज्यात साकार झाली आहेत त्या आपल्या भोवतालच्या प्रातिनिधिक सरकारांकडेच पाहात असतो. 'प्रातिनिधिक सरकार' हे व्यवहारात शब्दशः खरे असते असे समजू नका असा इषारा वॉल्टर लिपमनने आपल्याला दिला आहे. त्याने म्हटले आहे, " सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार दिला व त्यांना खरे प्रतिनिधित्व देखील उपलब्ध करून दिले तरी तेवढ्याने ' स्वराज्या'ची स्थापना झाली असे म्हणता येणार नाही. सार्वभौम पण असमर्थ लोकांवर साम, दाम, दंड, भेद या मार्गांनी सत्ता गाजवणारी अशी स्वतःला चिरंतनकाळपर्यंत सत्तेत स्थिर ठेवू पाहणारी मूठभर लोकांची दंडेलशाही व नियंत्रणापलीकडे गेलेली नोकरशाही यांची जोडगोळी या नव्या स्वरूपातील निरपवाद शासनसत्तेची स्थापना, प्रौढ मतदान व तथाकथित प्रातिनिधिक सरकार या मार्गांनी होऊ शकते, व तसे बहुतेक देशात झाले आहे. "

दुसऱ्या एका ठिकाणी त्याने म्हटले आहे, " सार्वभौम जनतेचे घटक या अर्थाने माणसे सर्वसामान्यपणे परिपूर्ण माहिती करून घेणारी, देशाच्या कामकाजात सतत रस घेणारी, निःपक्षपाती, सर्जनशील व कर्तृत्ववान अशी असणार नाहीत हे लोकनियुक्त सरकारचे तात्त्विकदृष्ट्या पक्के असलेले गृहीतकृत्य होय असे मानायला हरकत नाही. " हा निराशावाद डेव्हिड ह्यूमच्यापेक्षा जरा नेमस्तच म्हणावा लागेल; कारण ह्यूमच्या मते, " सरकारची कुठलीही पद्धती ठरविताना व राज्यघटनेत अनेकविध बंधने व नियंत्रणे घालून ठेवताना सर्वसामान्य माणूस हा भोळा किंवा मूर्ख

आहे असे गृहीतच धरले पाहिजे असा राजकीय लेखकांनी सिद्धान्तच मांडलेला आहे." लोकशाहीचा पुरस्कर्ता नायक असलेला जेफरसन देखील म्हणाला, "आत्मविश्वासावर नव्हे तर मत्सरावरच स्वतंत्र सरकारची आखणी केली जाते."

चुका करण्याच्या माणसाच्या स्वभावापासून राज्यघटना व कार्यपद्धति-संकेत यांनी आपले कितपत संरक्षण होते हे पाहण्यापूर्वी प्रातिनिधिक सरकार म्हणजे काय हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. त्यामागची कल्पना सोपी आहे : माणसे लोकसंख्येने खूप व दूरवर विखुरलेली असल्याने सरकारचे ठाणे असलेल्या स्थानी त्यांना दस्तुर खुद्द हजर राहता येत नाही, म्हणून त्यांनी निवडलेल्या अधिकाऱ्यांमार्फत हजेरी लावायची. 'लोक' या सोयीस्कर अमूर्त कल्पनेच्या दृष्टीने हे उपयुक्त होय. पण प्रत्येक व्यक्तीला तिथे खरोखर प्रतिनिधित्व मिळते काय ? ज्याच्याशी तिचे पूर्ण एकमत आहे व ज्याला तिने निवडले आहे असा उमेदवार तिथे असतो काय ? तो सगळा पद्धतीचा अंगभूत भाग होय; त्याचे प्रतिनिधित्व केले जाते असे गृहीत धरले जाते, आणि सनदशीर पद्धती चालविण्यासाठी हे गृहीतकृत्य म्हणजे अगदीच मामुली किंमत होय. विन्स्टन चर्चिलच्या शब्दात "लोकशाहीच्या स्वातंत्र्याच्या परिस्थितीत राहणाऱ्या महान् जनतेच्या सामाजिक आयुष्यात प्रतिनिधित्वाची ही पोरकट कल्पना (हंबग) इतकी महत्त्वपूर्ण व निःसंशयपणे साह्यकारी भूमिका पार पाडते की त्यासाठी आपण तिचे आभार मानायला हवेत."

ऐतिहासिकदृष्ट्या, स्वतंत्र सरकारच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल त्याचवेळी पडते ज्यावेळी सार्वजनिक खर्चावरील नियंत्रण लोकांच्या प्रतिनिधींच्या हातात येते. त्यानंतर ज्या कामासाठी पैशाची तरतूद केली जाईल तेवढीच कामे कार्यकारी मंडळाला (मग तो राजा असो, पंतप्रधान असो की अध्यक्ष असो) करता येतात, त्याच्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेवाव्या लागतात. तत्त्वतः, कार्यकारी मंडळ लोकांना आवडेनासे झाले किंवा हट्टी बनले तर त्याची पैशाच्या बाबतीत उपासमार करणे शक्य आहे. 'दि फेडरॅलिस्ट' यात हा सिद्धांत रेखीवपणे मांडला आहे, "पैशावरील हे नियंत्रण म्हणजे प्रत्येक गाऱ्हाण्याची दाद लावून घेण्यासाठी व कुठलीच न्याय्य आणि चांगली गोष्ट करवून घेण्यासाठी लोकांच्या निकटच्या प्रतिनिधींच्या हाती राज्यघटनेने सोपवलेले एक अमोघ शस्त्र होय."

कालान्तराने याही सिद्धांताचे व्यवहारात खोबरे झाले आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये बहुमतवाल्या पक्षाच्या पार्लमेंट–सदस्यांना जे अंदाजपत्रक मांडले जाईल ते निमूटपणे मान्य करावे लागते. आम्ही केवळ रबर स्टॅंप व्हायला तयार नाही असे त्यांनी कितीही म्हटले तरी प्रत्यक्षात त्यांना तेच करावे लागते. युनायटेड स्टेट्स्‌मध्ये

कॉंग्रेसच्या कारभारात पक्षशिस्त लावली जात नाही, आणि प्रमुख कार्यकारी अधिकारी (म्हणजे अध्यक्ष) हा निश्चित कालावधीसाठी निवडलेला असतो, त्यामुळे अध्यक्षाच्या आशा व योजना उधळल्या जातील इतक्या प्रमाणात, अंदाजपत्रकात विधिमंडळसदस्य काटछाट करू शकतात; पण पर्याय मात्र सुचविला जात नाही. मधून मधून असे गोंधळ-वजा खटके उडाले म्हणजे गाऱ्हाण्यांची दाद लागली किंवा 'न्याय्य आणि महत्त्वपूर्ण उपक्रम अमलात आणण्यात आले' असे मानणे कठीण वाटते. तरीसुद्धा या दोन्ही देशात सार्वजनिक खर्चावर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण बरेच आहे हे खरे, आणि त्याचे कारण म्हणजे तेथील विरोधी पक्ष.

ग्रेट ब्रिटनमध्ये लोकांना अप्रिय झालेले सरकार लवकरच कोसळून विरोधी पक्ष ती जागा घेऊ शकतो. युनायटेड स्टेट्स्‌मध्येही अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी असे होऊ शकते. मग 'गाऱ्हाण्यांची दाद लागते' आणि (देशाचे नशीब जोरावर असले तर) 'न्याय्य व प्रभावशाली उपक्रम' हाती घेतले जातात. इंग्रजी–भाषिक जगतात प्रातिनिधिक सरकार चालू शकते याचे कारण तेथील विरोधी पक्ष – एक सुसंघ-टित गट, जो पदच्युत सत्ताधाऱ्यांची जागा घेऊन सार्वजनिक व्यवहार सुरळीतपणे चालवू शकतो. त्याशिवाय आपला असंतोष प्रगट करायचा आणि 'या गाढवांना हाकलून द्यायला' दुसरा मार्ग कोणता? मात्र स्वतंत्र राजकीय अस्तित्वासाठी (म्हणजे स्वातंत्र्याचे वातावरण राजकीयदृष्ट्या टिकविण्यासाठी) विरोधी पक्षावर अवलंबून राहणे भागच आहे असे मात्र नाही असा स्वित्झर्लंडचा अनुभव आहे. म्हणून आपले हे गुंतागुंतीचे व नाजूक साधन आशियाई व आफ्रिकन देशांना समजले नाही किंवा पटले नाही तर लगेच त्यांच्याकडे तिरस्काराच्या नजरेने पाहण्याचे कारण नाही. सत्तेच्या उद्धटपणाला अंकुश लावण्यासाठी ते दुसरा काही मार्ग शोधून काढू शकतील.

आपल्यासाठी मात्र सरकारला बडतर्फ करण्याचा अधिकार असल्याशिवाय सरकार निवडण्याच्या अधिकाराला काही अर्थ राहात नाही; आणि त्यासाठी एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष संघटित करण्याचा हक्क असणेही आवश्यक आहे. हा वरवर उपद्रवी वाटणारा 'हक्क' आज अर्ध्या अधिक मानवजातीला नाकारला जात आहे. या नकाराचे कम्युनिस्टांकडून होणारे समर्थन असे की राजकीय पक्ष हे वर्गहितांचे प्रतिनिधित्व करीत असतात, आणि कम्युनिस्ट राज्यात एकच वर्ग असल्याने तेथे एक पक्ष पुरेसा आहे. हे खरे असते तर कम्युनिस्ट राज्यात दुसरा पक्ष संघटित करण्याची ऊर्मीच कोणाला झाली नसती. कम्युनिस्टांच्या दृष्टीने 'अनैसर्गिक' असणाऱ्या या ऊर्मीवर व जो अधिकार गाजवावासा कुणाला वाटणारच नाही त्याच्यावर अतिशय

कडक बंधने कम्युनिस्ट देशात घालण्यात आली आहेत. तेव्हा एकंदरीने असे म्हणायला हरकत नाही की जेथे पर्यायी पक्ष नाही त्या समाजात जुलूमशाही आहे. (स्वित्झर्लंडमध्ये आपल्यासारखे विरोधी पक्ष नसले तरी तेथेही संघटित विरोध आहे. – तिसऱ्या प्रकरणात याचे अधिक विवेचन येईल. )

ब्रिटनमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्याला ' लीडर ऑफ हर मॅजेस्टीज् लॉयल अपोजिशन ' म्हणजे राणीच्या सरकारच्या निष्ठावंत विरोधाचा नेता असे म्हटले जाते. हा शब्दप्रयोग कम्युनिस्टांना हास्यास्पद व काही नव्या राष्ट्रांच्या नेत्यांना दांभिक वाटतो. एक माणूस ब्रिटिश राज्यपद्धतीला म्हणजेच पर्यायाने राणीला अतिशय एकनिष्ठ राहू शकतो आणि त्यावेळी सरकारच्या त्याचवेळच्या नेत्यांच्या धोरणांना व कार्यक्रमाला त्याचा तितकाच जाज्वल्य विरोध असू शकतो हे त्यांना समाजशक्तीच्या पलीकडचे वाटते. आफ्रिकनांना ही कल्पना गूढ वाटते आणि कम्युनिस्टांना तिचा संताप येतो याचे आपल्याला आश्चर्य वाटू नये. कारण ही कल्पनाच गुंतागुंतीची आहे. ती तुलनेने बरीच नवी आहे हेही युनायटेडस्टेट्स्चा इतिहास पाहिला म्हणजे आपल्या लक्षात येईल.

ब्रिटिश राजकारणातील तिखट वादावादीमुळे चिडलेल्या अमेरिकन राज्यघटनेच्या शिल्पकारांनी राजकीयपक्ष म्हणजे कारस्थानी मंडळींची टोळकी होत असे मानून आपल्या देशात त्यांची काही गरज नाही असे ठरविले. आपल्या निरोपाच्या भाषणात वॉशिंग्टननेही या दृष्टिकोनाला पाठिंबा दर्शविला आहे. " राज्यात पक्ष असण्याने निर्माण होणाऱ्या धोक्यांची कल्पना मी तुम्हाला दिलीच आहे. अधिक व्यापक दृष्टीने विचार करता पक्ष व पक्षाभिमानामुळे निर्माण होणाऱ्या अनिष्ट परिणामांबाबतही मी तुम्हाला इषारा देऊ इच्छितो. सार्वजनिक विचारविनिमयाची मंडळे व कारभारयंत्रणा यांच्यावरून लक्ष विचलित होण्याला ते कारणीभूत होतात. निरर्थक हेवेदावे व खोटे इषारे यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण होते; एक बाजू दुसऱ्याची शत्रू बनते; क्वचित बंडाळी किंवा सशस्त्र उठाव होण्याचाही धोका असतो. " हा शेवटचा शब्दप्रयोग महत्त्वाचा आहे, कारण पक्षाभिनिवेश व देशद्रोह यांच्यातील फरक लक्षात न आल्याने अमेरिकेत बरेच गोंधळ उडाले.

हे सांगायची गरज नाही की अमेरिकेत घटनास्वीकृतीनंतर लगेच पक्ष निर्माण झाले. एका सरकारची उचलबांगडी करून त्या जागी दुसऱ्याची स्थापना करण्याची शक्यता असल्याशिवाय सरकार निवडण्याच्या स्वातंत्र्याला काही अर्थच राहात नाही. पक्षांबरोबर पक्षीय वृत्तपत्रेही आलीच. एके काळी वसाहती असलेल्या या नव्या राष्ट्राच्या राजकारणात मायदेशातल्या इतकाच कडवटपणा आला. १७९८ साली

सेडिशन ॲक्ट पास करण्यात आला; 'सरकारच्या सभासदांची अपप्रसिद्धी करणे व त्यांच्याविषयी तिरस्कार निर्माण करणे ' या आरोपावरून अनेक विरोधी संपादकांना दंड किंवा तुरुंगवासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. त्या कायद्यावरून पुढे खूप रण माजले व शेवटी तो अडगळीत पडला; पण प्रथम तो मंजूर होऊ शकला याचे कारण असे की राज्यकारभार करणाऱ्यांची ' अपप्रसिद्धी ' करीत असता म्हणजे त्यांचे दोष जाहीरपणे दाखवून देत असतानासुद्धा विरोधी मंडळी देशाशी एकनिष्ठच असतात हे सत्ताधारी पक्षाला समजू शकले नाही.

जॉन स्ट्रॅचीने एका ठिकाणी म्हटले आहे, " आफ्रिकेच्या बऱ्याच भाषांत ' विरोधीपक्षाचा नेता' याचे भाषांतर करायला ' मुख्य शत्रु ' याशिवाय दुसरा शब्द-प्रयोगच उपलब्ध नाही ! " पण सुदैवाने अमेरिकन लोक या विकृतीपासून वेळीच सावध झाले आणि विरोधी पक्षाच्या प्रवक्त्यांना तुरुंगात टाकण्याचे त्यांनी बंद केले.

## – ५ –

स्वातंत्र्याचा प्रश्न मुख्यतः संस्थात्मक आहे : सरकारचे सामर्थ्य खच्ची न करता त्याला माणसाळावयाचे कसे ? लोकांचे संरक्षण व त्यांच्या कल्याणाचे संवर्धन करण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार सरकारला असले पाहिजेत, पण त्याचा वापर मात्र परवानगीशिवाय होता कामा नये. हा दुहेरी हेतु साध्य करू शकेल असे प्रातिनिधिक सरकार ही एकमेव व मोक्याची संस्था आहे.

पार्लमेंट, कॉंग्रेस, लोकसभा किंवा विधानसभा यांच्या निवडणुका कशा होतात हा तितका महत्त्वाचा प्रश्न नाही. यथार्थ प्रतिनिधित्व आणि चोख हिशोब व जबाबदार, खुलासेवार स्पष्टीकरणे या अर्थाने विश्वस्तमंडळ असे स्वरूप तिला प्राप्त झाले नाही तर केवळ प्रौढ मतदानाच्या आधारावर निवडणुका झाल्या एवढ्याने त्या संस्थांना खरे प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त होणार नाही. असे स्वरूप प्राप्त होण्याच्या किमान दोन शर्ती आहेत. ज्या व्यक्तींनी आपले प्रतिनिधित्व करावे असे मनापासून वाटत असेल अशांना निवडून देण्याचे पूर्ण स्वातंत्र्य प्रत्येक पक्षातल्या मतदारांना असले पाहिजे. याला काही मर्यादा पडतात. पण तरी मर्यादा सांभाळून त्यातल्या त्यात चांगला उमेदवार निवडून देण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. इंग्लंडमध्ये देशातल्या कुठल्याही नागरिकाला कुठल्याही मतदार संघातून निवडणूक लढविता येते, तर युनायटेड स्टेट्स्मध्ये उमेदवार त्या जिल्ह्यातला किंवा त्या संस्थानातला असला पाहिजे अशी बंधने आहेत. दुसरी अट अशी की सरकारच्या सर्व कार-

भारावर देखरेख करण्याचा त्या विधिमंडळाला पूर्ण अधिकार असला पाहिजे. याचा अर्थ असा की काही ज़ादा ( परमिसिव्ह ) अधिकार कार्यकारी मंडळाला दिले गेले ( असे अधिकार ज्यांच्यावर विधिमंडळाचे तात्कालिक किंवा ताबडतोबीचे नियंत्रण असणार नाही ) तर ते खरोखरच आणीबाणीच्या स्थितीत आणि शक्य तितक्या कमी–कालावधीसाठी दिले जावेत.

आदर्शतः विचार करता आणखी एक अट असली पाहिजे. इंग्लंडमध्ये आहे त्याप्रमाणे सरकार विधिमंडळाच्या नेहमी समोर असले पाहिजे. थोड्या वेगळ्या स्वरूपात अशी तरतूद अमेरिकन प्रजासत्ताकाच्या संस्थापकांनी केली होती. काँग्रेससमोर जाऊन आपल्या धोरण–कार्यक्रमांचे समर्थन करण्याचे स्वातंत्र्य कार्यकारी खात्यांच्या प्रमुखांना राज्यघटनेने दिले होते. अल्पकालीन प्रयोगानंतर काँग्रेसने खाते-प्रमुखांना सभागृहात प्रवेश द्यायचे बंद केले. तेव्हापासून सत्तेचे विलगीकरण नको इतके पूर्ण झाले. तरी अमेरिकन सरकारचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो आहे. म्हणून ही तिसरी अट अगदी अपरिहार्य नाही.[१]

प्रातिनिधिक सरकारच्या अंगभूत धोक्यांची चर्चा करण्यापूर्वी स्वातंत्र्य हे राजकीय संस्थांवर अवलंबून असते या आपल्या गृहीतकृत्याचा तात्त्विक पाया नीट स्पष्ट केला पाहिजे. मार्क्सचा त्याच्याशी मतभेद असेल. ( या पुस्तकात मार्क्सचा उल्लेख त्याच्या लिखाणातूत व्यक्त होणाऱ्या थोर मानवतावादी, स्खलनशील अर्थशास्त्रज्ञ आणि इतिहास व भविष्यकथन यांची भलतीच गल्लत करणारा इतिहासज्ञ–अशा मार्क्स या व्यक्तीला संबंधित आहे. आज आपल्याला दिसणाऱ्या कम्युनिस्ट देशातील सर्व व्यवहाराबद्दल या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीला जबाबदार धरण्याचे कारण नाही.)

स्वतंत्र जगताचा मार्क्सशी जो मतभेद आहे त्याची मार्क्सवादाशी द्रोह करणाऱ्या रशियन किंवा चिनी किंवा इतर समाजांशी गल्लत करण्याचे कारण नाही. त्याचा संबंध फक्त इतिहास व सत्ता यांच्या सिद्धान्ताशी आहे. मार्क्सचा असा विश्वास होता की त्याने इतिहास व अर्थशास्त्र यांच्या अशा एका शास्त्राची रचना केली ज्याच्या आधारे भविष्याचे दर्शनही घेणे शक्य आहे. जे आधी सांगता येते ते भविष्य अटळही असलेच पाहिजे. उलट घटना, घडामोडी व परिस्थिती यांच्यात बदल करता येत नसेल तर राजकारणाला काही अर्थच नाही. राजकीय कृतीमुळे आपण अटळ

१. जुन्या राज्यघटनेचा सत्तर वर्षे अनुभव घेतल्यानंतर यादवीयुद्ध पुकारणाऱ्या संस्थानांनी आपल्या कॉन्फेडरेटेड स्टेट्स्च्या राज्यघटनेत अशी तरतूद केली होती की खातेप्रमुखांनी काँग्रेसमध्ये येऊन बसायला व त्यांच्या कामाशी संबंधित असलेल्या चर्चेत भाग घ्यायला परवानगी असावी असा कायदा करता यावा.

ग्रंथालय ठाणे १५९८४

घटनांचा कालावधी संकुचित करू शकतो इतकें मार्क्सने मान्य केले आहे, पण आपण काहीही केले तरी त्या घटना घडणारच, आणि त्यांचे स्वरूप मार्क्सने आधी वर्णन करून ठेवल्याप्रमाणेच असेल.

आर्थिक वर्गांचे परस्पर संबंध व उत्पादनाच्या भौक्तिक साधनांचा विकास यांच्या साहाय्याने मार्क्सने भविष्याचा शोध घेतला. औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीच्या काळातील भयानक प्रकार (इंग्लंडमध्ये घडलेल्या अशा प्रकारांचा मार्क्सने कडकडून निषेध केला, पण रशिया व चीनमध्ये कम्युनिस्ट उद्योगीकरणाच्या प्रक्रियेत त्याही-पेक्षा अधिक भयानक प्रकार घडले ) केवळ राजकारणाने टाळता किंवा थांबविता येणार नाहीत; इतिहासाच्या पुढील अटळ अवस्थेनेच (ज्याच्यातून वर्गविहीन समाज निर्माण होईल) त्या प्रकारांवर विजय मिळविला पाहिजे असे मार्क्सचे मत होते.

ज्यांना कळाहीन भविष्यात नव्हे तर आज या घडीला स्वातंत्र्याची सेवा करायची आहे त्यांच्या दृष्टीने हे अगदी अंतिम स्वरूपाचे पाखंड होय. राजकीय सामर्थ्य हे आर्थिक सामर्थ्य किंवा यंत्रांचे तुकडे यांच्यापुढे अगतिक तर नाहीच, पण न्याय व स्वातंत्र्य यांच्या स्थापनासंवर्धनाचा तोच निर्णायक मार्ग होय असा आपला विश्वास आहे.

मार्क्सने त्याच्या काळातील लोकशाहीला ‘केवळ औपचारिक स्वातंत्र्य’ म्हणून तुच्छ लेखले. त्याने फार अतिशयोक्ती केली असेही म्हणता येणार नाही. त्याच्या दास कॅपिटेल या ग्रंथाचा पहिला खंड हॅंबुर्ग येथे १८६७ साली प्रसिद्ध झाला. दुसरे रिफॉर्म बिल त्याच वर्षी पास झाले. त्या कायद्याने जे स्वतःच्या घरात राहतात व म्युनिसिपल कर भरतात अशांना मतदानाचा हक्क देण्यात आला. त्यामुळे फक्त १३,५३,००० मतदारांची भर पडली ! लॉर्ड क्रॅन् बोर्न ( नंतर लॉर्ड सॅलिसुबरी या नावाने प्रसिद्धी पावलेला ) याने ‘अतिशय धोकाजनक प्रयोग’ म्हणून त्या कायद्याचे वर्णन केले होते. त्याच्या निषेधार्थ तो व त्याचे दोन साथीदार यांनी मंत्रिपदाचे राजीनामे दिले. याच काळात युनायटेड स्टेट्स् मध्ये अनिर्बंध स्वैराचार व दरोडेखोर-सरदारांचे दिवस सुरू झाले होते आणि यादवी युद्ध पुकारणाऱ्या दक्षिणेकडील नागरि-कांना मानवी व्यक्ती समजून वागविण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून प्रेसिडेंट अँड्र्यू जॉनसन याच्यावर खटला भरण्याचा कॉंग्रेस प्रयत्न करीत होती. जॉन्सनवरील या आरोपांचे वर्णन दोन सुप्रसिद्ध इतिहासकारांनी ‘आपल्या संघराज्यीय सरकारच्या इतिहासाला काळिमा फासणारे प्रकरण’ असे केले आहे. ब्रिटिश म्युझिअममध्ये बसून मार्क्स आपला ग्रंथ लिहीत होता त्यावेळी लोकशाहीची वर्तणूक चांगली नव्हती हे तर खरेच.

भविष्य बिनचूकपणे पाहण्याचा मार्क्सने दावा केला, पण सरकारच्या प्रदीर्घ व वादळी इतिहासातील महत्त्वाची घटना तो पाहू शकला नाही. त्याच्या काळात प्रातिनिधिक सरकार केवळ पुस्तकात नव्हे तर प्रत्यक्षातदेखील अस्तित्वात आले होते. त्याच्या काळात इंग्लंडमध्ये मतदानाचा अधिकार विस्तार केला जात होता आणि अमेरिकेत तर ते मोठ्या प्रमाणावर साध्य झाले होते. द्रष्टेपणाच्या मनोवस्थेत त्याने असे दृश्य पाहिले असते की एक दिवस असा उजाडेल की ज्या दिवशी प्रत्येक स्त्री पुरुषाला मतदानाचा अधिकार असेल, प्रातिनिधिक सरकारचा इतका विकास झालेला असेल की ते बऱ्यापैकी कार्यक्षम रीतीने आपले कामकाज करू शकेल– तर तो महान् लोकशाहीवादी झाला असता ! [१] आणि आपली खडखडणारी पद्धती अधिक चांगल्या रीतीने कशी चालवावी याविषयी त्याने आपल्याला बहुमोल मार्गदर्शन केले असते. ‘ इतरांचे स्वार्थी हेतु व त्यामुळे निर्माण झालेल्या बाह्य अडचणी यामुळे जीवनात येणारी व्यर्थता ’ दूर करून ‘ स्वातंत्र्याच्या राज्यात ’ माणसाला आपला काळ सुखाने कंठता यावा यासाठी ‘ गरजेच्या साम्राज्यातून ’ त्याची सुटका करावी हाच मार्क्सचा प्रधान हेतु होता.

आपल्या काळात मार्क्सने इतका वाईट अनुभव घेतला की उत्पाती बदलांशिवाय आर्थिक सुधारणा होण्याची त्याला बहुधा काहीच आशा वाटत नसावी. कदाचित् त्याला दम निघाला नसेल, आणि म्हणून स्वातंत्र्याच्या सावकाशीने पसरत जाणाऱ्या संस्थांवर विसंबण्याऐवजी दलितासमोर भविष्याचे एकदम गुलाबी चित्र रेखाटण्याची त्याला घाई झाली असावी. राजकीय कृतीपासून पळून जाऊन ‘ शास्त्रीयदृष्ट्या ’ निश्चित वाटणाऱ्या भविष्यकालीन नंदनवनाचे दिवास्वप्न पाहण्यातच त्याच्या मनाला सांत्वन लाभले असेल. काही असो, आपण ( लोकशाहीवादी ) त्याला आचवलो, आणि आपले फार मोठे नुकसान झाले.

सत्तेचा गैरवापर व वर्गहितांचे संघर्ष आणि सतत बदलत जाणारी उत्पादनाची भौतिक साधने यांचा वरचष्मा होऊन राजकारण त्यांच्या भक्ष्यस्थानी पडेल असे मार्क्सला वाटले होते, पण त्याने प्रस्थापित समाजरचनेच्या संरक्षणासाठी वापरली जाणारी एक सबब ‘ औपचारिक स्वातंत्र्य’ म्हणून अवहेलना केलेले स्वातंत्र्यच या सर्व प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी उपयुक्त साधन म्हणून सिद्ध झाले आहे. पण त्या साधनाचा तसा विकास झाल्यानंतर आता आपल्यावर ही जबाबदारी येऊन पडली आहे

---

१. त्याने एवढे मात्र लिहून ठेवले आहे, “ . . . . . मी मार्क्सिस्ट नाही एवढे मला चांगले माहीत आहे. ” सिलेक्टेड कॉरस्पॉन्डन्स ऑफ मार्क्स अँड एंजल्स, १८४६–९५, लंडन, १९३४.

की स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीच ते वापरले जाते की नाही याची डोळ्यात तेल घालून देखरेख ठेवली पाहिजे. वाईट माणसांच्या हातात ते गेले तर आपण एका रात्रीत गुलाम बनविले जाऊ. प्रोफेसर सर कार्ल पॉपर यांनी म्हटले आहे, "अशा गोष्टींचा आपण मार्क्सपेक्षा देखील अधिक भौतिक दृष्टीने विचार केला पाहिजे. भौतिक सत्ता व भौतिक शोषण यांचे नियंत्रण हीच राजकारणातील मध्यवर्ती समस्या होय याचे भान आपल्याला झाले पाहिजे. तसे नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी आपण प्रथम 'औपचारिक स्वातंत्र्य' हस्तगत केले पाहिजे. ते एकदा साध्य केले व राजकीय सत्तेचे नियंत्रण करण्यासाठी ते साधन कसे वापरायचे हे एकदा शिकून घेतले म्हणजे मग सर्व काही आपल्यावरच अवलंबून राहते. दुसऱ्या कोणाला मग दोषी धरता येणार नाही की पडद्याआडून सूत्रे हलविणाऱ्या आर्थिक सैतानांच्या नावाने बोटे मोडता येणार नाहीत. कारण लोकशाहीत या सैतानांना कसे वेठीला धरायचे याची गुरुकिल्ली आपल्याच हातात असते. आपण त्यांना माणसाळवू शकतो. हे आपण ओळखले पाहिजे आणि गुरुकिल्लीचा वापर केला पाहिजे. आर्थिक सत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व आर्थिक शोषणापासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त लोकशाही संस्थांची उभारणी आपण केली पाहिजे" हे सर्व कागदावर ठीक आहे. मार्क्सच्या मते ते व्यवहारात साधणे अशक्य आहे. खरेच तसे आहे का? इथे आपण लोकशाहीतल्या एका दोषापाशी येऊन पोहोचतो. तो म्हणजे माणसाची उदासीनता किंवा आळशीपणा. स्वातंत्र्य वापरणे तसे जिकीरीचे काम आहे, जुलूमशाही हा त्यातून बाहेर पडण्याचा सोपा मार्ग होय.

मतदानाचा अधिकार यातही काही उणीवा आहेतच, आणि त्यांचे मूळ मानवी स्वभावात असल्याने त्या दूर करणे कठीण असते. समतोल, निर्लेप शहाणपणा वापरून मतदान करणे आपल्याला जमत नाही. वैयक्तिक किंवा वर्गीय हितसंबंध, मित्र किंवा वरिष्ठ यांचा प्रभाव, ज्यांची जाणीव नसते व त्यामुळे जे दूर करणे जमत नाही असे पूर्वग्रह यांचा आपल्या मतदानावर परिणाम होत असतो. अशा स्थितीत कोट्यावधि मतातील वाईट व स्वार्थी प्रवृत्तींचा परस्परांना छेद जाऊन केवळ चांगला भाग, ज्याला आपण 'लोकांचा आवाज' म्हणतो, तेवढाच शिल्लक राहील असे आपण गृहीत धरू शकतो का? तसेच माणसाच्या बाबतीत संभवणाऱ्या सर्व उणीवा व अवनत प्रवृत्ति या आपल्या प्रातिनिधिक संस्थात प्रतिबिंबित होण्याची शक्यता आहे; माणसातील सामान्य चोथेपण (ग्रॉस मिडिऑक्रिटी) प्रतिबिंबित होण्याची तर खात्रीच आहे. आपण आपल्यावरील जबाबदाऱ्या चोखपणे क्वचितच पार पाडत असताना या संस्थांनी मात्र माणसाच्या सर्वसाधारण साध्यशक्तीच्या वर पोहोचावे अशी आपली अपेक्षा असते. लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी कुठले देवदूत पालक बनून येतात? आणि किती काळपर्यंत?

आजपावेतो तरी आपला नाही, मार्क्सचाच अंदाज चुकला आहे. मार्क्सने १८६७ साली तिरस्काराने टाकाऊ म्हणून ठरविलेल्या जगताशी आपण आपल्या आजच्या स्वातंत्र्याची व लोकशाहीची तुलना केली तर हा विरोध अगदी उठून दिसतो. खुल्या व्यापारा- ( लायसे फेअर )बरोबर मार्क्सची भांडवलशाहीही मृत झाली आहे. भूतकाळात स्वप्नातसुद्धा कल्पना केली नसेल इतक्या चांगल्या रीतीने अधिकाधिक माणसे ' स्वातंत्र्याच्या राज्यात ' आपला काळ कंठतात अशी स्थिती निर्माण करणारी, कमी वेळा अयशस्वी होणारी आणि बहुतेक वेळी कामयाब ठरणारी, प्रभावशाली राजकीय नियंत्रणाखाली राहणारी संमिश्र व नियमित अशी अर्थव्यवस्था आपण कशी का होईना पण उभारू शकलो. मार्क्सने टाकाऊ ठरविलेल्या पद्धतीत आपण तुकड्या-तुकड्यांनी व आधी योजना न करता इतकी सुधारणा करू शकतो की आज अनेक तथाकथित ' मार्क्सवादी ' देशांना आपला हेवा वाटू लागला आहे. त्यांच्या आविष्कृत धर्माचे आपण अनुकरण करण्याऐवजी आपल्या वास्तववादी व्यावहारिक प्रयोगांचे तेच अनुकरण करू लागतील अशी शक्यता अधिक आहे.

आपण या आशावादात मश्गुल व्हायला हरकत नव्हती; पण राष्ट्रवाद (अणु ) बॉंब, व स्वातंत्र्याचे ओझे वाहण्याची आपली कुवत यामुळे जरा अडचण निर्माण झाली आहे.

प्रथम राष्ट्रवादाचा विचार करू. सहा वर्ष चाललेल्या युद्धात जे लोक प्राणाला मुकले त्यांच्या ऋणाची जाणीव असल्याने १९४५ साली जे समतोल समंजसपणाचे वातावरण होते ते परत एक दिवस निर्माण होईल अशी आपण आशा करू या. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामर्थ्याला शेषाधिकारांचे ( व्हेटो ) बंधन पडू नये म्हणून आपल्या देशाच्या सार्वभौमत्वावर मर्यादा घालून घ्यायची तयारी १९४५ साली डॉ. टी. व्ही. सुंग ( जे दुर्दैवाने अस्ताला जाणाऱ्या राजवटीच्या वतीने बोलत होते ) या चिनी मुत्सद्याने दाखवली होती. ( त्यावेळेचे इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री ) अँथनी ईडन हाऊस ऑफ कॉमन्समध्ये म्हणाले होते, "प्रत्येक नव्या शास्त्रीय शोधामुळे सार्वभौमत्वाची जुनी कल्पना अधिकाधिक निरर्थक ठरत आहे." न्यूयॉर्कच्या एका वृत्तपत्रात लिहिताना मायकेल फूटने प्रतिपादिले होते की "सार्वभौमत्वाचा जाणीवपूर्वक राजीनामा देण्याची वेळ आलेली आहे." राबर्ट ओपेनहीमरनी म्हटले होते, "अण्वस्त्रे हे सर्व जगाची समान शत्रू होत, त्याचा बंदोबस्त करण्यासाठी एकतर्फी प्रयत्न पुरेसे ठरणार नाहीत, सर्वांच्या सामुदायिक प्रयत्नांनीच ते शक्य होईल, या सामुदायिक जबाब-दारीची जाणीव करून घेणे ही आजची निकडीची व्यावहारिक गरज आहे." युनाय-टेड स्टेट्सच्या अध्यक्षपदासाठीचे कायमचे उमेदवार हॅरॉल्ड स्टॅसेन यानी ॲकॅडेमी

ऑफ पोलिटिकल सायन्स या विद्वत्संस्थेपुढे भाषण करताना सांगितले की "अणु-बॉंबच्या निर्मितीपूर्वीच जागतिक सरकारची गरज निर्माण झाली होती. आता तर ती एक अपरिहार्य बाब बनली आहे." सॅटर्डे रिव्ह्यू या नियतकालिकाने न्यूयॉर्कमध्ये घोषणा केली की "त्याने ( माणसाने ) एक रोकडे सत्य मान्य केले पाहिजे की अणु-युगात जर कुठली एक गोष्ट सर्वात जास्त कालबाह्य झाली असेल तर ती म्हणजे राष्ट्रीय सार्वभौमत्व ही होय." हे सर्व शब्द आज कुठे आहेत ? 'विचाराच्या किंवा प्रार्थनेच्या कक्षेपासून अनंत योजने दूर.' राष्ट्रवाद की मृत्यू यापैकी काय टाळायचे यातून निवड करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे सत्य एकदा स्पष्टपणे आपल्याला समजले होते, पण वीस वर्षात आपण त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करायला शिकलो आहोत.

दुसरी गोष्ट म्हणजे अणुबॉंब. याबाबत आशावादी राहण्याला काही जागा असली तर विन्स्टन चर्चिल यांचेच शब्द पुन्हा उच्चारलेले बरे, "उदात्त विरोधाभासाच्या प्रक्रियेतून आपण आज अशा अवस्थेला येऊन पोहोचलो आहोत की सुरक्षितता हे भयानक भीतीचे अपत्य झाले आहे आणि जिवंत राहणे हे सर्वनाशाचे जुळे भावंड बनले आहे."

तिसरा प्रश्न असा की स्वातंत्र्याचे ओझे वाहण्यासाठी आपल्या अंगी पुरेशी ताकत आहे का ? याबाबत कसलेच भविष्य वर्तवणे शक्य नाही. ओझे हलके नाही: "आपणास दुसऱ्या कोणाला दोषी धरता येणार नाही की पडद्याआडून सूत्रे हालविणाऱ्या आर्थिक सैतानांच्या नावे बोटे मोडता येणार नाहीत. कारण लोकशाहीत ... गुरुकिल्ली आपल्याच हातात असते."

ही किल्ली वापरण्याचे शिक्षण घेत असताना लोकांना अधिक दयाळू किंवा कमी आप्पलपोटे बनवून स्वातंत्र्याची सेवा बजावू शकू असा खोटा भ्रम बाळगून चालणार नाही. अनेक धर्मांनी तसा प्रयत्न केला आहे, आणि तरी 'उच्च विचारसरणी'-वाल्यांची संख्या फारशी वाढलेली नाही. मानवजातीची सुधारणा व उन्नति करायला आपल्याला अवकाश नाही; पण माणसे आहेत तशीच ठेवून त्यांचे त्यांच्याच उणीवांपासून संरक्षण करणाऱ्या व न्यायाविषयीच्या त्यांच्या आदराला प्रोत्साहन देणाऱ्या चांगल्या राजकीय संस्था निर्माण करून आपण एक पिढीतच समाज अधिक चांगला व जगण्यालायक करू शकू. दि न्यू यॉर्कर या नियतकालिकाने हा मुद्दा नीटसपणे मांडला आहे: "शेजाऱ्यावर प्रेम करण्याच्या मार्गाने जग वाचवायचा प्रयत्न करू नका; त्यामुळे तो बिचारा नर्व्हस मात्र होईल. कायद्याच्या छत्राखाली त्याच्या हक्कांविषयी आदर दाखवा आणि ( त्याच कायद्यानुसार ) तुमच्या हक्कांविषयी त्याने आदर ठेवावा असा आग्रह धरा—याच मार्गाने जग वाचवता येईल."

म्हणजे सर्व ओझे परत आपल्यावरच पडले आहे. ‘ सज्जन माणसांनी राजकारणात पडावे ’ किंवा ‘ राजकीय आचार अधिक नीतिशुद्ध बनवावा ’ या दिशांनी निरपेक्ष प्रयत्न चालू ठेवावेत. कारण शाब्दिक सेवेच्या पलिकडे त्यासाठी फारसे काही करावे लागत नाही. पण स्वातंत्र्याच्या राजकारणाची अधिक रेखीव व्याख्या करणे व अधिक सखोल समज करून घेणे जिकीरीचे व तितकेच निकडीचे काम आहे. येथेही केवळ शाब्दिक सेवेचेच अर्घ्य सोडले तर शतकानुशतकांच्या प्रयोगांनी प्राप्त झालेल्या तथ्यावर पाणी पडेल. अनेक चुका करत करत आपण हळूहळू का होईना पण बराच पल्ला गाठला आहे; पण जिथून सुरुवात केली त्या गर्तेत पडणे फार चटकन घडू शकेल.

हिस्टरी ऑफ युरोप हा आपला ग्रंथ लिहीत असताना एच्. ए. एल्. फिशर यांनी म्हटले आहे “ इतिहासाच्या पानापानावर प्रगतीची सत्य घटना ठसठशीतपणे लिहिलेली आढळते, पण प्रगती हा काही निसर्गाचा कायदा नव्हे. एका पिढीने मिळविलेले श्रेय पुढची पिढी चटकन् हरवून बसेल. माणसांचे विचार सर्वनाश आणि रानटीपणा यांच्या चाकोरीतून वाहू लागण्याची शक्यता केव्हाही आहे. ”

नाझींच्या बाबत हे घडलेले आपण पाहिले आहे. त्या टोळीतली सर्वात भयानक माणसे उत्क्रांतीतील माणसाच्या आधीच्या अवस्थेपर्यंत परत गेली होती. पण या भयानक प्रकाराने हबकून जाण्याचेही कारण नाही. नॅशनल सोशलिझमच्या संस्थांनी ज्यांना व्यभिचारी बनविले त्या जर्मनांच्यापैकी काही जणांतून सनदशीर, घटनात्मक, प्रातिनिधिक सरकारच्या अपूर्ण चौकटीत काम करीत करीत उत्तम अमेरिकन नागरिक तयार झाले आहेत. प्रगतीचा म्हणून काही कायदा आहे याचा हा पुरावा नव्हे, तशी काहीही आशा नाही. पण अवनती व विनाश यांचा मात्र कायदा आहे हे इतिहासाच्या कुठल्याही वाचकाला सहज उमगेल. आपल्या लोकशाहीच्या संरक्षणासाठी सतत चांगल्या संस्थांचे नियोजन पायरीपायरीने करत गेलो तरच एकेक वर्षाच्या मुदतीपुरता तो कायदा आपल्याला टाळता येईल. आहोत तेथे आपण स्थिर राहू शकत नाही. आणि चुकून एकदा जरी पाय घसरला तरी काळोख्या दरीत आपण कोसळून पडू.

## -- ६ --

लोकशाहीच्या आपल्या पाश्चिमात्य प्रकाराची अधिकातअधिक सुस्पष्ट व्याख्या बनविण्याची गरज असल्याचे आपण प्रतिपादन केले. ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण कितपत वाटचाल करू शकलो ?

४९६९३ निबंध५७
१५५८ ३०/७०/६

## प्रातिनिधिक लोकशाही

आपण नकारात्मक गोष्टीपासून सुरुवात करू या. केवळ 'लोकांचे राज्य' किंवा 'बहुमताचे राज्य' म्हणजे लोकशाही नव्हे. बहुमत देखील जुलूमशहाप्रमाणे दडपशाही करू शकते, म्हणजेच लोकशाहीच्या विरोधी वर्तन करू शकते. प्रश्न सोपा करण्यासाठी आपण असे म्हणू शकतो : सरकारचे फक्त दोन प्रकार संभवतात; एका बाजूला लोकशाही प्रकार, आणि दुसऱ्या बाजूला कुठल्या ना कुठल्या स्वरूपातील लहरी, जबरदस्तीने सत्ता चालविण्याचा प्रकार. दडपशाही करणारे, असहिष्णु व आग्रही बहुमत म्हणजे वस्तुतः जुलमी जमाव होय.

आपल्या पाश्चात्त्य, सुसंस्कृत अर्थाने लोकशाही म्हणजे केवळ डोकी मोजणे असे कधीच असू शकत नाही. सार्वजनिक जमाखर्चावरील विधिमंडळाच्या नियंत्रणामार्फत कार्यकारी मंडळावर जनतेचे नियंत्रण आणि रक्तपाताशिवाय कार्यकारी मंडळ व विधिमंडळ दोन्हींना बदलून घेण्याचा लोकांचा अधिकार या दोन गोष्टी ज्यांच्यामुळे साध्य होऊ शकतात अशा संस्थांचे जाळे म्हणजे लोकशाही होय. 'रक्तपाताशिवाय' हा शब्द अतिशय महत्त्वाचा आहे. हिंसा न करता क्रांतिकारक बदल घडवून आणणे व त्या प्रक्रियेत जुन्या राज्यकर्त्यांना पदच्युत करून त्यांच्या जागी नव्या राज्यकर्त्यांना नेमणे शक्य असेल तर तेथे लोकशाही अस्तित्वात आहे असे म्हणायला हरकत नाही. आजपर्यंतच्या आपणा पाश्चात्त्यांच्या अनुभवानुसार डोकी मोजणाऱ्या निवडणुका हा एकंदर पद्धतीचा अंगभूत व अविभाज्य भाग होय. पण या संस्थांचा गाभा याच्यात आहे की त्यात आजच्या अल्पमतवाल्यांचे जुलूमशाहीपासून संरक्षण होते आणि कालच्या बहुमताला शांततेच्या मार्गाने बडतर्फ करता येते. याचा अर्थ असा की कालचे बहुमतवाले सत्तेवर असताना त्यांना विरोधी पक्ष उलटवून देऊ शकेल अशी खबरदारी त्यांनीच घेतली पाहिजे.

अशी पद्धती राबविण्यासाठी अमेरिकन प्रजासत्ताकाच्या संस्थापकांनी नागरिकां-कडून संयम व सद्‌गुण आणि ज्यांचे अनुकरण करण्याचे नागरिक ठरवतात त्या नेत्यांकडून शहाणपण व निष्ठा यांची फार मोठी अपेक्षा केली आहे. काही नैसर्गिक नेत्यांचे अस्तित्व किंवा कुठल्याही क्षणी काही थोडी माणसे इतर सर्वांच्यापेक्षा अति-शय गुणी असतील हे लोकशाहीत नाकारलेले नसते; पण त्या श्रेष्ठत्वाची जाणीव ठेवण्याचे व त्याची स्तुती करण्याचे नागरिकांच्या इच्छेवर अवलंबून नाही, ते अपरिहार्यच आहे, ही भूमिका मात्र लोकशाहीला अमान्य आहे. उदाहरणार्थ १८२८ साली अमेरिकेतील भाग्यवंत मतदारांना अध्यक्षपदासाठी दोन थोर व्यक्तींमधून एकाची निवड करण्याची संधी मिळाली – जॉन क्विन्सी ॲडम्स् व ॲड्रयू जॅक्सन. ॲडम्सच्या अनेकविध चांगल्या गुणांकडे हसत हसत दुर्लक्ष करून त्यांनी जॅक्सनला आनंदाने निवडले.

सर्वसामान्य जनतेतून तो निर्माण झालेला असल्याने लोकांच्या गरजा व पूर्वग्रह यांचे त्याला जन्मजात ज्ञान होते, तो खराखुरा लोकांच्यातील पहिला लोकशाहीवादी लोकनायक होता. तो आपला मित्र होय असे लोकांना वाटणे स्वाभाविक व योग्यच होते. तो लोकशाहीवादी आणि लोकांच्यातून आलेला असल्याने आपल्या बरोबरचा आहे, त्याला कशाला निवडा, असा विचार लोकांच्या मनात आला असता तर ते वेडे होत असेच सिद्ध झाले असते. त्याने आपला कारभार जबरदस्त इच्छाशक्ती व ओतप्रोत अभिमान यांच्या जोरावर हाकला. राष्ट्राला ते आवडले. पण ते यासाठी की जॅक्सन काही बाबतीत अहंमन्य असला तरी देशाने निर्माण केलेल्या संस्थांना तो आदरणीय मानत होता.

अशा प्रकारची अंतर्क्रीडा लोकशाहीसाठी आवश्यक आहे. श्रेष्ठ पुरुष उपलब्ध होऊ शकला तर लोकांनी त्याचे स्वागत केले पाहिजे; आणि ज्यांचे त्याच्यावर नियंत्रण राहील व ज्यांच्या साहाय्याने लोक एक दिवस त्याचा पराभवसुद्धा करू शकतील अशा संस्थांचा त्या श्रेष्ठ पुरुषाने आदर राखला पाहिजे.

घटना लिखित असो की अलिखित, बहुमताची इच्छा ही जर सार्वभौम आणि सर्वश्रेष्ठ मानायची तर त्या बहुमताने आपली बडतर्फी कधी तरी का होईना काय म्हणून मान्य करायची ? ते केव्हाही सार्वमताचा बनाव घडवू शकते, 'हो-की-नाही' असे मतदान घेऊन 'लोकशाही'च्या नावाने आपल्या बेकायदेशीर, नाजायज सत्तेला पाठिंबा मिळवू शकते. जबरदस्तीने सत्ता हस्तगत करणारा कायदेशीर सत्ताधारी बनू शकतो. जबरदस्तीची सत्ता 'लोकां'च्या मधूनच निर्माण होते आणि त्यांच्याच सार्वभौम इच्छेच्या नावाने त्यांचे तोंड नंतर बंद केले जाते. सनदशीर लोकशाही व बहुमताची इच्छा याच्यातील या गोंधळाचे वर्णन वॉल्टर लिपमनने 'आपल्या काळातील सर्वोच्च राजकीय पाखंड' असे केले आहे. मात्र भाषेचा खेळ करणे अतिशय सोपे आहे, आणि प्रत्येक बदलाच्या वेळी 'हे सगळे योग्यच होय' असे म्हणणाऱ्या कलिंगडांची संख्या कमी नसते हे हिटलरने दाखवून दिले आहे.

१९२५ च्या 'मंकी ट्रायल' मधला विल्यम जेनिंग्ज ब्रायन म्हणजे असलेच एक पात्र होते. टेनेसी या संस्थानातील विधिमंडळाने असा कायदा केला होता की सरकारी पैशाच्या साहाय्याने चालविल्या जाणाऱ्या शाळातून 'माणसाच्या निर्मिती-विषयी बायबलात सांगितलेल्या दैवी कथेच्या विरुद्ध असलेली उपपत्ती' शिकविली जाऊ नये. जीवशास्त्राच्या एका शिक्षकावर या कायद्यानुसार खटला करण्यात आला, त्यावेळी ब्रायन हा सरकारच्या वतीने वकील म्हणून काम पहात होता. त्याने असा युक्तिवाद केला की 'लोकांची इच्छा हीच शेवटी प्रमाण ठरली पाहिजे. आरोपी

हा गुन्हेगार असल्याचा निवाडा त्याने मिळविला पण जगभर झालेल्या नर्मविनोदी चळवळीमुळे त्याचा अंमल स्थगित ठेवला गेला. कायदा नसलेल्या कायद्याचे हे आणखी एक उदाहरण होय.

उत्क्रांतीचा सिद्धान्त शाळेत शिकण्याची टेनेसीमधील मुलांना मनाई करण्याचा अधिकार विधिमंडळातील मागासलेल्या सभासदांना आहे यावर ब्रायनशिवाय दुसऱ्या कुठल्या मुत्सद्याचा विश्वास बसणे शक्य नव्हते. अमेरिकेतील लोकाभिमुख सरकार सुरुवातीपासूनच लोकांच्या शिक्षणावरील विश्वासाशी संबद्ध आहे. तरीही ज्याच्या आधारावर लोकाभिमुख सरकार उभे आहे त्या शिक्षणाच्या स्वातंत्र्यावरच बहुमताच्या इच्छेच्या नावाने घाला घालण्याचा हा एक प्रयत्न झाला. ब्रायनचे म्हणणे होते की तो कायदा घटनाशुद्ध होय; पण लोकांना तो विनोदच वाटला. बहुमताचे राज्य या भाबड्या तत्त्वाला मूठमाती मिळाली.

सत्कृत्य किंवा मूर्खपणा काहीही करायला पाश्चात्त्य लोकशाही आपल्या नेत्यांना अमर्याद अधिकार कधीच देत नाही. कार्यकारी मंडळाला किंवा विधिमंडळाला किंवा दोघांना मिळूनसुद्धा चौदावा लुई किंवा पहिली एलिझाबेथ यांच्याइतके विशेषाधिकार कधीच नसतात. जो त्यांच्यावरसुद्धा बंधनकारक असतो त्या घटनेच्या कायद्याची अंमलबजावणी करणे, त्याची व्याख्या करणे आणि अगदीच आवश्यक झाले तर तो बदलणे हे त्यांचे काम होय. कायदा लागू करण्याबाबत त्यांना भरपूर अधिकार असतात; त्यांची बडतर्फी टळू शकेल अशी दुरुस्ती सोडून बाकीच्या प्रकारची दुरुस्तीदेखील त्यांना करता येते; पण ती नाही, कारण ती म्हणजे लोकशाहीचा शेवट होय.

म्हणजे ‘ सत्ता कुणाच्या हातात असावी ? ’ या प्लेटोला राजकारणातील निर्णायक वाटणाऱ्या प्रश्नाऐवजी ‘ सत्तेचा वापर कसा केला जावा ? ’ हा प्रश्न महत्त्वाचा ठरला आहे. जोपर्यंत विधिमंडळ हे घटनेशी प्रामाणिक आहे, सार्वजनिक जमाखर्चावर त्याचे नियंत्रण सुरक्षित आहे, आणि माथेफिरू लोकनेत्याने लोकांना बहकवलेले नाही, तोपर्यंत मातबर उमरावांच्या घोळक्यातल्या रशियन झारपेक्षासुद्धा आपण अधिक सत्ताधारी आहोत असे कार्यकारी मंडळाला वाटले तर काही बिघडत नाही, लोकशाही सुरक्षितच राहते.

मार्क्सचा उजवा हात असलेल्या फ्रेडरिक एंगल्सचा आपल्या लोकशाहीविषयी जो गैरसमज झाला त्यामुळेच तिचे स्वरूप नीट समजायला आपल्याला साह्य होते. त्याने लिहिले आहे, “एका वर्गाचे दुसऱ्या वर्गाकडून शोषण करण्यासाठीची एक सोयीस्कर यंत्रणा म्हणजे शासनसंस्था होय; आणि हे राजेशाहीप्रमाणे लोकशाहीच्या बाबतीत

देखील खरे आहे." १८४८ साली तयार केलेल्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यात मार्क्स व एंगल्सने हीच गोष्ट सांगितली आहे: शासनसंस्था म्हणजे 'सत्ताधारी वर्गाचे कार्यकारी मंडळ होय.' शंभर वर्षांनंतर परत लिहायची पाळी आली असती तर ही गोष्ट ते इतक्या आत्मविश्वासाने म्हणू शकले नसते; कारण आज ग्रेट ब्रिटन, स्वीडन किंवा युनायटेड स्टेट्स् यात 'सत्ताधारी वर्ग' कोणता आहे ?

एकेकाळी बदनाम झालेल्या लोकशाहीने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार व सदनशीर नियंत्रणे यांच्या द्वारा प्रगती केल्यामुळे प्रत्येक पक्षाला समाजातील सर्व वर्ग-थरांना आवाहन करायला भाग पाडले आहे. इंग्लंडमधला हुजूरपक्ष ज्याप्रमाणे केवळ भांडवलदारांच्या मतांच्या जोरावर बहुमत मिळवू शकत नाही त्याप्रमाणे मजूरपक्षदेखील केवळ मजूरसंघटनांच्या मतांच्या जोरावर सत्ता काबीज करू शकत नाही. वर्ग अजूनही आहेत, काही ठिकाणी ते प्रभावशाली आहेत तर काही ठिकाणी केवळ नाममात्र आहेत; पण जीवनच इतके प्रवाही झाले आहे की सरकारला आपले 'कार्यकारी मंडळ' म्हणून वापरण्याइतका कुठलाच वर्ग सामर्थ्यशाली राहिलेला नाही. हे पाहून मार्क्सला धक्काच बसला असता. सोव्हिएट रशियातील आजच्या सत्ताधाऱ्यांना तो बसलाच आहे. त्यामुळे आलेली अस्वस्थता लपवण्यासाठी ते वस्तुस्थिती नाकारीत आहेत इतकेच.

मार्क्स हे सर्व पहायला जिवंत राहिला असता तर त्याने समोर दिसणारी वस्तुस्थिती कधीच नाकारली नसती. त्याने कल्पना केलेली दडपशाही करणारी शासनसंस्था आणि आज आपण समजतो ते सरकार यातील फरक त्याने मान्य केला असता. मार्क्सच्या भांडवलशाहीप्रमाणे त्याच्या शासनसंस्थेलादेखील पाश्चात्त्यांनी भूतकाळात फेकून दिले आहे. शिल्लक राहिला आहे तो निरुपद्रवी सेवक, म्हणजे सरकार— अर्थात निरुपद्रवी तोपर्यंतच जोपर्यंत आपण अविश्वासपूर्ण नजरेने लक्ष ठेवीत आहोत आणि उनाडपणाचे चिन्ह दिसल्याबरोबर त्याच्या पाठीत बडगा घालीत आहोत.

मार्क्स व एंगल्सला आपल्या आधुनिक लोकशाह्या पाहून आनंद झाला असता याचे कारण असे की आपण आर्थिक व सामाजिक व्यवहारात हस्तक्षेप करायला, 'अटळ' टाळायला आणि आपल्या मनाला आवडणारी गोष्ट घडावी याचा आग्रह धरायला शिकलो आहोत. आपल्या हस्तक्षेपाचे साधन सरकार हे आहे, आणि त्याचा परिणाम म्हणून सरकारचा प्रभाव वाढला आहे व सरकारी नोकरांची भरमसाट संख्या वाढून प्रचंड नोकरशाही निर्माण झाली आहे. हाही धोका आहे खरा; पण जोपर्यंत शासनसंस्थेला आपली मालकीण होऊ न देता सरकारवर आपण नियंत्रण

ठेवतो आहोत आणि आपला नम्र सेवक म्हणून त्याला वागवतो आहोत तोपर्यंत त्या घोक्यावरदेखील नियंत्रण ठेवणे शक्य आहे. आपली मालकीण होणारी शासनसंस्था आणि आपला नम्र सेवक राहणार सरकार यातील फरक म्हणजेच लोकशाही !

— ७ —

स्वातंत्र्याची स्थापना करण्यात रशियन क्रांतीला का अपयश आले ? आपण या प्रश्नाचे उत्तर देऊ शकलो तर आपल्या स्वतःच्या समस्यांविषयीही आपल्याला बरेच ज्ञान मिळेल.

लेनिनचा असा विश्वास होता की त्याचे राज्य म्हणजे भावी काळातील लोकशाहीचा आदर्श ठरेल. त्याची प्रतिष्ठापना पुढील तत्वांवर व्हावयाची होती. " सर्व अधिकारी निवडले जातील, त्यांना परत बोलावण्याचा मतदारांना हक्क असेल, आणि त्यांचे पगार सामान्य कामगाराच्या मजूरीच्या पातळीपर्यंत खाली आणले जातील. " लेनिनने एवढे मान्य केले होते की जुन्या सत्ताधारी वर्गाच्या राहिलेल्या अवशेषांना जबरदस्तीने दडपून टाकण्याचे काम या आदर्श समाजाला करावे लागेल. पण त्यांच्यापैकी बहुतेकजण पळून गेले असतील किंवा मृत्युमुखी पडले असतील, आणि बाकी राहिलेले फार काळ टिकणार नाहीत. मग कामगार व शेतकऱ्यांसाठी संपूर्ण लोकशाहीचे राज्य सुरू होईल. आणि काही काळानंतर ( नक्की तारीख कधीच सांगितली गेली नाही ) शासनसंस्था गळून पडेल.

लेनिनला बहुधा असे अभिप्रेत असावे की हुकूमशाही सत्ता हे शासनसंस्थेचे स्वरूप बदलून त्या ऐवजी आपण आज ज्याला सरकार म्हणतो त्याची प्रस्थापना होईल. सरकारविषयी त्याची कल्पना काहीशी पोरकट होती. त्याने असे म्हटले आहे की 'जुन्या शासनसत्ते'ची कामे इतकी सोपी करता येतील की त्यांचे स्वरूप कागदपत्रांची रजिस्टरमध्ये नोंद करणे, फाईलला लावणे, मधून मधून चेक करणे असे राहील आणि म्हणून सर्वसाधारण कामगाराला मिळणाऱ्या मजुरीच्या दरातच ही कामे करवून घेणे शक्य होईल.

हे चित्र सुंदर आहे, टॉमस जेफरसनच्या आर्केडीयन अमेरिकेच्या स्वप्नाशी मिळतेजुळते आहे, पण जेफरसनच्या समोर शेतीप्रधान नंदनवन होते तर लेनिन इतिहासकाळातील सर्वात जलद उद्योगीकरणाची आखणी करीत होता. अर्थात काही झाले तरी एखाद्या निर्जन बेटावर संभवू शकेल इतके सोपे राजकीय जीवन असूच शकत नाही.

स्वातंत्र्य व लोकशाहीची इच्छा लेनिनच्या मनात व हृदयात होती. मग जुन्या सत्ताधारी वर्गाच्या अवशेषांचा नायनाट करण्यापुरतीच त्याच्या राज्याची सत्ता का मर्यादित राहिली नाही ? अगदी १९२१ सालीच क्रोन्स्टाट बंदरातील आरमारातील खलाशांवर– जे ऑक्टोबर क्रांतीचे नायक होते– लाल सैन्य दुष्टपणाने का सोडण्यात आले ? हा निर्णय अतिशय घातक होता, रशियाच्या स्वातंत्र्याविषयीच्या सर्व आशांना तो मारक ठरला. सोव्हिएट क्रान्तीच्या नेत्यांनासुद्धा स्वतः स्वतंत्रपणे विचार करायला परवानगी देण्यात येणार नव्हती. राजमार्गाला सोडून थोडेसे वेगळे चालणेसुद्धा गुन्हा ठरू लागले, रशियन लोकांची कत्तल सुरू झाली.

थोडेसे वेगळे चालणे म्हणजे कशापासून ? तर पक्षाच्या मतापासून. आणि पक्षाची मते काय होती ? मार्क्स व नंतर लेनिनच्याही लिखाणाचा ‘ योग्य ’ अन्वयार्थ. ‘ योग्य ’ अन्वयार्थ म्हणजे काय ? क्रेमलिन या राजवाड्यात आज जे लोक बसून राज्य चालवीत आहेत त्यांनी लावलेला अन्वयार्थ.

बुद्धिवान व रुबाबदार रशियन लोक काळ्या हुकूमशाहीच्या दावणीला बांधले जाणे या आधुनिक काळातील महान शोकांतिकेचे मूळ मार्क्सने स्वतःला आर्थिक इतिहासज्ञ न मानता द्रष्टा मानले यात शोधणे शक्य आहे. द्रष्टे लोक ग्रंथ लिहीत नाहीत; ते साक्षात्कार सांगून ठेवत असतात. आणि साक्षात्काराबाबत दुःखदायक बाब अशी की ते कधी खोटे असूच शकत नाहीत. पक्षाचे नियंत्रण नव्या माणसाच्या हाती जाते तेव्हा तो मूळ धर्मग्रंथावर स्वतःचे भाष्य लादीत असतो. पण साक्षात्कार हा पवित्र आणि अंतिमच राहतो. जो पक्षाची आज्ञा पालन करतो तो चुकू शकत नाही. आणि जो पक्षाच्या आदेशाविषयी प्रश्न विचारतो किंवा पक्षाला आव्हान देतो त्याला जिवंत राहू देणे योग्य नाही.

खिश्चन चर्चच्या साक्षात्कारांबाबत अशीच अडचण निर्माण झाली होती. पाश्चिमात्य जगतात ज्यावेळी फक्त एकच अन्वयार्थ– मध्ययुगीय चर्चचा– शिरसावंद्य मानला जात होता त्यावेळी पाखंड्यांना खिश्चन लोक तितक्याच स्वच्छ सदसद्विवेक बुद्धीने कंठस्नान घालीत होते जितक्या सहजतेने रशियनांनी हंगेरियन क्रांती मोडून काढली. जॉन स्ट्रॅचीने त्या प्रसंगाविषयी एका कर्नल फेडेरॉरची साक्ष काढली आहे. त्या कर्नलने म्हटले आहे, “ कम्युनिस्ट पार्टीने प्रशिक्षण देऊन तयार केलेले सोव्हिएट रशियातील सैनिक आपले आंतरराष्ट्रीय कर्तव्य चोखपणे बजावीत असतात. हंगेरीतील कष्टकरी जनतेला त्यांनी जे साह्य केले त्यावरून हे सिद्ध होते..... ”

हंगेरियन लोकांना कंठस्नान घालून ( रशियन कम्युनिस्ट ) पक्ष त्यांना मदत करीत होता, कारण तसे केल्यानेच त्यांची मुले पाश्चात्य नरकाऐवजी आदर्श कम्युनिस्ट

समाजात वाढू शकणार होती. कर्नल फेडेरॉरचा त्याच्यावर खरोखर विश्वास असेल, कारण तो एका माथेफिरू धर्माचा पाईक होता. त्याच्या दृष्टीने आपले राजकारण, आपले स्वातंत्र्य व आपली लोकशाही म्हणजे नरकगतीच्याच खुणा होत. आपल्या दृष्टीने त्या केवळ काही बाबतीत अपूर्ण आहेत; पण त्यांची सुधारणा करण्याची तरी आपल्याला संधी मिळते हाच फार मोठा फरक आहे : आपले सामाजिक व आर्थिक तत्त्वज्ञान शंभर टक्के योग्य आहे अशी खऱ्या लोकशाहीवाद्याला खात्री वाटत नसते, आणि आपले तत्त्वज्ञान चुकीचे असू शकेल अशी शंका खऱ्या कम्युनिस्टाला चुकून देखील येत नाही.

पण एव्हाना रशियन लोक लोकशाहीसाठी तयार झाले असावेत. शिक्षण, बुद्धिमत्ता व हालअपेष्टा सोसण्याने येणारे शहाणपण यांच्यामुळे लोकशाही स्वीकारायला व चालवायला त्यांच्या मनाची तयारी झाली असावी असे वाटते. रशियन लोकांना बौद्धिक स्वातंत्र्य मिळण्यावर आणि प्रत्येकाला बायबलचा अर्थ स्वतंत्रपणे लावण्याचा जसा अधिकार आहे तसा मार्क्सचा अर्थ लावण्याचाही असला पाहिजे हे जे आज तेथे अनेकांच्या मनात येत असेल ते त्यांनी जाहीरपणे बोलण्याचे धाडस दाखविण्यावर जगाचे अस्तित्व अवलंबून आहे.

तीस वर्षे चाललेल्या युद्धानंतर खिश्चनांनी तसा शोध लावला. त्याच्या नंतरच पाखंड्यांना जिवंत जाळण्याचे पाशवी प्रकार थांबले.

## ८

आपण असे म्हटले की पुरेशी खबरदारी घेतली आणि जागृत राहिलो तर सरकारच्या सतत वाढत जाणाऱ्या सामर्थ्यावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे. हा एका अर्थी श्रद्धेचाच प्रश्न आहे. भविष्याविषयी आशा बाळगायची असेल तर या श्रद्धेचा आश्रय घेतला पाहिजे. ज्यांच्यामुळे लोकशाहीला धोका निर्माण होईल असे मार्क्सने म्हटले होते त्या सामाजिक व आर्थिक संकटांचा मुकाबला करताना सरकारला टप्प्याटप्प्याने नवनवे अधिकार आपल्या हाती घ्यावे लागले. अजूनसुद्धा दररोज नवनवे अधिकार घेतले जात आहेत. ही प्रवृत्ती वाईट आहे असे आपण म्हणू शकतो, पण ज्याची कल्पना करणेदेखील अशक्य आहे अशा खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा अंगीकार करण्याचा पुरस्कार करायचा नसेल तर या प्रवृत्तीला थांबवणे कठीण आहे.

कुठल्याही परिस्थितीत सत्तेची भीती बाळगण्याचे कारण नाही, सत्तेच्या दुरुपयोगाचीच तेवढी भीती असते. गेली दोन शतके आपण ज्या संस्थांचा विकास केला त्यांच्या साहाय्याने या दुरुपयोगाचा प्रतिबंध करणे शक्य आहे; आपले स्वातंत्र्य टिकवायचे असेल तर त्या संस्थांना आपण परिपूर्ण बनविले पाहिजे. आपण आता माघार घेऊ शकत नाही की कमजोरी दाखवू शकत नाही, शास्त्र व तंत्रज्ञान यात होत असलेल्या अखंड क्रान्त्यांवर स्वार होण्याचा अधिकार आपण सरकारला नाकारू शकत नाही. मार्क्सने आपल्याला असा इषारा देऊन ठेवला आहे की सतत सुधारत जाणारी उत्पादनाची साधने आपल्या नाजुक राजकीय पद्धतीचा विध्वंस करतील. मार्क्सला खोटे ठरवायचे असेल तर अवकाशयुगातील यांत्रिक सैतानांना तोंड देण्यासाठी अठराव्या शतकात शोभून दिसणाऱ्या काटकसरी सरकारचे साह्य पुरे पडणार नाही. मात्र आपल्याला विचारल्याशिवाय अधिकाराचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राज्यकर्त्यांना असणार नाही अशीही खबरदारी आपण घेतली पाहिजे.

"इतिहासाने असे सिद्ध केले आहे की हुकुमशाह्या या सामर्थ्यशाली व यशस्वी सरकारातून नव्हे तर दुबळ्या व असहाय सरकारांमुळे निर्माण होत असतात ..." असे सांगून फ्रँकलीन रूझवेल्टनी पुढे म्हटले आहे, "लोकांच्या हितांचे संरक्षण करू शकेल असे सामर्थ्यशाली सरकार आणि सरकारवर आपले सार्वभौम नियंत्रण गाजवू शकतील असे लोक हेच खरे अखंड स्वातंत्र्याचे भक्कम मोर्चे होत." यात परत 'लोक' ही अमूर्त कल्पना गृहीत धरली आहे. प्रत्यक्ष व्यवहारात परस्परविरुद्ध हित-संबंध असलेल्या वर्गात विभागणी झालेल्या व्यक्तींचे समूह (मास) असतात असे आपण पाहतो. बहुमतवाल्या गटांनी कितीही शहाणपणाने सरकारवर नियंत्रण ठेवले तरी बाकीचे गट घायकुतीला येऊन बंडावा करण्याचा प्रयत्न करतील. आब्राहाम लिंकनसमोर अशीच समस्या निर्माण झाली होती.

१८६१ साली लिंकनने कॉंग्रेसला विचारले, "असंतुष्ट असणारे मोजके, मूठभर लोक, राज्यकारभार हाती घेण्याला असमर्थ असल्याने सध्याच्या किंवा अन्य कुठल्या-तरी कारणावरून सरकारच मोडण्याचा प्रयत्न करतील. या यादवी युद्धाने हाच प्रश्न उपस्थित केला आहे की मूठभर असंतुष्ट आत्म्यांच्या या प्रयत्नांना तोंड कसे द्यायचे... प्रत्येक प्रजासत्ताकाच्या अंगी ही उणीव अपरिहार्यपणेच असते का? आपल्या लोकांच्या स्वातंत्र्यावर घाला येईल इतके सामर्थ्यशाली तरी होणे किंवा स्वतःचे अस्तित्वदेखील टिकविता येणार नाही इतके कमजोर तरी होणे हेच सरकारपुढे पर्याय आहेत काय?"

प्रश्नाचे उत्तर देणे अशक्य दिसते, पण आशावाद टिकविण्याच्या दृष्टीने दोन मुद्यांची नोंद घ्यायला हरकत नाही. लिंकनच्या उदाहरणातील असंतुष्ट आरमे हे विस्तृत संघराज्यातील एका भौगोलिकदृष्ट्या सलग भागात एकत्र येऊन आपला गट करू शकले. त्यामुळे त्याला बंड करणे सोपे झाले आणि १७७६ साली अमेरिकन वसाहतींनी इंग्लंडविरुद्ध केलेल्या स्वातंत्र्ययुद्धाशी त्याचे काही बाबतीत साम्य असल्याने त्याला प्रतिष्ठाही प्राप्त झाली. दुसरी गोष्ट अशी की निरुत्साही कारभाऱ्यांमुळे यादवी युद्ध होणे अटळ झाले. दक्षिणेकडील संस्थानांना फुटून निघण्याचा अधिकार नाही, पण संघराज्याच्या कार्यकारी मंडळाला हस्तक्षेप करण्याचाही अधिकार नाही अशा नकारात्मक सिद्धान्ताच्या आहारी जाऊन प्रेसिडेंट बुशननने चार वर्षेपर्यंत परिस्थिती हाताबाहेर जाऊ दिली. अशा नकारात्मक भूमिकेवर ज्याचा विश्वास नव्हता अशा लिंकनची अध्यक्षपदी निवड झाल्याबरोबर दक्षिणेकडील भडकेल नेत्यांना बंड पुकारणे भाग पडले. लिंकनने कारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच अगदी दक्षिणेकडील संस्थाने फुटूनसुद्धा निघाली होती. नव्या कॉन्फेडरसीचा नेमस्त उपाध्यक्ष अलेक्झांडर स्टीफन्स यानेच म्हटल्याप्रमाणे दक्षिणेकडले लोक "वेडे झाले आहेत......भावनावेग व पिसाटपणा यांच्या आहारी गेल्यामुळे आपण काय करतो आहोत याचे भान न ठेवताच ते वेडयासारखे वागू लागले आहेत."

अमेरिकन यादवी युद्धाच्या शोकांतिकेने फ्रँकलीन रूझवेल्टच्या सिद्धान्तालाच पुष्टी दिली आहे की समर्थ सरकारापेक्षा दुबळी सरकारेच जास्त धोकादायक असतात. कुठल्याही आणीबाणीला तोंड देण्याची सरकारची सिद्धता असली पाहिजे, आणि आणीबाणी किती तीव्र असेल हे आधी सांगता येत नसल्यामुळे व्यवहारात सरकारच्या अधिकारांवर बंधने घालणे शक्य नाही, त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे मात्र शक्य व आवश्यक आहे. सरकार उपाययोजना करायला असमर्थ असेल तर साध्यासुध्या पेच-प्रसंगांनीसुद्धा गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. त्यांच्या कृतीचा जाब देण्यापासून सरकारांना स्वातंत्र्य दिले गेले तर लोकशाहीवादी राज्यकर्त्यांच्या अंगी देखील हुकूमशाही सवयी बाणवतील. म्हणून राज्यघटनेचा उद्देश सत्तेवर मर्यादा घालणे हा असू नये, तर जबाबदारीने जाब दिला घेतला जाईल व विरोध करण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहील अशी दक्षता तिने घेतली पाहिजे. प्रौढ मतदानाने निवडलेल्या विधिमंडळासमोर प्रत्येक कृत्याचा जाब द्यायला बांधले गेलेले पण अंमलबजावणीचे पूर्ण अधिकार असलेले कार्यकारीमंडळ— हा स्वतंत्र प्रातिनिधिक सरकारचा आदर्श होय.

सार्वत्रिक मताधिकार दिल्याने भडकेल नेत्यांचा धोका वाढतो. आपण वर पाहिल्याप्रमाणे बहुतेक राजकीय प्रश्न संस्थात्मक आहेत. कायदे व संकेत यांच्या साह्याने

आपले नेते निवडण्याचा नागरिकांना अधिकार देऊन व नागरिकांच्या मतांची कदर करण्याला नेत्यांना भाग पाडून त्यापैकी बहुतेक प्रश्न सोडविता येतात किंवा त्यांची उग्रता कमी करता येते. पण भडकेल नेत्यांचा प्रश्न सोडविण्याला ते मार्ग अपुरे पडतात. कायदे किंवा संकेत कुणीही त्यांना आवर घालू शकत नाही. विवेकबुद्धि किंवा सुसंस्कृत स्वार्थ यांना आवाहन न करता उथळ भावना, पूर्वग्रह आणि डॉस्टॉवस्कीने कलेत व हिटलरने कृतीत अभिव्यक्त केलेला जीवनाच्या मुळाशी असलेला जंगली दुष्टपणा यांना भडकवून भडकेल नेते आपला कार्यभाग साधीत असतात.

हिटलरने म्हटले आहे, "लोकशाह्यांच्यापेक्षा आपण नेहमीच वरचढ राहू, कारण त्यांचे लोकमत आपल्या सोयीप्रमाणे बनविणे आपल्याला शक्य आहे. आपल्या या अभिनव हल्ल्यांना ते तोंड देऊ शकत नाहीत, कारण तसे केले तर त्यांचेही रूपांतर अधिकारशाहीत होईल." भडकेल नेत्यांना श्रोते उपलब्ध राहू देणे आपल्याला भाग असल्याने आपण त्याबाबत आपले संरक्षण करू शकणार नाही. असे हिटलरचे म्हणणे. ते जोपयत स्पष्ट स्वरूपात व तातडतोबीने धोका निर्माण करीत नाहीत तोपर्यंत आपल्या श्रद्धेचा भाग म्हणूनच त्यांना गप्प बसविणे आपल्याला अशक्य असते. आणि त्यामुळे फार उशीर होण्याची, परिस्थिती आवाक्याबाहेर जाण्याची भीती असते. त्यांची प्रचंड, धक्का देणारी असत्य विधाने ("आपल्या सर्व दुःखांना ज्यू लोक जबाबदार आहेत") लहान मुलांच्या जादूचमत्कारातील विश्वासाला आवाहन करीत असतात. 'आला मंतर, कोला मंतर' केले की इडा पिडा टळते, पृथ्वीवर नंदनवन फुलते. त्यांनी सुचविलेले क्रूर उपाय ("सर्व ज्यूंना यमसदनाला पाठविले की आपले ईप्सित साध्य होईल") आपल्या पाशवी प्रवृत्तीला आवाहन करीत असतात; ती प्रवृत्ति अस्तित्वातच नाही असे जोरजोराने म्हणत असतानाच आपण तिला बळी पडत असतो.

"भावनावेग व पिसाटपणा यांच्या आहारी गेल्यामुळे आपण काय करतो आहोत याचे भान न राहताच ते वेड्यासारखे वागू लागले आहेत." अलेक्झांडर स्टीफन्सचे हे शब्द नाझी जर्मनीतल्या जमावांनादेखील तितक्याच चपखलपणे लागू पडतात. आफ्रिकेतील बऱ्याच "स्वतंत्र" लोकांनाही ते लागू पडतात. आपल्यापैकी प्रत्येकाला ते उद्या लागू पडतील हे समजून घेण्याचा आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. आपण बळी पडू शकतो हे मान्य करून त्याविरुद्ध सावधगिरी घेणे हेच भडकेल नेत्यांपासूनचे खरे संरक्षण आहे.

उदाहरणार्थ, आपण जर जगभर मुलांची संख्या प्रचंड प्रमाणावर वाढू दिली तर आपण काळजीपूर्वक, किंवा निष्काळजीपणाने म्हणा हवे तर, भावी युद्धाची बीजे पेरून ठेवू. प्रचंड लोकसंख्या व वखवखलेली भूक हे भडकेल नेत्यांना अतिशय अनुकूल असे शिकारीचे रान तयार करून देतील. राष्ट्रवाद व वंशद्वेष यांच्या नावाने

ते लोकसंख्येचे प्रश्न व्यवस्थितपणे सोडवतील, लोकसंख्याच नष्ट करतील. आपण हा धोका टाळला तर ज्यांची आज कल्पना करता येत नाही असे नवे धोके निर्माण होतील. आणि प्रत्येक पेचप्रसंग स्वतःच भडकेल नेते तयार करतील.

आशेचे अभिवचन देणाऱ्या किंवा धास्ती वाढविणाऱ्या तुफानी वक्त्यांच्या भाषणांना कुठल्या ना कुठल्या दडपणामुळे प्रत्येकजण बळी पडण्याचा धोका असतो. जेव्हा निकराचा प्रसंग उभा राहतो त्यावेळी हे लक्षात येते की अशाप्रकारे बळी पडण्याची माणसातील तयारी हाच स्वातंत्र्याचा खरा धोका आहे. जीवनकलहातील पिळवटणाऱ्या समस्यांना ' सोपे उत्तर ' उपलब्ध आहे असे सांगितले तर बहुधा कुठलाही माणूस कुठल्याही गोष्टीवर विश्वास ठेवायला तयार होईल. ते ' सोपे उत्तर ' म्हणजे भडकेल नेत्यांच्या व त्यांच्या साथीदारांच्या हाती सर्व सत्ता सोपविणे—अर्थात् लोकशाहीच्या नावानेच आणि केवळ आणीबाणीच्या काळापुरतीच !

मतदार या नात्याने आपण बळी पडू शकतो तो केवळ एवढाच मूर्खपणा नव्हे. भडकत्या भुकेमुळे भडकेल नेते निर्माण होतात, आणि दारून वाटणाऱ्या भीतीमुळे स्वातंत्र्य हरपते, तसेच वैपुल्य आणि वैभव यामुळे आळशीपणा आणि जबाबदारी नाकारण्याची प्रवृत्ती बळावते. डॉस्टॉवस्कीचा ग्रँड इन्क्विझिटर म्हणतो, " माणूस किंवा मानवी समाजाला स्वातंत्र्याइतकी सहन करण्याला अवघड गोष्ट दुसरी नाही. " अमेरिकेतील तरुणांच्या मतांच्या छाननीत जे आढळून आले त्यावरून त्या इन्क्विझिटरला भयानक अंतर्दृष्टी असल्याचे सिद्ध झाले आहे. उद्योगधंद्यातील नोकरशहा सांप्रतच्या वैभवाचे व वैपुल्याचे व्यवस्थापन करतात, त्यामुळे अमेरिकन तरुणतरुणींना वाटते की राजकारणाची व्यवस्थादेखील अशीच केली जावी, त्यांना विनाकारण जबाबदारीच्या त्रासात गुरफटवू नये, वैपुल्याचा उपभोग घेण्यासाठी त्यांना मोकळे सोडावे. त्यासाठी अप्रिय विचारांना दडपून टाकणे व लोकशाहीला ' टाटा ' करणे आवश्यक असले तर त्यालाही त्यांची तयारी आहे असे दिसते. त्यांचे म्हणणे की, " जनरल मोटर्स या कारखान्यासाठी काही निवडणुका लढविल्या जात नाहीत, आणि तरी त्याचा कारभार कसा सुरळीत चाललेला असतो." ग्रँड इन्क्विझिटरला याचीही कल्पना आलेली होती. तो म्हणतो, " माणसे शेवटी आपले स्वातंत्र्य आमच्या पायापाशी आणून ठेवतील आणि हात जोडून म्हणतील, ' आम्हाला गुलाम करा, पण खाऊ घाला.' "

भडकेल नेत्यांना बळी पडण्याच्या किंवा वैपुल्यामुळे आळशी बनून गुलामगिरी पत्करण्याच्या या दोन अंगभूत धोक्यांपासून दुसरा कोणीही आपले संरक्षण करू शकणार नाही; कारण कुणालाही जबरदस्तीने स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायला लावता येत नाही. आपण दारिद्र्याच्या दरडावणीने भ्यालो नाही, आणि वैपुल्यामुळे सुखलोलुपतेच्या आहारी गेलो नाही तर संसारातील अनेक धोक्यांपासून आपण आपल्या

प्रातिनिधिक संस्थांचे संरक्षण व संवर्धन करू शकू. राजकारणात काहीही स्थिर राहात नाही. सुधारणा तरी होते किंवा अवकळा तरी येते.

आपला मुख्य प्रश्न आहे आपल्या विश्वस्तांचे म्हणजे विधिमंडळसदस्यांचे सामर्थ्य वाढविण्याचा. या रखवालदारांच्या नजरेतून निसटण्याची कार्यकारी मंडळाची सतत धडपड चाललेली असते. याला प्रतिशह देण्यासाठी प्रतिनिधींचे कर्तव्य व जबाबदाऱ्या यांची लोकांना सहज समजेल अशी सुस्पष्ट व्याख्या केली पाहिजे, इतर कामांपासून त्यांना मुक्त केले पाहिजे, म्हणजे आपल्या कर्तव्यापासून च्युत होण्याचा कोणालाही मोह होणार नाही.

प्रथम ही गोष्ट आपण आपल्या मनात स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे की अतिशय व्यापक अर्थाचा अपवाद केला तर नित्य व्यवहारात लोकांची इच्छा व्यक्त करण्यासाठी सरकारची निर्मिती झाली आहे अशी कल्पना करणे चूक आहे. आपण असे मान्य करू या की लोकांना सुरक्षितता, स्वातंत्र्य, वाढते जीवनमान, फुरसतीच्या काळात करमणूक व परदेशात थोडीफार प्रतिष्ठा पाहिजे असते. त्यांचा असा विश्वास आहे की या व अन्य चांगल्या गोष्टी लोकशाहीतच जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे मिळविता येतात. म्हणून त्यांना तात्पुरत्या हुकूमशहाच्या स्वरूपातले जवळचे मार्ग (शॉर्टकट) नको वाटतात. पण त्यांना जर असे वाटले की सरकारला या उद्दिष्टांचा विसर पडला आहे किंवा त्या दिशांनी ते पुरेशा गतीने प्रगती करीत नाही, तर लोक त्यांच्या ऐवजी दुसऱ्या मंडळींना उच्चासनावर बसवून पाहतील. मतदार या हद्दीपर्यंतच क्रियाशील व सर्जनशील होऊ शकतात. ही उद्दिष्टे कशी साध्य करायची ह्याचा तपशील सांगणे त्यांना शक्य नाही. त्यांचा आग्रह एवढाच असेल की लोकशाही व स्वातंत्र्य यांना बाध येईल अशा पद्धतींचा अवलंब केला जाऊ नये.

कार्यकारी मंडळाने वर निर्देशिलेल्या स्थूल दिशांनी समाजाचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करावा. प्रतिनिधींनी (व विशेषतः विरोधी पक्षांनी) स्पष्टपणे व सातत्याने प्रत्येक कृतीसाठी व परिणामांसाठी कार्यकारी मंडळाला जबाबदार धरले पाहिजे. परिणाम जेव्हा असमाधानकारक दिसू लागतील तेव्हाच लोकमत किंवा 'लोकांची इच्छा' यांना लक्ष घालणे क्रमप्राप्त ठरेल, व तेही मुख्यतः ते काम दुसऱ्या कुणाकडे सोपवायचे हे ठरविण्यापुरतेच मर्यादित असेल. ते काम स्वतःच करणे लोकमताला अशक्य आहे. म्हणून जे लोक सत्तेवर आहेत त्यांच्यावर सतत रखवाली करायला विश्वस्तांची गरज आहे.

रखवालदारावर कोणी लक्ष ठेवायचे ? व्यापक आणि सर्वसाधारण अर्थाने मतदार (वृत्तपत्रांच्या साहाय्याने) आपल्या प्रतिनिधींवर लक्ष ठेवीत असतात; पण अतिशय सर्वसामान्यपणेच, कारण शासनाच्या विविध प्रश्नांबाबत ते अनभिज्ञ असता

आणि युद्धाच्या वेळचे परराष्ट्रसंबंध वगैरे सारख्या प्रश्नांनी तर ते कंटाळून जातात. पण रखवालदारांवर लक्ष ठेवायला दुसरा कोणीच नसतो; तेव्हा मतदारांना ते काम करता यावे यासाठी ते शक्य तितके सोपे केले पाहिजे. याचा अर्थ असा की लोक-प्रतिनिधींना कार्यकारी मंडळाच्या कारभारावर लक्ष ठेवणे, प्रश्न विचारणे आणि बिंगे बाहेर काढणे याशिवाय दुसरे काही काम असू नये, एखाद्या पदाच्या लोभाने आश्रित बनायला वाव असू नये, अंदाजपत्रकात उघडपणे कपाती सुचविण्याशिवाय अन्य मार्गांनी त्यावर प्रभाव पाडता येऊ नये ( म्हणजे स्वतःच त्यातला काही अंश हडपता येऊ नये ), व आपल्या मतदारसंघांतील लोकांची वैयक्तिक कामे करून देण्याची जबाबदारी असू नये –ही आदर्श व्यवस्था होय. अशा स्थितीत आपण कार्यमग्न आहोत हे दाखविण्यासाठी सत्तेच्या वापरावर सतत संशयी नजरेने लक्ष ठेवणे व कार्यकारी मंडळाच्या सर्व शिफारशींवर स्वतंत्रपणे मत व्यक्त करणे या मार्गांनी जनहित सांभाळण्याचे काम त्यांना करावे लागेल.

सत्तेचा मुख्य प्रश्न ‘ ती कोणाला मिळते ? ’ हा नसून ‘ ती कशी व कुठल्या बंधनांखाली वापरली जाते ? ’ हा आहे; तसेच विश्वस्तांच्या म्हणजे लोकप्रतिनिधींच्या बाबतीतला मुख्य प्रश्न ‘ त्यांच्या जबाबदारीची व्याख्या कितपत सोप्या भाषेत केली जाते ? ’ हा आहे. ती व्याख्या जास्तीतजास्त सोपी केली म्हणजेच जनता आपल्या रखवालदारांवर देखरेख करू शकेल, आणि कार्यकारी मंडळ विधिमंडळाला जबाबदार असते त्या पद्धतीने विधिमंडळ हे मतदारांना जाब द्यायला बांधले जातील. सत्तेत वाटेकरी होण्याचा ( व पर्यायाने ती कमी करण्याचा ) हा प्रश्न नाही, सत्तेच्या वापरावरील नियंत्रणात सहभागी होणे हे खरे महत्त्वाचे आहे. या नियंत्रणामुळे प्रत्यक्ष सत्तेच्या वापरावर बऱ्याच मर्यादा पडतात, पण आणीबाणीला तोंड देण्यासाठी जे अधिकार उपलब्ध असले पाहिजेत त्यात मात्र कपात होत नाही.

लोकप्रतिनिधींच्या कामावर कार्यकारी मंडळ कोणत्या प्रकारे आक्रमण करण्याचा प्रयत्न करते हे आजच्या ब्रिटिश सरकारच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. ठरलेला कार्यक्रम पार पाडण्याच्या घाईमुळे पार्लमेंटच्या प्रत्येक अधिवेशनात सरकार आपल्या अनुयायांना इतकी शिस्त लावते की परिणामतः आपला प्रतोद सांगेल त्याप्रमाणे मते टाकण्यापलीकडे त्यांना काही करताच येत नाही, आणि तसे काही केले तर बंडाळी केल्याचा आरोप येऊन त्याचे परिणाम भोगावे लागतात. विरोधी पक्ष भरपूर टीका करतो, पण त्यातही लोकशाहीशी सुसंगत नसलेल्या शिस्तीचा काही भाग असतोच. टीकेत देखील ‘ पार्टी लाईन ’ येत जाते आणि त्यापासून बाजूला जाणाऱ्यावर अवकृपा होते.

ही प्रवृत्ती रोखून सुधारणा करण्याचे काम फक्त मतदारच करू शकतो. पुरेशा मतदारांनी आपल्या प्रतिनिधींना अधिक स्वातंत्र्य मिळावे अशी मागणी केली तर कार्यकारी मंडळ त्यापुढे निश्चितपणे मान तुकवील. पण मतदारांनी तशी मागणी केली नाही तर लोकशाहीचे संरक्षण करायला सार्वत्रिक मताधिकार पुरेसा नाही हे त्यांच्या लक्षात येईल. पक्षशिस्त निरपवाद बनली आणि अशी शिस्त असणे हाच आदर्श मानला जाऊ लागला तर समतोल ढळेल, सत्ताधाऱ्यांच्या हाती अमर्याद सामर्थ्य एकवटेल आणि विश्वस्तांना आपली जबाबदारी पार पाडणे अशक्य होत जाईल. मग मुख्य झगडा मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सहकाऱ्यात सुरू होईल, प्रत्येक जण सर्वोच्च पदावर जाण्याचा प्रयत्न करील.

युनायटेड स्टेट्स्‌मध्ये कार्यकारी मंडळाच्या कारभारावर देखरेख ठेवण्याबरोबरच कायदे करण्यात पुढाकार घेण्याचे कामही लोकप्रतिनिधींच्याकडेच आहे. पण तेथे पहिला अध्यक्ष वॉशिंग्टन याच्या काळापासून तो सांप्रतचे अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांच्या कारकीर्दीपर्यंत व्हाइट हाऊस- (अध्यक्षाचे अधिकृत निवासस्थान व कार्यालय) च्या हातातील सत्ता सारखी वाढते आहे. धोरणे ठरविणारे मंडळ या दृष्टीने कॉंग्रेस यशस्वी होऊ शकली नाही, सत्ता हा कार्यकारीमंडळाचा एका अर्थाने विशेषाधिकार आहे, आणि अमेरिकन मतदाराला दुसरी कामे फारच असल्याने आपण निवडून दिलेल्या सेवकांवर नजर ठेवणे व त्यांना जाब विचारणे ही कामे करायला त्याला फुरसत मिळत नाही— अशा अनेकविध कारणांमुळे कार्यकारी मंडळाच्या हातातील सत्ता भरमसाट वाढली आहे.

ज्या पदांवर वास्तविक नेमणुका व्हायला हव्यात अशा अनेक पदांसाठी सध्या लोकशाहीच्या नावाखाली निवडणुकांची तरतूद आहे. एकाच मतदानपत्रिकेच्या साहाय्याने वेगवेगळ्या पंचवीस जागांसाठी उमेदवार निवडण्याची जबाबदारी मतदारावर टाकण्यात येते. प्रत्येक बाबतीत तो अक्कलहुशारीने निवड करू शकतोच असे नाही. आणि त्याने मत दिलेले उमेदवार निवडून आले तरी त्यानंतर ते काय काय करतात यावर नजर ठेवायला मतदाराला इंद्राइतके डोळे हवेत. त्यामुळे जेव्हा घोटाळा होतो तेव्हा कुणाला दोषी धरायचे हे त्याला समजेनासे होते.

राज्यशास्त्रातला एक सिद्धान्त असा आहे की लोकांना जेवढी सत्ता वापरता येते त्यापेक्षा जास्त दिली तर ती त्यांच्यापासूनच हिरावून घेतल्यासारखीच असते. जे स्त्रीपुरुष निवडून आलेले असतात त्यांच्यापैकी फार थोड्यांना प्रत्येक अमेरिकन मतदाराने मत दिलेले असते, आणि ज्यांनी त्या लोकांची निवड केलेली असते त्यांची भेटही होणे शक्य नसते. सर्वसाधारण गोंधळलेला मतदार ज्या सत्तेचा वापर देखील करू शकणार नाही अशी सत्ता काही मोजके मूठभर व्यावसायिक राजकारणी लोक वापरून त्या स्त्रीपुरुषांना निवडून आणत असतात. संघराज्याप्रमाणे संस्थानांचे अनेकविध

अधिकारी व काही ठिकाणी तर न्यायाधीश यांच्या निवडणुकांसाठी मतदाराला मतदान करावे लागत असते हे लक्षात घेतले म्हणजे तो सार्वजनिक आणि राजकीय जीवनातील गुंतागडबडीला कंटाळून त्या सगळ्यांच्याकडे तिरस्काराने नजर टाकीत दूर पळून जाऊ लागतो याचे आश्चर्य वाटणार नाही.

जर एकदोनच जणांची निवड करायची असली तर परिणामांबद्दल आणि त्यांच्या हाताखाली काम करणारांच्या वर्तणुकीबद्दलसुद्धा निवडून दिलेल्या व्यक्तींना मतदार कठोरपणे जाब विचारू शकतो. पण तो जर सर्वांचीच निवड करीत असला तर कोणीही कशासाठीही जबाबदार राहात नाही.

-- ९ --

जगातल्या सगळ्यात मोठ्या राष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या प्रातिनिधिक लोकशाहीचे मूळ नमुने ब्रिटिश व अमेरिकन या पद्धतीच होत, त्यांच्यात काही दोष आहेत ही गोष्ट अलाहिदा. त्यांचे काही दोष कृत्रिम आहेत; अनुभव आणि सुव्यवस्थापन यांच्या साहाय्याने ते दूर करणे शक्य आहे. बाकीचे दोष म्हणजे मनुष्यस्वभावातीलच अंगभूत उणीवा होत; त्यांची नीट जाणीव करून घेतली तर त्यांच्याविरुद्ध खबरदारी घेणे शक्य आहे. लोकशाहीच्या भविष्यकालीन प्रयोगात या दोन लोकशाह्या कशा प्रकारे कामकाज चालवितात एवढेच पाहून भागणार नाही, त्यात सुधारणा व बदल करण्याचा प्रयत्न करूनच वेगळ्या वातावरणात व परिस्थितीत त्यांचा अवलंब करणे उचित ठरेल.

# नवी राष्ट्रे

नव्या राष्ट्रांपैकी बहुतेकांना असे वाटते की लोकशाहीचे आपले प्रकार त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीला लागू पडणारे नाहीत. त्यांनी आपले अनुकरण करावे हा आपणा पाश्चात्यांच्या संकुचित प्रांतीयवादाचा पुरावा होय असेही त्यांचे मत आहे. काही काळ हे चालणार हे मान्यच केले पाहिजे; पण सुरुवातीचे क्लेशकारक प्रश्न सुटले (उदा० सर्व नागरिकांना पुरेसे खायला मिळणे) की आधी वर्णन केलेली माणसाची स्वातंत्र्याविषयीची सनातन ऊर्मि या नव्या राष्ट्रातसुद्धा प्रकट होऊ लागेल. कम्युनिझम किंवा सरकारच्या काही नव्या प्रकारांनी ही स्वातंत्र्ये दिली तर ठीक, नाहीतर ते लोक पाश्चात्यांच्या पद्धतीकडेच वळू लागतील.

साम्राज्यवादाच्या काही अनियोजित परिणामांपैकी एक असा की संबंध जगाची एकच सामाजिक-आर्थिक पेठ निर्माण झाली. मानवाच्या विकासातील ही अगदी नवी अवस्था आहे. तिची सुरुवात साम्राज्यवाद जेव्हा सर्वात जास्त आक्रमक होता त्या १८८५ सालापासून झाली. औद्योगिक जाळे बनलेल्या पश्चिम युरोपशी सर्व जग कच्च्या मालाचा व श्रमशक्तीचा पुरवठा करणे आणि स्वस्त तयार मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे यामुळे बांधले गेले. साम्राज्यवादाने सुरू केलेली प्रक्रिया दुसऱ्या महायुद्धाने पूर्ण केली; तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सर्व जग जवळ आले आणि त्याचबरोबर परस्पर विद्वेषाची बीजे पेरली गेली. एकमेकांना अपरिचित असलेली व वेगवेगळ्या भाषा बोलणारी माणसे राहात असलेल्या छोट्याशा खेड्याचे स्वरूप आज आपल्या ग्रहाला (पृथ्वीला) प्राप्त झाले आहे. नव्या राष्ट्रांच्यापुढील सरकार चालविण्याचे काही प्रश्न व त्यांची तात्पुरती उत्तरे यांची चर्चा ही या पार्श्वभूमीवर पुढे केली आहे.

## -- २ --

अमुक एक प्रकारचे सरकार स्वतःच्या अंगभूत गुणांमुळे सर्वश्रेष्ठ असते असे मानणे चूक असल्याचे मेकॉलेने आग्रहाने म्हटले आहे. त्याच्या दृष्टीने सर्वात जास्त सुरळीतपणे कुठली पद्धती चालू शकेल हे प्रयोगानेच ठरत असते. कुठले प्रकार वापरले

जातात हे भोवतालच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. हे खरे असेल तर आतापर्यंत इतरांना अज्ञात असलेल्या आपल्या परिस्थितीला अनुरूप पण इतरांना ज्यांची कल्पनाही करता आलेली नाही अशा पद्धती रूढ करून आफ्रिकन राष्ट्रे आपल्याला आश्चर्याचा धक्का देऊ शकतील.

आफ्रिकन जमातींना त्यांच्या विजेत्यांनी कृत्रिम सरहद्दी दिल्या आहेत. त्यांच्यातल्या अगदी मूठभर लोकांच्या दोन तीन पिढ्या परकीय भाषा आणि सरकार व राज्यकारभाराच्या परकीय पद्धती यांच्याशी अवगत झाल्या नाहीत तोच त्या विजेत्यांनी आपले चंबुगवाळे गुंडाळले. परंपरागत प्रदेशांचा विचार केला तर ही नवीन राष्ट्रे अगदीच आकारहीन आहेत. त्यांचे जुने रीतिरिवाज अर्धे अधिक विसरले गेले आहेत, तर नवे रीतिरिवाज अर्धवटपणे रूढ झाले आहेत. ' एक मेलेले व दुसरे जन्माला यायलादेखील असमर्थ अशा दोन जगांच्या दरम्यान ' ते घुटमळताहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते अतिशय गरीब आहेत आणि पाश्चात्यांच्याविषयी त्यांच्या मनात जबरदस्त संशय आहे.

त्यांचे पहिले उद्दिष्ट भुकेपासून किंवा गरजेपासून स्वातंत्र्य मिळविणे हे असले पाहिजे. त्यासाठी विस्तृत प्रमाणावरील संघटनेची गरज आहे, व त्यादृष्टीने संपन्न राष्ट्रे त्यांना मदतीचा हात देऊ शकतात. पण आपण पाश्चात्यांनी हे जरा नाजुकपणे केले पाहिजे. आज घडीला आपण कुणाला ' कसे काय, ठीक आहे ना ? ' असे म्हटले तरी लगेच आपल्यावर नवसाम्राज्यवादाचा आरोप येतो, आणि त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. पण हे भयानक दारिद्र्य एकदाचे दूर – किंवा कमी केले म्हणजे पुढे काय ? अधिकारशाही व एकपक्षीय सरकार हाच प्रकार बहुतेक राष्ट्रात रूढ होणार असे दिसू लागले आहे.

बहुतेक आफ्रिकनांच्या दृष्टीने साम्राज्यवादाचा संबंध जुन्या भांडवलशाहीशी आणि पाश्चात्य लोकशाहीशी आहे. त्यामुळे नव्याने मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा संबंध रशिया किंवा चीनच्या ' लोकांच्या लोकशाही 'शी जोडला जातो. ज्यांना शून्यापासून सुरुवात करायची आहे त्यांना रशियाचे यश म्हणजे एक चमत्कार वाटतो. लाकडी नांगर व परदेशी भांडवलदारांनी सुरू केलेले मोजके उद्योग यांच्यापासून सुरुवात करून एक देश अवघ्या अठ्ठेचाळीस वर्षात जगातले एक सामर्थ्यशाली राष्ट्र बनते आणि ते अवकाशात फेरफटका मारायला माणूस पाठविण्याच्या बाबतीत सर्व जगावर मात करते हे पाहून अचंबा वाटला नाही तरच आश्चर्य !

चालू घटकेला आफ्रिकनांबरोबर आपल्याला जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या स्वातंत्र्याविषयी बोलण्यात काही अर्थ नाही. जलद गतीने आधुनिकीकरण घडवून आणण्याच्या उद्दिष्टाला बांधलेला एक पक्ष व सामर्थ्यशाली केंद्रीय सरकार याची आज त्यांना

सर्वांत जास्त गरज आहे. हे आज रशिया व चीनमध्ये असल्याचे त्यांना दिसते. कम्युनिझमला युरोपीय वैशिष्ट्यापासून मुक्त करून चीनने त्याला कामगारांच्या ऐवजी शेतकऱ्यांच्या क्रांतिकारक चळवळीचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. चीनला आपला शेतीउत्पादनाचा प्रश्न सोडविता आला नाही ही गौण बाब होय; शून्यापासून सुरुवात करून त्यानेही अणुबॉंब बनविला हे जास्त महत्त्वाचे आहे! पाश्चात्यांना मागे टाकणाऱ्या कुठल्याही गोष्टीचे आतापर्यंत सुखसोयी-सवलतींपासून वंचित राहिलेल्या या लोकांना सादर कौतुक वाटत राहणार हे आपण गृहीतच धरले पाहिजे.

फ्रेंच वेस्ट आफ्रिकेतील सेको तोरे याला कटु भूतकाळाची अगदी शेवटची निशाणी गाडून टाकण्यासाठी वर्गसंघर्ष तीव्रपणे चालविणे हाच त्याच्या लोकांच्या दृष्टीने योग्य व समाधानकारक उपाय वाटतो. त्याने एके ठिकाणी लिहिले आहे, "स्वातंत्र्य मिळून अठरा वर्षे झाली तरी लढ्याच्या अवघड अवस्थेतच आम्ही गुरफटलेले आहोत, कारण क्रांतिकारक चळवळ कशासाठी चालवायची, घातपात कशासाठी करायचा, त्यामागे प्रेरणा कोणती हे तितकेसे स्थूलपणे स्पष्ट नाही. बेकायदेशीर साम्राज्यशाही राजवटीने ज्यांना विशेष सवलती व अधिकार दिले होते त्या प्रतिगाम्यांच्याकडून अधिकार काढून घेतले असले तरी त्यांनी "मैत्री"चा मुखवटा धारण करून "सहानुभूतिपूर्ण" वर्तन करायला सुरुवात केली आहे, त्यांची उद्दिष्टे मात्र अद्यापही घातकच आहेत यात शंका नाही... लोकांची देशभक्तीची सद्भावना चेतवून आपण आपली चळवळ जोराने चालविली पाहिजे."

हे सर्व परिचित असल्यासारखे वाटते, आणि विशेष गंमत अशी की सेको तोरेच्या देशात "देशभक्तीची सद्भावना" यासारखी एखादी वस्तु आहे की नाही आपल्याला माहीत नाही. रशियन लोक इतिहासाला परिचित आहेत, आणि चिनी लोक तर इतिहासाला माहीत असलेले सर्वांत प्राचीन लोक आहेत; पण फ्रेंच वेस्ट आफ्रिका हे केवळ भौगोलिक नामाभिधान वाटते. एकात्मता टिकविण्यासाठी सुदैवाने एखादा ऐतिहासिक आधार त्यांच्याजवळ असला तर ठीक, नाही तर कांगोसारखी 'क्रांतीसाठी क्रांति' अशी त्यांची गत व्हायची. केवळ स्वातंत्र्य मिळाल्याने राष्ट्राची उभारणी होत नाही.

आपण एक आहोत ही भावना कशामुळे असते याचे अतिशय चांगले वर्णन ब्रह्मदेशाच्या ऑंग सानने केले होते: "वांशिक मूळ वेगवेगळे का असेना, बराच काळ एकमेकांच्या संनिध राहण्याने, समान आवडी व आशा आकांक्षा असण्याने, सुखदुःखात सहभागी झाल्याने, व आपण एक आहोत अशी भावना निर्माण झाल्याने लोकसमूहाला राष्ट्र ही पदवी प्राप्त होत असते. वंश, धर्म, भाषा हे घटक महत्त्वाचे असले तरी आनंदाच्या किंवा संकटाच्या प्रसंगी एकत्र राहण्याची

परंपरागत इच्छा व मनाची तयारी यामुळे माणसात अनुबंध निर्माण होतात, त्यांचे राष्ट्र बनते आणि त्यांच्या चिन्मय भावनेला देशभक्तीचे स्वरूप प्राप्त होते."

हे वर्णन उत्कृष्ट आहे, पण एकेकाळी वसाहती असलेल्या आफ्रिकेतील अस्वाभाविक तुकड्यांना ते कितपत लागू पडते ? धर्म, इतिहास आणि हितसंबंध यामुळे विविध सरहद्दींना छेदून जाणारी एकतेची भावना काही ठिकाणी आहे तर काही ठिकाणी एकाच सीमेच्या आत या घटकांमुळे समाज विभागले–दुभंगलेले आहेत. पॅनआफ्रिकॅनिझम ( 'सर्व आफ्रिका एक आहे' ) या घोषणेची गरज का आहे हे त्यामुळे लक्षात येते. भूतपूर्व वसाहतींचे एकक इतके अलीकडे जन्माला आले आहेत ( आणि बहुतेकांचा भूतकाळात इतिहासात गडप झालेला किंवा इतका गोंधळलेला आहे ) की ऑग सानच्या निकषावर घासले असता ते राष्ट्र या पदवीला पात्र ठरत नाहीत. त्या सर्वांना एकच गोष्ट समान आहे : साम्राज्यवादाविरुद्धचा झगडा ( युरोपियन कायदा, राज्यकारभाराची पद्धति व लोकशाही प्रकार यांचाही वारसा त्यांना मिळालेला आहे; पण सध्या तरी तो नाकारण्यावरच त्यांचा भर आहे. )

अलीकडे ब-याच पॅनआफ्रिकन परिषदा व संमेलने भरत असल्याचे आपण पाहतो; आफ्रिकन साहित्य अस्तित्वात आले आहे आणि भूतकालातील संस्कृतीशी संबंध जोडण्याचा त्याचा प्रयत्न चालला आहे. त्यामुळे संघराज्यात्मक संघ स्थापन करण्याला पुरेसा पाया उपलब्ध होऊ शकेल. कदाचित् युद्ध किंवा राजनैतिक वाटाघाटींच्या मार्गांनी आजच्या राष्ट्रांना आपल्या सरहद्दी परत आखाव्या लागतील. काहीहि असले तरी भाषण व एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य यांच्या माहात्म्याची चर्चा करण्याची ही वेळ नव्हे. काही कालावधीनंतरच ते त्या अवस्थेला पोहोचतील. कितीही वेळा आणि कितीही काळपर्यंत स्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आली तरी शेवटी लोक त्यांच्या शोधाला लागतातच. युक्तिवादासाठी वेळ खर्चणे किंवा विरोधाला परवानगी देणे आफ्रिकनांना आज तरी रुचत नाही. कारण त्यांना घाई झाली आहे. आणि थोर अभिजात स्वातंत्र्यांचा उगम पश्चिमेत झाला असल्याने त्यांच्याबद्दल एवढ्यात फारसे आकर्षण वाटणेही शक्य नाही.

## -- ३ --

या पुस्तकात मेकॉलेच्या नेमके उलट आपण असे गृहीत धरले आहे की सरकारचे स्वरूप सर्वस्वी भोवतालच्या वातावरणावर अवलंबून नसते, त्याबाबत निवड

करण्याला माणसाला बराच वाव असतो. वस्तुतः आपण तर असेच गृहीत धरत आहोत की राजकीय सत्तेचा काही अंश हा मुळी (लोकांच्या) इच्छेतच सामावलेला असतो, भूक किंवा अज्ञानामुळे देखील हुकूमशहाच्या हातातील बाहुले बनण्याचे दैवगतीने त्यांच्या नशिबातच लिहून ठेवले आहे असे मुळीच नाही. लोक काय व कसा विचार करतात यावर त्यांची कृती अवलंबून असते. सर्वसाधारण माणूस काय विचार करतो याला भोवतालची सामाजिक व आर्थिक परिस्थिती कारणीभूत असते; पण सर्वस्वी नव्हे. आणि नेत्यांच्या माणसांपैकी जे उद्याची स्वप्ने पाहतात, भविष्य तरी अधिक चांगले असावे अशी मागणी करतात आणि क्रान्त्या घडवून आणतात अशी मंडळी यांचे बाबतीत स्वतंत्र विचाराचे क्षेत्र विस्तारत जाते. विशिष्ट स्थलकालाच्या चौकटीत व्यवहार्य असलेल्या सरकारच्या प्रकारांपैकी कुठला पसंत आहे याची विवेकपूर्ण निवड करण्याला ते आपल्या शेजाऱ्यांना उद्युक्त करतात. हे जर मान्य असेल तर आफ्रिकेतील नव्या देशांच्या दृष्टीने कोणते प्रकार अव्यवहार्य आहेत ? की त्यांना निवड करण्याचे स्वातंत्र्य (परिस्थितीच्या बंधनामुळे) राहिलेलेच नाही ?

सध्या तरी असे दिसते की ज्यातून निवड करायची अशा प्रकारांतून त्यांनी प्रातिनिधिक लोकशाहीला वगळले आहे. लोकांना ती समजत नाही आणि नेत्यांना ती नको आहे. त्यांचे म्हणणे असे की त्यांच्यासमोर कामाचे डोंगर उभे आहेत, त्यामुळे आपल्या दीर्घसूत्री पद्धतींविषयी विचार करणे त्यांना शक्य नाही. त्यांच्या मते त्यांचे लोक अशिक्षित असल्याने दीर्घकालीन नियोजन व उभारणी यात सहभागी होणे त्यांना जमणार नाही; काय करायचे व काय करायचे नाही एवढेच फक्त लोकांना सांगितले पाहिजे. त्यांना वाटते की विभूतिपूजा व प्रचाराचा सतत उपयोग यांची सध्या गरज आहे, कारण मतभेदामुळे उशीर होतो व तडजोड करावी लागते, आणि यापैकी कशातही वेळ दवडायला त्यांची तयारी नाही. त्यांचे म्हणणे की प्रशिक्षित लोकांचा इतका तुटवडा आहे की सरकार चालवण्यासाठी आवश्यक तेवढी माणसे मिळणे जेथे कठीण, तेथे आवश्यक नसलेल्या विरोधी पक्षासाठी कोठून माणसे आणायची ?

त्यांचे म्हणणे की फक्त 'लोकांची लोकशाही'च त्यांच्या लोकांच्या गरजा पूर्ण करू शकेल; व तसले सरकार बनवायला अशा नेत्यांची गरज आहे. ज्यांना लोकांचे हित कशात आहे हे कळते, भरधाव वाटचाल करण्यासाठी आवश्यक तेवढे जे निष्ठुर आहेत, आणि अखंड चालणाऱ्या चर्चेच्या साहाय्याने चालणाऱ्या सरकारसाठी ज्यांच्याजवळ धीर नाही. त्यांचे म्हणणे की त्यांच्या (ज्यांना तुरुंगात डांबून ठेवावे लागते अशा मोजके पाश्चात्यविद्याविभूषित उदारमतवादी लोकांचा अपवाद करून

बाकी सर्व ) लोकांना एक-पक्ष पद्धतीच पसंत आहे; आणि जर त्यांना स्वतःलाच निर्णय घ्यायला लावले तर ते अस्वस्थ होतील. ते दाखवून देतात की जेव्हा आयव्हरी कोस्टमध्ये 'स्वतंत्र निवडणुका' घेण्यात आल्या होत्या त्यावेळी सर्व जागा हौ फोट – बौनीच्या पक्षानेच जिंकल्या होत्या; टांगानिकात निवडणुका झाल्या तेव्हा एकाहत्तरपैकी सत्तर जागा न्येरेरेच्या पक्षाने जिंकल्या होत्या; सेनेगलमध्ये सर्व जागा सेंघॉरच्या पक्षाने जिंकल्या; आणि आक्रामधील क्वामेन क्रूमाच्या मतदार-संघात त्याला २३,१२२ पैकी २२,७८० मते मिळाली होती.

या सर्व मंडळींपैकी सर्वात कमी कट्टर व जास्त उदारमतवादी असलेल्या न्येरेरेच्या मते आज घडीला टांझानियात संसदीय लोकशाही चालणे अशक्य आहे.[१] काहीशा भाबडेपणाने तो पुढे म्हणतो, "सरकारला विरोध करण्यासाठी सुसंघटित पक्ष असणे लोक-शाहीत आवश्यक असते ही कल्पना खोटी आहे. लोकशाहीत फक्त अशा विरोधाला स्वातंत्र्य असण्याची गरज आहे, प्रत्यक्षात तसा विरोध असलाच पाहिजे असे नाही." याचा अर्थ असा की टांझानिया हे जगातले असे एकमेव ठिकाण आहे जेथील सर्व लोक एकाच पद्धतीने विचार करतील असे वरदान त्यांना मिळाले आहे– किंवा जगा-तल्या कुठल्याच माणसाला न जमलेली अशी एक विलक्षण हातोटी न्येरेरेला साधली आहे की त्याच्याशी कोणाचा मतभेदच होत नाही.

लोकशाहीची गरज नाही असे सांगण्यासाठी वरीलप्रमाणे जी कारणे देण्यात येतात किंवा लोकशाहीवर जे आक्षेप घेतले जातात त्यांचे अंशतः तरी खंडन करणे निश्चितच शक्य आहे. पण तरीही अविश्वास कायम रहाणारच. आपण आपली नम्रता टिकवून वेळ काढलेला बरा; कारण आक्षेपांपेक्षा त्यांच्यामागील हेतु अधिक भरीव आहेत. साम्राज्यवादामुळे पाश्चात्यांविषयी निर्माण झालेल्या द्वेषापैकी शिल्लक राहिलेला भाग हे पहिले कारण. आपण कोणते फायदे करून दिले हे सांगणे निरर्थक आहे, कायद्याचे राज्य स्थापन केले अशी प्रौढी मारणे व्यर्थ आहे. सध्याचा काळ सूड घेण्याचा आहे, आणि दया दाखविली जाण्याची कितीही नेमस्त कारणे सांगितली तरी त्यांचा उपयोग होणार नाही.

दुसरे कारण असे की स्वातंत्र्य-चळवळीच्या नेत्यांना आपल्या कामाला ( ! ) चिकटून रहायचे आहे. आपण एका गृहीतकृत्यापासून स्वतःची सुटका करून घेतली पाहिजे की सत्तेची नशा फक्त गोऱ्या माणसालाच चढते. स्वातंत्र्य चळवळीचे नेते हे बहुतेक काळ भडकेल नेते, जोरदार वक्ते आणि जन्मजात क्रांतिकारक या रूपात वावरत

---

१ टांगानिका व झांझीबार यांचे मिळून 'टांझानिया' या नावाने १९६४ च्या एप्रिलमध्ये एक संघराज्य बनले.

होते. असे लोक बहुधा क्रांतीच्या ज्वाळांत बळी जात असतात. पण आफ्रिकेतील परिवर्तन इतक्या झटकन व इतक्या शांततापूर्ण रीतीने झाले की त्यामुळे तेथील सेंट-जस्ट व रॉबेस्पेर यांचा अन्त्य झाला : गोल्डकोस्टचे रूपांतर स्वतंत्र घानात १९५७ मध्ये झाले, आणि आजपावेतो, म्हणजे अवघ्या आठ वर्षात साम्राज्य विसर्जनाची ही प्रक्रिया पूर्ण झाली.[1] त्यामुळे क्रांती होऊनही क्रांतिकारक जिवंत राहिले आहेत; पण स्वभावाने ते अग्निभक्षक आहेत, त्यामुळे ते सत्तेपासून बाजूला हटायला तयार नाहीत, नाही तर उदारमतवादी लोक लोकशाही स्थापन करतील. विरोधाभास असा की साम्राज्यवाद्यांसारखेच त्यांचेही मत आहे : हे लोक 'स्वराज्य' चालवायला अद्याप लायक नाहीत. त्यांच्यापैकी प्रत्येकाचे असे मत आहे की ( आणि रॉबेस्पेरचेही तेच होते ) त्यांच्या आश्रयापासून दूर जायला जमाव अद्याप लायक नाही.

लोकांना जेव्हा मतदानाचा हक्क मिळतो आणि कुणाला निवडायचे याविषयी पूर्ण स्वातंत्र्य मिळते त्याचवेळी राज्यकर्त्यांवर नियंत्रण कसे ठेवायचे याचे मार्ग व उपाय ते शोधून काढू शकतात. अमेरिकन निग्रोला हे कठीण सत्य शोधायला दिव्यातून जावे लागले, कालांतराने आफ्रिकन निग्रोही ते शोधून काढीलच. आपल्या प्रतिनिधींमार्फत राज्यकर्त्यांना दररोज जाब विचारण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत कुठलाही वर्ग, कुठलाही नेता किंवा कुठलाही राजकीय पक्ष लोकहितास्तव राज्यकारभार चालवील यावर विश्वास ठेवणे शक्य नाही.

नवसाम्राज्यवादाविरुद्ध सध्या चाललेल्या आरडाओरडीत लोकशाहीवरील आक्षेपांमागची ही दोन्ही कारणे उघडपणे दिसतात. पाश्चात्य देशांच्या सरकारांकडून धनाढ्य व सामर्थ्यशाली खाजगी भांडवलदाराकडून दिल्या जाणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील आर्थिक मदतीमागे अन्य देशात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा कुटिल डाव आहे असेच गृहीत धरले जाते. मिळणारी मदत कशी वापरावी याबाबत दिल्या जाणाऱ्या सल्ल्याकडे संशयी नजरेने पाहिले जाते आणि बहुधा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पाश्चात्यांचा तिरस्कार करणाऱ्या व भविष्यकाळातील आशाऐवजी भूतकाळातील वैरभाव कुरवाळीत बसणाऱ्या लोकांना त्यामुळे समाधान मिळते. त्यामुळे सुबत्ताही लांबणीवर टाकली जाते, अग्निभक्षक नेत्यांना तक्रारी करण्यासारखी भरपूर कारणे शिल्लक राहतात, आणि उदारमतवाद्यांना सुचवण्यासारखे फारसे काहीही राहात नाही.

---

१ येथे दक्षिण आफ्रिकेला वगळले आहे. कारण गोरे लोक व बांटु लोक तेथे एकाच वेळी पोहोचले. म्हणून साम्राज्यशाही गुलामगिरीच्या आकृतिबंधात तो देश बसत नाही.

वस्तुतः लोकशाही राज्यपद्धती असेल तर परदेशी भांडवलदारांना देशावर हळु-हळू का होईना पण कब्जा मिळविणे अशक्य असते. युनायटेड स्टेट्स हे त्या दृष्टीने एक चांगले उदाहरण आहे. यादवी युद्धानंतर रेल्वेबांधणीच्या कार्यक्रमाला एकदम उधाण आले, त्यामुळे ब्रिटिश व फ्रेंच भांडवल फार मोठया प्रमाणावर आकर्षित झाले. अमेरिका हे इतिहासातले सर्वात मोठे ऋणको राष्ट्र बनले, आणि तरीही त्याचे धनको देश त्याच्यावर कब्जा बसवू शकले नाहीत. रहस्यकथेचे सुख थोडेसे चाखण्यासाठी आपण अशी कल्पना करू या की ब्रिटन, फ्रान्स व युनायटेड स्टेट्स यांच्यातील धनाढय लोकांनी त्या नव्या राष्ट्राला आंतरराष्ट्रीय पुंजीपतींच्या हातातले बाहुले बनवायचा कट केला असता, तरी लोकशाही व्यवहारामुळे तो मोडूनच पडला असता. इतकी रसभरित घटना अंधाऱ्या रात्रीत चटकन उरकता येणे शक्य नाही. कार्यकारी-मंडळ त्या कटात सामील झाले असे गृहीत धरले तरी जोपर्यंत विश्वस्त मंडळी किंवा रखवालदार आपले कर्तव्य बजावीत आहेत तोपर्यंत तसला कट यशस्वी होणे अशक्य आहे. (युनायटेड स्टेट्स अडचणीत सापडले ते नेमके जगातले सर्वात मोठे धनको बनले त्यावेळी. त्याच्या विश्वस्तांना हे लक्षात आले नाही की प्रचंड प्रमाणावरील आंतर-राष्ट्रीय कर्जांची परतफेड नोटानाण्यांनी नव्हे तर वस्तु व सेवांच्या रूपानेच होणे शक्य असते. त्यामुळे आयातव्यापारावरील निर्बंधांनी त्याची धोरणे असफल होत गेली.)

## – ४ –

लोकशाहीत विरोधी पक्षाला स्वातंत्र्य असावे, पण तसा पक्ष असलाच पाहिजे अशी काही गरज नाही हे न्येरेरेचे म्हणणे चूक आहे असे आपण सूचित केले. मात्र हे खरे की विरोधी पक्ष नसतानासुद्धा अतिशय सुधारलेला प्रातिनिधिक सरकारचा प्रकार स्वित्झर्लंडमध्ये अस्तित्वात आहे. तेथे कार्यकारीमंडळाची निवड विधिमंडळाप्रमाणेच तीन वर्षांसाठी होते आणि विधिमंडळात पक्षोपपक्षांचे बलाबल व परस्परसंबंध काय आहेत याचा परिणाम होऊ न देताच कार्यकारी मंडळाचे काम चाललेले असते. कायद्यांचे मसुदे कार्यकारी मंडळ तयार करते आणि दोन सभागृहे असलेल्या विधिमंडळापुढे त्यांचे समर्थन करते. पण विधिमंडळात त्यात भरमसाट बदल केले किंवा ते फेटाळून लावले तरीही कार्यकारीमंडळ बरखास्त होत नाही. देशातल्या प्रमुख पक्षांचे प्रतिनिधि विधिमंडळ व कार्यकारी मंडळ दोन्हीत असतात. अविश्वासाच्या ठरावाच्या

होते. असे लोक बहुधा क्रांतीच्या ज्वाळांत बळी जात असतात. पण आफ्रिकेतील परिवर्तन इतक्या झटकन व इतक्या शांततापूर्ण रीतीने झाले की त्यामुळे तेथील सेंट-जस्ट व रॉबेस्पेर यांचा बचाव झाला : गोल्डकोस्टचे रूपांतर स्वतंत्र घानात १९५७ मध्ये झाले, आणि आजपावेतो, म्हणजे अवघ्या आठ वर्षांत साम्राज्य विसर्जनाची ही प्रक्रिया पूर्ण झाली.[1] त्यामुळे क्रांती होऊनही क्रांतिकारक जिवंत राहिले आहेत; पण स्वभावाने ते अग्निभक्षक आहेत, त्यामुळे ते सत्तेपासून बाजूला हटायला तयार नाहीत, नाही तर उदारमतवादी लोक लोकशाही स्थापन करतील. विरोधाभास असा की साम्राज्यवाद्यांसारखेच त्यांचेही मत आहे : हे लोक 'स्वराज्य' चालवायला अद्याप लायक नाहीत. त्यांच्यापैकी प्रत्येकाचे असे मत आहे की ( आणि रॉबेस्पेरचेही तेच होते ) त्यांच्या आश्रयापासून दूर जायला जमाव अद्याप लायक नाही.

लोकांना जेव्हा मतदानाचा हक्क मिळतो आणि कुणाला निवडायचे याविषयी पूर्ण स्वातंत्र्य मिळते त्याचवेळी राज्यकर्त्यांवर नियंत्रण कसे ठेवायचे याचे मार्ग व उपाय ते शोधून काढू शकतात. अमेरिकन निग्रोला हे कठीण सत्य शोधायला दिव्यातून जावे लागले, कालांतराने आफ्रिकन निग्रोही ते शोधून काढीलच. आपल्या प्रतिनिधींमार्फत राज्यकर्त्यांना दररोज जाब विचारण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत कुठलाही वर्ग, कुठलाही नेता किंवा कुठलाही राजकीय पक्ष लोकहितास्तव राज्यकारभार चालवील यावर विश्वास ठेवणे शक्य नाही.

नवसाम्राज्यवादाविरुद्ध सध्या चाललेल्या आरडाओरडीत लोकशाहीवरील आक्षेपांमागची ही दोन्ही कारणे उघडपणे दिसतात. पाश्चात्य देशांच्या सरकारांकडून धनाढ्य व सामर्थ्यशाली खाजगी भांडवलदाराकडून दिल्या जाणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील आर्थिक मदतीमागे अन्य देशात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा कुटिल डाव आहे असेच गृहीत धरले जाते. मिळणारी मदत कशी वापरावी याबाबत दिल्या जाणाऱ्या सल्ल्याकडे संशयी नजरेने पाहिले जाते आणि बहुधा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पाश्चात्यांचा तिरस्कार करणाऱ्या व भविष्यकाळातील आशाऐवजी भूतकाळातील वैरभाव कुरवाळीत बसणाऱ्या लोकांना त्यामुळे समाधान मिळते. त्यामुळे सुबत्ताही लांबणीवर टाकली जाते, अग्निभक्षक नेत्यांना तक्रारी करण्यासारखी भरपूर कारणे शिल्लक राहतात, आणि उदारमतवाद्यांना सुचवण्यासारखे फारसे काहीही राहात नाही.

---

१ येथे दक्षिण आफ्रिकेला वगळले आहे. कारण गोरे लोक व बांटु लोक तेथे एकाच वेळी पोहोचले. म्हणून साम्राज्यशाही गुलामगिरीच्या आक्रांतिबंधात तो देश बसत नाही.

वस्तुतः लोकशाही राज्यपद्धती असेल तर परदेशी भांडवलदारांना देशावर हळु-हळू का होईना पण कब्जा मिळविणे अशक्य असते. युनायटेड स्टेट्स हे त्या दृष्टीने एक चांगले उदाहरण आहे. यादवी युद्धानंतर रेल्वेबांधणीच्या कार्यक्रमाला एकदम उधाण आले, त्यामुळे ब्रिटिश व फ्रेंच भांडवल फार मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाले. अमेरिका हे इतिहासातले सर्वात मोठे ऋणको राष्ट्र बनले, आणि तरीही त्याचे धनको देश त्याच्यावर कब्जा बसवू शकले नाहीत. रहस्यकथेचे सुख थोडेसे चाखण्या-साठी आपण अशी कल्पना करू या की ब्रिटन, फरान्स व युनायटेड स्टेट्स यांच्या-तील धनाढ्य लोकांनी त्या नव्या राष्ट्राला आंतरराष्ट्रीय पुंजीपतींच्या हातातले बाहुले बनवायचा कट केला असता, तरी लोकशाही व्यवहारामुळे तो मोडूनच पडला असता. इतकी रसभरित घटना अंधाऱ्या रात्रीत चटकन उरकता येणे शक्य नाही. कार्यकारी-मंडळ त्या कटात सामील झाले असे गृहीत धरले तरी जोपर्यंत विश्वस्त मंडळी किंवा रखवालदार आपले कर्तव्य बजावीत आहेत तोपर्यंत तसला कट यशस्वी होणे अशक्य आहे. (युनायटेड स्टेट्स अडचणीत सापडले ते नेमके जगातले सर्वात मोठे धनको बनले त्यावेळी. त्याच्या विश्वस्तांना हे लक्षात आले नाही की प्रचंड प्रमाणावरील आंतर-राष्ट्रीय कर्जांची परतफेड नोटानाण्यांनी नव्हे तर वस्तु व सेवांच्या रूपानेच होणे शक्य असते. त्यामुळे आयातव्यापारावरील निर्बंधांनी त्याची धोरणे असफल होत गेली.)

## — ४ —

लोकशाहीत विरोधी पक्षाला स्वातंत्र्य असावे, पण तसा पक्ष असलाच पाहिजे अशी काही गरज नाही हे न्येरेरेचे म्हणणे चूक आहे असे आपण सूचित केले. मात्र हे खरे की विरोधी पक्ष नसतानासुद्धा अतिशय सुधारलेला प्रातिनिधिक सरकारचा प्रकार स्वित्झर्लंडमध्ये अस्तित्वात आहे. तेथे कार्यकारीमंडळाची निवड विधिमंडळाप्रमाणेच तीन वर्षांसाठी होते आणि विधिमंडळात पक्षोपपक्षांचे बलाबल व परस्परसंबंध काय आहेत याचा परिणाम होऊ न देताच कार्यकारी मंडळाचे काम चाललेले असते. काय-द्यांचे मसुदे कार्यकारी मंडळ तयार करते आणि दोन सभागृहे असलेल्या विधिमंडळा-पुढे त्यांचे समर्थन करते. पण विधिमंडळात त्यात भरमसाट बदल केले किंवा ते फेटाळून लावले तरीही कार्यकारीमंडळ बरखास्त होत नाही. देशातल्या प्रमुख पक्षांचे प्रतिनिधि विधिमंडळ व कार्यकारी मंडळ दोन्हीत असतात. अविश्वासाच्या ठरावाच्या

साहाय्याने कार्यकारी मंडळाचा पराभव करता येत नसल्याने, व विधिमंडळ आणि कार्यकारीमंडळ एकमेकांच्या समोर येत असल्याने बहुमतवाल्या पक्षाला बदनाम करून त्याच्यावर मात करण्याऐवजी कायद्याचा मसुदा किंवा प्रास्ताविक उपाययोजना यात जास्तीत जास्त सुधारणा व्हावी अशा रीतीने प्रखर टीका प्रतिटीका होत राहते. (दोन्ही सभागृहांनी मिळून एका वर्षासाठी निवडलेला राष्ट्राध्यक्ष हा समितीच्या सभापतीप्रमाणे काम करतो.)

आपापल्या कल्पना–कार्यक्रमांसाठी स्विस पक्ष जनतेत प्रभावी चळवळी चालवतात. प्रत्येक कायद्याबाबत किंवा उपाययोजनेबाबत पक्षांची एकमेकांबरोबरील हातमिळवणी (अलाईनमेंट) बदलत असते. कुठलाही पक्ष आपल्याला पाहिजे असलेल्या विषयावर कार्यकारी मंडळाने मसुदा तयार करून त्यावर चर्चा घडवून आणावी असे सुचवू शकतो. सर्वसाधारणपणे कार्यकारी मंडळ आपण करणार असलेली उपाययोजना भरपूर आधी प्रसिद्ध करते, त्यामुळे संबंधित पक्ष व गट त्यावर चर्चा करू शकतात, अंतिम मसुदा तयार होण्यापूर्वी सर्व बाजूंनी होणारी टीका ऐकली जाऊ शकते ब्रिटनप्रमाणे विरोधाला औपचारिक स्वरूप नसले तरी त्याला पूर्ण वाव असतो आणि तो प्रभावीही असतो.

संघराज्यात्मक विधिमंडळात भाषण करण्याचा कार्यकारीमंडळाच्या सदस्यांना हक्क आहे, पण मतदानाचा नाही. १८४८ सालच्या घटनेनुसार कायद्यांचे किंवा ठरावांचे मसुदे सादर करण्याबरोबरच 'महासंघाचा आयव्यय चालविणे, अंदाजपत्रक मांडणे आणि जमाखर्चाचे हिशोब सादर करणे' हीही कार्यकारी मंडळाची नेमून दिलेली कामे होत. अशा पद्धतीत अधिकृत विरोधी पक्षाची गरज नाही; आणि तरीही सार्वजनिक व्यवहार, व्यवहारदक्ष पद्धतीने, कार्यक्षम रीतीने व विनाविलंब चालविता येतात. या राज्यघटनेच्या स्वीकृतीपूर्वी स्वित्झर्लंडमधले राजकारण स्वार्थ आणि भांडाभांडीने बरबटलेले होते.

बार्बाडोस या बेटानेही अशीच पद्धत अंगिकारली होती. १६३९ साली त्या बेटाला सनद मिळाली आणि त्यानंतर दोन शतकेपर्यंत सरकारला तोंड द्याव्या लागणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या राजकीय उलथापालथीचा (१८३४ साली गुलामगिरी नष्ट करण्याच्या प्रश्नावरून झालेल्या उत्पातासकट) अनुभव त्याला घ्यावा लागला. १८७६ साली ग्रेट ब्रिटनने वेस्ट इंडीज् बेटांवर महासंघात्मक घटना लादण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बार्बाडोस बेटात बंडाळी माजली. पण त्यातूनच १८७८ सालची घटना उदयाला आली आणि त्या चिमुकल्या वसाहतीत सुरळीत राजकारणाचे युग सुरू झाले.

त्या घटनेत नऊ जणांचे कार्यकारी मंडळ असण्याची तरतूद असून त्यापैकी सहा जण विधिमंडळातून निवडले गेले पाहिजेत. स्वित्झर्लंडप्रमाणेच कायद्यांचे मसुदे

तयार करणे, अंदाजपत्रके सादर करणे वगैरे कामे कार्यकारी मंडळ करते, आणि विधि-मंडळात काहीही ठराव व निर्णय झाले तरी ठराविक मुदतीपर्यंत सत्तेवर राहते. विरोध अतिशय प्रखर व दमवणारा असू शकतो, पण सरकारला सत्तेवरून खाली खेचणे शक्य नसल्याने त्याचा सगळा रोख प्रस्थापित कायद्याच्या अवगुणांवरच केंद्रित करावा लागतो.

स्वित्झर्लंड व बार्बाडोस दोघांनाही असाधारण प्रश्नांना तोंड द्यावे लागले; पहिल्यात चार भाषा व अनेक धर्मपंथ आहेत, तर दुसऱ्यात गुलामगिरीने मागे ठेवलेला वर्णद्वेषाचा वारसा व प्रचंड लोकसंख्या ( दर चौरस मैली ११८०–इंग्लंडमध्ये तीच संख्या ५५० ) हे प्रश्न होते. तेव्हा स्वित्झर्लंडमध्ये प्रथम उत्क्रांत झालेला लोकशाहीचा तुलनेने शांत व कार्यक्षम असलेला हा प्रकार आफ्रिकेऐवजी विशेषतः आशियातल्या ( कारण तेथे पाश्चात्त्य कल्पनांना तितका विरोध नाही ) नव्या राष्ट्रांना उपयुक्त ठरू शकेल.

## — ५ —

आशियातल्या नव्या राष्ट्रात लोकशाहीचे भवितव्य कठीण दिसते असा समज काही अंशी स्थगित ठेवायला लावणारे उदाहरण भारताचे होय. जनतेचे भयानक दारिद्र्य, व्यापक निरक्षरता, लोकसंख्येची प्रचंड वाढ, चीनचे वाढते नैतिक व भौतिक दडपण, ३९५ कलमी लिखित घटना— या सर्व अडचणी असल्या तरी भारताने लोकशाहीची उभारणी करून ती टिकविली आहे. निवडणुका खुल्या वातावरणात होतात. विरोधी पक्षांच्या नेत्यांना मधून मधून स्थानबद्ध केले जात असले तरी त्या पक्षांना चांगल्यात चांगले, किंवा वाईटात वाईट, प्रयत्न करायला मोकळीक आहे; स्तुती किंवा निंदा काहीही करायला वृत्तपत्रे स्वतंत्र आहेत. ही एक फार महत्त्वाची राजकीय घटना आहे. अप्रगत राष्ट्रांत भारत हे उदाहरण म्हणून लोकशाहीचे सर्वात मोठे आशास्थान आहे. त्याच्या साधनसामग्रीवर कमालीचा ताण पडला आहे, किंवा त्याच्यापुढील प्रश्न न सुटण्यासारखे दिसत आहेत हे कोणीच नाकारू शकणार नाही; आणि तरी भीतीने गांगरून जाऊन त्याने हुकूमशाहीचा आसरा घेतलेला नाही.

आफ्रिकेसारखे नाही, तर आशियातल्या बहुतेक देशांप्रमाणे भारतानेही आपल्या इतिहासाचा व संस्कृतीचा अनुबंध सुटू दिलेला नाही. पाश्चात्त्यांशी आलेल्या जबरदस्तीच्या संबंधातून देखील त्याने बरेच मिळविले आहे, आफ्रिकेसारखी गत होऊ दिली

नाही. सत्ताधाऱ्यांच्या लहरीनुसार बदलले न जाणाऱ्या कायद्यांच्या आधाराने नि:पक्ष-पातीपणाने न्यायदानाचे काम करणाऱ्या न्यायालयांची व स्वतंत्र न्यायव्यवस्थेची स्थापना करायला ब्रिटिशांना सवड मिळाली. त्यांनी शाळा-विद्यापीठे स्थापन केली, मजूर संघटनांच्या वाढीला उत्तेजन दिले, आणि ( मधूनमधून ) कॉंग्रेस पक्षाला राजकीय स्वरूप धारण करून स्वातंत्र्यासाठी चळवळ करू दिली. अशा रीतीने १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी लोकशाहीपद्धतीसाठी आवश्यक असलेली किमान यंत्रणा उपलब्ध होती. कधी कधी अजिबात आशा वाटत नसतानासुद्धा भारतीयांनी त्या यंत्रणेचे संगोपन केले आहे हे त्यांचे उल्लेखनीय कर्तृत्व होय; मात्र यंत्रणेच्या निर्मितीचे व अस्तित्वाचे श्रेय ग्रेट ब्रिटनकडे जाते.

भारतात लोकशाही टिकायला नेहरू हे एक कारण होय. परिस्थितीचे दडपण अतिशय वाढले की मधूनमधून त्यांचे वर्तन हुकूमशहासारखे व्हायचे; पण त्यांच्या अंतरंगात लोकशाहीची संवेदना होती. त्यांनी एका ठिकाणी लिहिले आहे, " मतदान, निवडणुका इत्यादि बाह्य उपचारांपेक्षा लोकशाहीचा अर्थ अधिक सघन आहे. अंतिम दृष्टीने लोकशाही म्हणजे विचार करण्याची, आचाराची, शेजाऱ्याशी वागण्याची एक पद्धती होय...... शेवटी तुम्ही राजकीय नव्हे तर मानवी मूल्यांपाशी येता... हवे तर त्यांना सांस्कृतिक, चैतन्यशाली ( स्पिरिच्युअल ) मूल्ये म्हणा. "

केंद्रस्थानापासून सत्तेचे स्थानिक संस्थांकडे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयोगही भारताने केला आहे. ग्रामपंचायत व तिचे सभासद यांचा प्रभाव व्यापक आहे. त्याला 'सहभागी लोकशाही' असे म्हटले असून त्या प्रचंड लोकसंख्येच्या विस्तीर्ण देशातल्या अगदी कानाकोपऱ्यातल्या खेड्यापर्यंत तिचा अंमल गेला आहे. केंद्रीय सत्तेवर नियंत्रण ठेवण्याच्या समस्येवर त्यामुळे उपाय सापडत नाही; पण राजकारणात आपले काहीतरी गुंतले आहे याचे भान त्यामुळे अगदी निरक्षर लोकांनादेखील होत आहे.

गांधींनी नेहरूंना लिहिले होते, " माझी अशी पक्की खात्री झाली आहे की भारताला व भारतामार्फत सर्व जगाला खरी लोकशाही साध्य करायची असेल तर लोकांना शहरात नव्हे तर खेड्यात, राजमहालात नव्हे तर झोपड्यात रहावे लागणार आहे हे लक्षात घेणे भाग आहे. शहरात व राजमहालात लोक एकमेकांशी कधीच गुण्या-गोविंदाने राहू शकणार नाहीत." नेहरू याच्याशी पूर्णतया सहमत होऊ शकले नाहीत, कारण विज्ञानाची फळे लोकांना चाखायला उपलब्ध करून द्यावीत अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी गांधींना उत्तर लिहिले, " लक्षावधी लोकांसाठी राजमहालांचा प्रश्नच नाही. पण जेथे सांस्कृतिक जीवन जगता येईल अशी आधुनिक सुखसोयीपूर्ण घरे त्यांना का मिळू नयेत ? आज भरमसाट वाढलेल्या काही शहरांमुळे अपप्रवृत्तींना वाव मिळतो हे खरे. असली बेसुमार वाढ थांबवायलाच हवी, पण त्याचबरोबर शहरी

संस्कृती स्वीकारायला खेड्यांनाही उत्तेजन द्यायला हवे. " 'सहभागी लोकशाही 'चा अर्थ व आशा यात दडलेली आहे.

भारत, जिवंत राहू शकले तरी मलेशिया आणि फिलीपाईन्स यांचा अपवाद करता– पूर्वेकडील नव्याने जन्मलेल्या राष्ट्रांना पाश्चात्य लोक ज्याला लोकशाही म्हणतात यासाठी दम शिल्लक राहिलेला नाही.

पाकिस्तानात संसदीय लोकशाही संक्षिप्त प्रयोगानंतर कोसळली. त्यानंतर प्रेसिडेंट अयुबखानने 'पायाभूत लोकशाही' (बेसिक डेमॉक्रसी) ची आखणी केली आहे, जी त्याच्या म्हणण्याप्रमाणे 'लोकांना समजणे व चालविणे शक्य आहे.' फॉरीन अफेअर्स या नियतकालिकाच्या जुलै, १९६० च्या अंकात त्याने आपल्या आशा व योजना पुढील शब्दात व्यक्त केल्या आहेत.

" पाकिस्तानसारख्या देशात लोकशाहीची कुठलीही पद्धती यशस्वी होण्यासाठी ती चार कसोट्यांवर उतरली पाहिजे– (१) ती समजायला सुलभ, चालवायला सोपी आणि टिकवायला स्वस्त असली पाहिजे. (२) मतदार आपल्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या साहाय्याने ज्यांचे उत्तर देऊ शकेल असेच प्रश्न त्याला विचारले जावेत. (३) प्रत्येक नागरिक आपल्या मानसिक क्षितिजाच्या व बौद्धिक कुवतीच्या पातळी-पर्यंत देशाच्या सर्व कारभारात प्रभावीपणे भाग घेऊ शकेल अशी कुवत तिच्यात असली पाहिजे. (४) साधारणपणे सामर्थ्यशाली व स्थिर सरकारे त्यातून निर्माण होऊ शकली पाहिजेत. "

ही योजना फार झकास वाटते, पण त्याचा अर्थ इतकाच की आपल्या सरकारवर नियंत्रण ठेवण्याची नागरिकांत अद्याप कुवत आलेली नाही असे तीत गृहीत धरले आहे. त्याच लेखात अयुबखानने पुढे म्हटले आहे, " मला (लोकशाहीच्या दिशेने) शक्य तितक्या जलद गतीने धावण्याची इच्छा आहे, पण 'इतकी घाई कशासाठी?' असे विचारणारे फार लोक आमच्या देशात आहेत. त्यांना अशी भीती वाटते की राजकारणी लोक परत पुढे येतील आणि सगळ्याचा विचका करून टाकतील. " वास्तविक पाहता लोकशाहीचा तर हा एक उद्देशच आहे की राजकारण्यांना पुढे यायला व पाहिजे तर विचका करायला देखील परवानगी असली पाहिजे. दम नसलेल्या सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने जो 'विचका' आहे तो मुक्त भाषण, अनिर्बंध संघटनस्वातंत्र्य व बेकायदेशीर अटकेपासून स्वातंत्र्य यांच्यापासून विभक्त करणे कठीण आहे– कारण एकाच्या दृष्टीने जो 'विचका' असेल तीच दुसऱ्याची अंतरीची आशा असेल.

१९६२ साली ऊ थांटने आपल्याला इषारा दिला की प्रातिनिधिक सरकार बहुतेक लोकांना आवडणारे नाही. लंडनच्या दि टाईम्समध्ये त्याने लिहिले होते, " असे गृहीत धरणे चूक होईल की नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रातील राजकीय संस्था व लोक-

शाहीचे प्रकार हे ब्रिटनमधल्यासारखेच असतील, किंवा लोकांची मते मिळविण्यासाठी स्पर्धा करणारे दोन प्रमुख पक्ष असतील."

म्हणजे विरोध आवश्यकच आहे असे नाही असे आपल्याला परत एकदा सांगितले गेले. पण स्थानिक स्वराज्याच्या लहानात लहान एककापासून तो धोरण ठरविणाऱ्या सर्वोच्च पातळीपर्यंत ज्या देशात विरोधाला उत्तेजन दिले जात नाही तेथे लोकशाही नाही हे आपल्याला दिसते आहे. (स्विस लोकांनी टीका करण्यासाठी, फेरविचार करण्यासाठी किंबहुना काही ठराव फेटाळून लावण्यासाठी सहसा न आढळून येणारी कणखर व कार्यक्षम पद्धती शोधून काढली असेल; पण तेथेही विरोध आहेच.)

या पुस्तकात दाखवून दिल्याप्रमाणे लोकशाहीत बऱ्याच उणीवा आणि धोके आहेत, आणि तरीही स्वातंत्र्याचे रक्षण करणारी तीच एकमेव सरकारची पद्धती आहे असे दिसून येते. स्वातंत्र्याशिवाय लोकांचा विकास होऊ शकत नाही. अधिक चांगला किंवा कमी किचकट प्रकार कोणी शोधून काढीपर्यंत लोकशाही हीच राजकीय पद्धती मानवाच्या दृष्टीने लायक व उपयुक्त आहे.

## -- ६ --

लोकशाही फक्त काही लोकांसाठीच उपयुक्त आहे का? की फक्त थोडेच लोक लोकशाहीसाठी लायक आहेत? हे मान्य करणे आपल्याला शक्य नाही. त्या विधानाला पावित्र्याच्या देखाव्याची दुर्गंधी येते आहे. एक तर स्वातंत्र्याचे रक्षण करू शकेल अशी लोकशाही हीच काही एकमेव पद्धती नसावी, तसे असेल तर दुसरे प्रकार शोधून त्यांची स्तुती करू या; किंवा लोकशाहीच्या अभावी स्वातंत्र्ये नाश पावतात हे स्पष्ट आहे, पण आपले शेजारी 'स्वतंत्र' व्हायला लायक नाहीत असे म्हणणारे आपण कोण?

असाही दृष्टिकोन अलीकडे पसरत चालला आहे की आपण शेळ्या आणि बोकड वेगवेगळे करू शकू– कोण संभाव्यतः लोकशाहीला लायक आहेत व कुणाच्या नशिबी हुकूमशाही सरकारांना बळी पडणे लिहून ठेवले आहे हे सांगू शकतो. त्यांच्यातील सीमारेषा आखू लागलो म्हणजे खरी अडचण लक्षात येते. ज्वलंत लोकशाहीवादी असलेल्या जॉन स्टॅूचीने लिहिले आहे, "एवढेच म्हणणे शक्य आहे की लोकशाही संस्था लोकांना राबविता याव्यात यासाठी लोकांची सर्वसाधारण संस्कृती एका विशिष्ट पातळीपर्यंत उंच असली पाहिजे." त्याने पुढे म्हटले आहे की ज्या देशात निरक्षरता,

दारिद्र्य, वंशभेद यांचे थैमान चालले आहे त्याला लोकशाही राबविणे कठीण जाईल, भारत मात्र याला अपवाद ठरेल अशी आशा बाळगायला सबळ जागा आहे.

प्रातिनिधिक सरकारवरील आपल्या ग्रंथात जॉन स्टुअर्ट मिलने पुढील सुप्रसिद्ध विधान केले आहे, "हे एक राजकीय सत्य आहे की असंख्य किरकोळ राजकीय एककांना एका सूत्रात गोवून एकात्मतेच्या समान भावनेने बांधलेले, परकीय आक्रमणापासून स्वतःचे संरक्षण करू शकणारे, स्वतःला उपयुक्त व्यवसायात गुंतवू शकणारे आणि लोकांच्या सामाजिक व राजकीय बुद्धिमत्तेच्या कक्षांना अनुरूप ठरेल असे समाजजीवनाचे क्षितिज उंचावणारे राष्ट्र किंवा समाज निर्माण करण्याचे काम प्रातिनिधिक सरकारपेक्षा बेजबाबदार राजेशाहीच चांगल्याप्रकारे पार पाडू शकेल."

साम्राज्यशाहीचे समर्थन करण्यासाठी हा उतारा अनेकवार का उद्धृत केला जातो हे 'बेजबाबदार राजेशाही' ऐवजी 'सुसंस्कृत आणि वैज्ञानिकदृष्टया प्रगत सत्ता' हे शब्द घातले की चटकन लक्षात येईल. ज्यांना एका समाजात गुंफण्याची गरज आहे असे असंख्य किरकोळ राजकीय एकक असल्याचे चित्र आफ्रिकेत होते व आहे. तरीही साम्राज्यवाद तेथे यशस्वी होऊ शकला नाही. लोकांना स्व-राज्यासाठी स्वतःच्या पद्धतीप्रमाणे तयार करायलासुद्धा त्याला वेळ मिळाला नाही. तयार होण्यापूर्वीच लोकांना दम धरवेनासा झाला होता. लोक इतके अधीर होण्याचे कारण नीट ध्यानात घेतले म्हणजे आपल्या शेजाऱ्यांची शेळया व बोकड अशी विभागणी करणे केवळ अहंमन्यतेचेच नव्हे तर शहाणपणाचेही कसे नाही हे समजून येईल.

पहिली गोष्ट अशी की मिल्ची बेजबाबदार राजेशाही (मग तो एक राजा असो की साम्राज्यशाही सत्ता असो) लोकांच्या हिताची जपणूक व संवर्धन व्हावे यासाठी वेळ खर्च करायला तयार नसते. एखादेवेळी लहर लागली म्हणजे डाव्या हाताने ती तसे करीत असेल; पण स्वतःचा स्वार्थ हा सर्वात प्रधान हेतु व उद्योग असतो. कुठलाही बेजबाबदार माणूस, सरकार किंवा गट लोकांच्या कल्याणाचे संगोपन–संवर्धन प्रयत्नपूर्वक करणार नाही कारण स्वातंत्र्य –ज्याच्यातच लोकांचे खरे हित सामावलेले असते – हे कारभार हाकणारांच्या मार्गात आडवे येणारे असते. आफ्रिकेतील साम्राज्यवाद्यांबद्दल तिथल्या लोकांना मुळीसुद्धा प्रेम वाटत नव्हते. की जेणेकरून त्यांचे तेथून निघून जाणे लांबले असते (व त्यामुळे निग्रोंचाच थोडाफार फायदा झाला असता).

दुसरी गोष्ट अशी की, आफ्रिकेतील 'बदलाच्या हवे'पेक्षाही फार महत्त्वाच्या घटना सध्या जगात घडत आहेत. साम्राज्यवाद व दुसरे महायुद्ध यामुळे घडून आलेल्या उन्मूलनामुळे व माणसाचे दैनंदिन जीवन बदलून टाकणाऱ्या नव्या शास्त्रीय क्रान्तीमुळे सबंध मानवजात सध्या धावू लागली आहे. आतापावेतो बहुतेक लोक

उपासमारीचे व निराशामय जीवन जगत आले आहेत. अजूनही बहुतेकांची स्थिती तीच आहे; पण ते अपरिहार्य नाही हे आता त्यांच्या लक्षात आले आहे. सुवर्णयुगाच्या उदया-साठी लोकांनी आपले भयंकर दैव भोगले, कारण काही पर्यायच दिसत नव्हता. आता ते एकदम अधीर झाले आहेत, आता तडजोड करायला ते अजिबात तयार नाहीत. त्यांच्यापेक्षा 'श्रेष्ठ' असलेल्यांच्या सल्ल्याची व मार्गदर्शनाची वाट पहायला ते अजिबात तयार नाहीत. त्यांना स्वतःच्या पायांनी वेगाने धावायचे आहे, अडथळया-धोक्यांची त्यांना पर्वा नाही.

काही वर्षांपूर्वी ऊ थांटने म्हटलेले बरोबर होते, "जग तोपर्यंत सामरस्याने नांदू शकणार नाही जोपर्यंत त्यातल्या दोन तृतीयांश हिश्याला जगण्याचीच भ्रांत आहे." त्याचे म्हणणे आज दहा पटीने खरे आहे, कारण त्या दोनतृतीयांश हिश्याने अगतिक होऊन शरण जाण्याचे सोडून दिले आहे.

अगदी जंगलांपर्यंत पोहोचलेली ही नवी मनोवृत्ती बदलणे शक्य नाही, पण तिला चुचकारून वळण देणे शक्य आहे. स्वतःचा कारभार चालवताना आपल्या भाईबंदांच्या हातून चुका होतील; पण तरी ते तो चालवतीलच, त्यासाठी स्वतःच्याच वर्णाच्या लोकांना गुलाम बनवावे लागले तर तीही किंमत ते देतील. आपण त्यांना त्याचवेळी मदत करू शकू ज्यावेळी आपणही तशाच अडचणीत सापडलो असून सुरळित-पणे चालू शकणारी राजकीय पद्धती शोधण्याच्या प्रयत्नात आहोत हे मान्य करू. पण आपण जर असे गृहीत धरू लागलो की आपल्याला त्याचा शोध लागला आहे, आणि त्या बिचाऱ्यांना मात्र योग्य दिशेकडे कसे पहावे हेही अजून कळत नाही तर मग आपला अनुभव अस्वीकार्य ठरविला जाईल आणि आपल्याला मिळालेले अल्पस्वल्प यश वाया जाईल.

## -- ७ --

लोकशाहीचे धोके इतिहासात व मानवी स्वभावातच अनुस्यूत आहेत. आपल्या दोषांपासून राजकीय संस्थांच्या रूपाने आपले संरक्षण होऊ शकते या आपल्या शोधात लोकशाहीची आशा दडलेली आहे. आपण नम्रभावी राहिलो तर आपला शोध इतरांना सांगू शकू, पण आज बहुतेक जग तो ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही. आणि आपणही नेहमी जपून बोलतो असे नाही. एकच उदाहरण द्यायचे तर; बहुसंख्य लोकांनी आपले निदान ऐकावे अशी इच्छा असली तर 'कम्युनिझम' या शब्दाला लाजून किंवा घाबरून चालणार नाही.

काही कम्युनिस्ट राष्ट्रांनी जी लष्करी आक्रमणे केली त्यांचा लोकशाही, स्वातंत्र्य व अर्थशास्त्र याविषयीच्या मार्क्सिस्ट सिद्धान्तांशी काही संबंध नाही. आपल्या आजच्या लोकप्रियतेचा फायदा घेणारा नव्या साम्राज्यवादाचा आविष्कार म्हणजे ही आक्रमणे होत. आपण त्यामुळे दिङ्मूढ होतो कारण सहन करण्याची पाळी आता आपली आहे. पण बॉंब व प्रतिबॉंब यांचे साठे (जो या पुस्तकाचा विषय नाही), रशियन व चिनी लोक वापरीत असलेली विशेषणे आणि राष्ट्रसंघाच्या टेबलावर आपटले जाणारे जोडे यांच्याकडे दुर्लक्ष करून आपण जर परत मार्क्सकडे वळलो तर कम्युनिझम म्हणजे केवळ एक आर्थिक पद्धती आहे जी अद्याप समाधानकारकपणे काम करू शकली हे आपल्या लक्षात येईल. माणसाला ‘ स्वातंत्र्याच्या राज्यासाठी ’ बंधमुक्त करणे हा तिचा हेतु होता. आफ्रिका व आशियातील काही नवे उत्साही लोक या हेतूच्या सिद्धीसाठी कम्युनिझम कसा वापरायचा याचा शोध लावूही शकतील.

लेनिनची अंतःकरणापासून अशी श्रद्धा होती की त्याचा नवा रशिया हा लोकशाहीचा भावी आदर्श ठरेल. ते सगळे चुकले; पण एखादे नवे राष्ट्र निरागसपणे परत सुरुवात करू शकेल. मार्क्सिस्टांच्या भयानक माथेफिरूपणापासून आणि स्टॅलिनच्या सैतानी खुनशीपणापासून मुक्त असलेला कम्युनिझम (पण रशियन साम्राज्यवाद नव्हे) हा लोकांचा प्रामाणिक आणि पश्चिमेतील जेरीस आलेल्या कार्यकारी मंडळाप्रमाणे लोकांच्या रखवालदारांना जबाबदार असलेला सेवक होऊ शकेल.

आपल्याला लोकशाहीचे संवर्धन (व संरक्षण) करायचे असेल तर कम्युनिझमची आकांक्षा बाळगणारे प्रत्येक राष्ट्र कालबाह्य ठरू लागलेल्या शीतयुद्धातील रशिया किंवा चीनच्या हातचे प्यादे आहे असे समजून भागणार नाही. लोकशाही आणि कम्युनिझम यांचा समन्वय साधणाऱ्या प्रत्येक प्रयत्नाला आपण साह्यच केले पाहिजे. तसा समन्वय होणे असंभव आहे असेही कदाचित् आपल्याला शिकावे लागेल; पण अद्याप तरी तसा पुरावा नाही.

सगळ्यात शेवटी एकच खरी कसोटी आहे. बाकी सर्वकाही यंत्रणेचा भाग होय; स्वातंत्र्य हेच खरे मूल्य.

निबंध ४६६२३ १५५८ १५८०

REFBK-0015949